# माणूस

२५ ऑगस्ट १९७३ / पन्नास पैसे

पृथ्वीवंदन
मंगलमुद्रण
लोकमत
गांधीभवन

## जवाहरलाल

श्री. ग. माजगावकर

२५ ऑगस्ट १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशाची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : तेरावे । अंक : तेरावा

## सप्रेम नमस्कार....




उपेक्षित ग्रामीण गोमंतकाकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न श्री. मनोहर विठ्ठल कोरगावकरांच्या सिद्धहस्त लेखणीराने 'पेडणे मागे का ?' हा लेख माणूसच्या १४ जुलै १९७३ च्या अंकात लिहून केला आहे.

त्या लेखात कोरगावकर लिहितात— 'युवक शिकलासवरला की आपल्या गावापासून दूर होतो. आपण पुढे गेलो, सुटलो असे म्हणून आपल्या गावाकडे पाठ फिरवणारे तरुण आपल्याच माणसांना दारिद्र्यात ठेवतात. यात गुणाला खेड्याकडे धाव घेतली पाहिजे.'

अशाच विचाराने प्रेरित होऊन कणकवली परिसरातील एक उमद्या व्यक्तिमत्वाचे तरुण समाजवादी कार्यकर्ते श्री. तु. र. दळवी सेंट्रल रेल्वे खात्यातील नोकरीवर लाथ मारून १९५८ साली आपल्या गावी आले.

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुण ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.


उरी किती अपेक्षा बाळगून आला होता तो तरुण !, घरच्या मंडळींचा त्याच्या या जनकार्यास विरोध असतानादेखील तडफेने, जिद्दीने आपला कार्यरथ हाकण्यास सुरवात केली. त्याचे पाऊल प्रथम आपल्या गावच्या ग्रामपंचायतीकडे वळले. त्यांनी ग्रामपंचायतीत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला परंतु पहिल्याच पदक्षेपात अपयशाचे ताट वाढून ठेवले होते ते बिचाऱ्याला कुठे माहित होते ? त्याचे सहकारीच त्याला सहकार्य देईनात. त्यांनी मांडलेला ठराव बहुमताने फेटाळून लावीत. त्यानंतर जानवली ग्रामविकास सोसायटीत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. पुन: एकवार पदरी घोर निराशा.

कणकवली तालुक्यात होणाऱ्या लोकसभा विधानसभेसाठी होणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत अनोनात परिश्रम करून बॅ. नाथ [illegible]ांचे निष्ठावंत अनुयायी व [illegible]सू कार्यकर्ते बनण्याचा प्रयत्न[illegible]. पुनरपी निराशेची दरड त्यांच्या कार्याच्या आड आली, एवढे श्रम करूनदेखील पदरी निराशेशिवाय काही पडत नाही हे पाहिल्यावर कॉंग्रेस पक्षात ते दाखल झाले. कॉंग्रेसमध्ये जाण्यामागचा दृष्टीकोन असा होता की कॉंग्रेस या सत्तारूढ पक्षाभोवती जे लोकप्रियतेचे वलय आहे त्यामुळे त्यांच्या मागण्या, त्यांच्या सूचना पूर्ण होतील, परंतु छे:! पदरी म्हणण्यासारखे काहीच पडले नाही. त्यांनी कणकवली परिसरातील बौद्ध धर्मियांवर होणारे अत्याचार, अन्याय। यांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. परंतु कोणाचेही सहकार्य न लाभल्यामुळे फिरून एकवार अपयश. त्या तरुणाच्या डोळ्यासमोर निराशेचा सागर तरळू लागला. आपण त्या सागरात बुडून तर जाणार नाही ना, असा विचार करून गावाला रामराम ठोकून मुंबईस परत आला. समाज काय त्याला दोन वेळचे भोजन देणार नव्हता. त्यामुळे त्याला नोकरीशिवाय दुसरा कोणताच पर्याय नव्हता. परंतु नोकरी काय घरी चालून येते ? नोकरीच्या शोधासाठी त्याने आपल्या जुन्या सहकाऱ्याच्या घराचे-ऑफिसांचे उंबरठे झिजविले. तेव्हा कुठे त्यांना 'अपना बझार' येथे नोकरी लाभली. तेथे त्यांनी दोन-अडीच वर्षे नोकरी केली. परंतु त्यांचे मन सदा सर्वकाळ बेचैन रहायचे. तुम्ही विचाराल निराशेच्या गर्तेतून बाहेर पडून नोकरी धंद्यावर स्थिर झाले तरी देखिल मन बेचैन का ? अहो ! त्यांना एक प्रश्न सतत भेडसावीत होता, त्यांचे मनस्वास्थ्य स्थिर ठेवीत नव्हता. तो प्रश्न म्हणजे कोणत्या उद्देशाने आपण गावी गेलो आणि हे झाले काय ? त्यांतच घरच्या प्रापंचिक अडचणींमुळे त्यांनी या जगाला कंटाळून ता. २५–६–७३ रोजी कल्याणनजिक हाजीमलंग येथे डायझोन प्राशन करून आत्महत्या केली.

एका निष्ठावंत समाजसेवकाची अशी दारुण परिस्थिती झाली.

**वसंत दळवी, मुंबई.**

● ● ●



# एका ऋषीची हाक

देशातील धान्यपरिस्थिती गेल्या काही महिन्यात फारच बिघडली आहे. जीवनावश्यक वस्तूंचे भाव पिसाटासारखे वाढत आहेत. जीवनाला आवश्यक तरीही ह्या वस्तू सामान्य जनतेच्या हाताला लागेनाशा झाल्या आहेत. एवढेसे मिळवण्यासाठी रांगेत सकाळी उभे राहिल्यास संध्याकाळ होऊ लागली आहे. सहनशक्ती फार ताणली जाऊ लागली आहे. सरकार काही करू म्हणते पण करीत असल्यासारखे दिसत मात्र नाही. त्यांच्या तोंडून निघणाऱ्या ' stern action ', कडक कारवाई, ह्या शब्दांनी ज्यांचा थरकाप व्हावा ते त्यांना काडीची किंमत देत नाहीत. काळाबाजारवाल्यांना फाशी दिले पाहिजे, साठेखोरांना साखळदंडांनी बांधले पाहिजे; ह्या फावल्या वेळी मारायच्या गप्पा ठरल्या आहेत. अशा परिस्थितीत गांजलेल्या जनतेने कायदा हातात घेण्याचे ठरवल्यास नवल नाही. हा बदल क्रांतिकारी आहे. त्यात लोकशाहीविरोध, हिंसाचार दिसत असला तरी लोकांना 'थांबा' असे आता म्हणायचे तरी कोणत्या तोंडाने? ह्यावर एक उपाय म्हणून महात्माजींनी सुचविलेल्या Trusteeship च्या कल्पनेला पुन्हा फुंकर घालून चेतविण्याचे प्रयत्न चालू आहेत. लोकांनी लुटून नेण्यापेक्षा बदललेली वेळ ओळखून लोभवृत्तीला लगाम घालणे आवश्यक आहे.

फार प्राचीन काळी एका ऋषीने प्रगट केलेले काही विचार सध्याच्या अन्न तुटवड्याच्या दिवसात ज्यांनी धान्याचे साठे दडवून ठेवले आहेत, जे

धनिक आहेत आणि अधिक धनिक होऊ पहात आहेत त्यांनी विचारात घेण्यासारखे आहेत. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलाच्या ११७ व्या सूक्तात हे विचार ग्रंथीत केले आहेत. सूक्तात ९ ऋचा आहेत, म्हणजे ते लहानसे आहे. भाषा तशी सोपी आहे. ह्या ऋचात सुस्थितीतील लोकांनी विपन्नावस्थेतील लोकांची आठवण ठेवावी, त्यांना आपल्यातला वाटा काढून द्यावा अशी हाक आहे. आजची चांगली स्थिती नेहमी तशीच चांगली राहील ह्याची खात्री कोणी बाळगू नये असा धोक्याचा इशाराही आहे. सहाव्या ऋचेचा शेवटचा पाद 'केवलाघो भवति केवलादी' (जो एकटाच खातो तो नुसत्या पापाचा धनी होतो) हे सध्या सर्वांनी जेवायच्या खोलीत समोर दिसेल असे टांगून ठेवण्यासारखे वाक्य आहे.

हे विचार सूक्तदृष्टचा ऋषीने मांडेल्याला सुमारे तीन हजार वर्षे होऊन गेली. इतक्या लांबून मारलेली हाक आज नीट ऐकू येणार का? पण लांबून आलेली असली तरी ती एका द्रष्टया पुरुषाची हाक असल्यामुळे तिला एक वेगळेच महत्त्व आहे हेही खरेच. सूक्तात त्या काळाला अनुसरून 'दुसऱ्याला अन्न द्यावे' अशी दान देण्याची सूचना आहे. आज लोक धान्य 'दान' म्हणून मागत नाहीत; तर वस्तूची वाजवी किमत देऊन ते 'हक्क' म्हणून मागत आहेत. हा हक्कही डावलला गेला तर मग नाईलाज म्हणून लुटीची भाषा सुरू होते आणि लूट सुरू झाली की कुणाची गय केली जात नाही. ती वेळ येऊ नये म्हणून 'वेळेवरच सावध व्हा आणि आपण होऊन द्या' हा फार पूर्वी दिलेला इशारा, ही हाक पुन्हा एकदा ऐकू या.

**ऋग्वेद मंडल १० वे, सूक्त ११७**

१ : कोणालाही भुकेने मृत्यू यावा ही गोष्ट देवांनी शिक्षा म्हणून देखील मान्य केलेली नाही. आणि दुसऱ्याला उपाशी ठेवून स्वतः तृप्त रहाणाऱ्याला मृत्यू येत नाही असेही नाही. जो दुसऱ्याला देतो त्याची समृद्धी दिल्याने क्षीण होत नाही. परंतु न देणाऱ्याची मात्र प्रसंगी कुणालाही करुणा येत नाही.

२ : घरी भरपूर धान्य असूनही अन्न मिळवण्याच्या इच्छेने आलेल्या, कष्टी गरीब माणसाला पाहून जो मन घट्ट करतो, त्याला अन्न देत नाही अशा समृद्ध माणसाने पूर्वी जरी कुणाला इतर मदत केली असली तरी त्याची कुणाला दया येत नाही.

३ : तोच खरा दाता की जो अन्नाच्या इच्छेने घरी आलेल्याला, हिंडून हिंडून कृश झालेल्याला अन्न देतो. असे केल्याने दुसऱ्याजवळ जे (अन्न) नाही त्याची उणीव तो भरून काढतो आणि भविष्य काळासाठी एका चांगल्या मित्राची जोड करतो.

४ : जो आपल्या मित्राला, नेहमी आपल्या पाठीशी असणाऱ्यालाही, वेळ प्रसंगी अन्न देत नाही तो त्याचा खरा मित्र नव्हेच, असंतुष्ट मनाने तो भुकेला मित्र दूर निघून जाईल. ते पूर्वीचे

मित्राचे घर, आता त्याला घर म्हणून उरले नाही. जो कोणी अन्न देईल, मग तो अनोळखी परका का असेना, त्याच्याकडे त्याला जावेसे वाटेल.

५ : जो समृद्ध आहे त्याने गांजलेल्याला द्यावे. आयुष्यातली बरीच मोठी वाटचाल अजून चालायची आहे हे त्याने लक्षात घ्यावे. समृद्धी ही रथाच्या चाकासारखी खालीवर होत असते. ती आज एकाकडे असेल तर उद्या दुसऱ्याकडे.

६ : मिळविलेल्या गोष्टीचा विनियोग कसा करायचा हे ज्याला कळत नाही त्याने पुष्कळ धान्य मिळविले तरी ते व्यर्थच होय. खरे सांगायचे म्हणजे असे साठवलेले धान्य हा त्याचा मृत्यूच होय. अशा साठेखोराला आयुष्यात कोणी सच्छील भेटत नाही, त्याचे मित्र कधी वाढत नाहीत. एकट्याने खाणारा नुसत्या पापाचीच जोड करीत असतो. (किंवा, एकट्याने खाणारा, एकटा तोच पापाचा धनी बनतो).

७ : शेतात फिरणारा फाळ लोकांना तृप्त करतो (घरात पडून राहाणारा नव्हे). जो वाट चालेल त्याचा रस्ता संपेल. जो ज्ञाता बोलेल तो गप्प बसणाऱ्यापेक्षा जास्त मिळवील. देणारा मित्र न देणाऱ्याला मागे सारील.

८ : (केवळ साधने जास्त आहेत म्हणून तेवढ्याने कोणी यशस्वी होत नाही.) एकपाद सूर्याची रोजची चाल द्विपाद मानवापेक्षा जास्त असते. द्विपाद मानव त्रिपाद मानवाला (म्हणजे हातात काठी घेऊन चालणाऱ्या वृद्धाला) मागून येऊनही गाठू शकतो. चतुष्पाद प्राणी द्विपादांच्या हाकेला धावतात आणि त्यांच्या गुरांची राखण करून सेवाही करतात.

९ : दोन हात सारखे असले तरी त्यांचेकडून होणारे काम सारखे नसते; दोन गायी एकाच वेळी प्रसवल्या तरी त्यांना दूध सारख्याच प्रमाणात येईल असे नाही; भावंडे जुळी, पण दोघांच्या शक्तीत मात्र फरक, आणि कुणी दोघे ज्ञातीबांधव असले तरी त्यांचे दातृत्व सारखे नसते.

—म. अ. मेहेंदळे


## शनवारवाड्यातील शमादान

---

## ब. मो. पुरंदरे

---

## किंमत : साडेतीन रुपये

---

## राजहंस प्रकाशन

## यवतमाळ नागपूर भागातील

# एक भ्रष्टाचार केंद्र

### लेखक : झुंबरलाल भरुट

प्रत्येक काळाचे स्वतःचे काहीतरी वैशिष्ठ्य असते. इंग्रजांनी आपला एकतंत्री अंमल संपूर्ण हिंदुस्थानभर सुरू केला, आणि राष्ट्रीयत्वाची भावना दडपून टाकण्याचा दुर्दम्य प्रयत्न केला. पण 'केला जरी पोत बळेची खाले-ज्वाला तरी ते वरती उफाळे' या न्यायाने राष्ट्रीयत्वाची भावना नाहीशी न होता ती उलट जास्तच तीव्र होत गेली आणि शेवटी भारताचा नाद इंग्रजांना सोडून द्यावा लागला. स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतचा काळ आजच्या तरुण पिढीने पाहिलेला नाही. कार्य-कर्त्यांना सत्तेचे तेव्हा वावडे होते. संपत्तीचा मोह दूर ठेवावा लागत होता. आर्थिक आणि शारीरिक देहदंड सोस-ण्याची तयारी ठेवावी लागत होती. तरच देशभक्ती साधू शकत होती. देश-भक्तीचे माध्यम होते फक्त सेवा, सेवा आणि सेवा.

पण काळ बदलला. इंग्रज गेले. स्वातंत्र्य आले. आपला अंमल सुरू झाला. सेवेची आवश्यकता वाटेनाशी झाली. सेवेचे महत्त्व नाहीसे झाले. या शब्दाभोवती असलेले पावित्र्याचे वलय पार चुरगळले गेले आणि त्याची जागा घेतली सत्तेनी. सत्तास्थाने प्राप्त करण्या-कडे जास्त लक्ष दिले जाऊ लागले. जास्त शक्ती केंद्रित करण्यात येऊ लागली. जी व्यक्ती जास्तीत जास्त सत्तापदे आपल्याकडे ठेवू शकेल ती जास्त मोठी देशभक्त गणली जाऊ लागली. सत्तास्थाने हाच देशभक्तीचा मापदंड समजला जाऊ लागला. आता सत्तास्थाने कमी पडू लागली आणि म्हणूनच नवनवीन निर्माण करण्यात येऊ लागली. पण भूक भागेना. राज्य पातळीवरील सत्तास्थाने पुरेशी पडत नाहीत हे लक्षात आल्यानंतर जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर ती तयार करण्यात येऊ लागली. सत्तास्थानांचे मजबूत जाळेच्या जाळेच विणले गेले. राजकीय क्षेत्र सत्ताधाऱ्यांची भूक भाग-विण्यास तरीही असमर्थ ठरू लागले आणि म्हणून सामाजिक, आर्थिक क्षेत्रा-तही सत्तापदे निर्माण करण्यात येऊ

नफेखोरांना जीवन अशक्य करून टाका असे इंदिरा गांधी म्हणतात. कर चुकविणाऱ्यांवर बहिष्कार टाका असे यशवंतराव चव्हाण सांगतात. पण या भ्रष्टाचारांची मूळ केंद्रे शाबूत आहेत तोवर या वरवरच्या भडक घोषणांना काही अर्थ आहे का ?

लागली. सत्तेची भूक तरीही वाढतच राहिली. सेवाकार्य आधीच बंद पडले होते, आता ते साफ विस्मृतीच्या पडद्याआड गेले आणि तरीही भूक शमेनाच.

ही हकीगत आहे अशाच एका देशभक्ताची आणि त्याने गाजविलेल्या कर्तृत्वाची. व्यक्तीचे नाव श्रीयुत जवाहरलाल अमोलकचंद दर्डा. जन्म १९२० च्या आगेमागे. शिक्षण मॅट्रीकपर्यंत. विधान परिषदेत सध्या महाराष्ट्राच्या राज्यपालांतर्फे नेमले गेलेले सदस्य ते हेच. महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशनचे सुरुवातीला सदस्य, नंतर उपाध्यक्ष आणि आता अध्यक्ष आहेत ते हेच गृहस्थ. राष्ट्रीय पातळीवरील गृह निर्माण मंडळाचे अध्यक्षही हेच. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी बोर्डाचे माजी सदस्य हेच आणि नागपूरहून गतवर्षीपासून प्रसिद्ध होत असलेल्या 'लोकमत' या मराठी दैनिकाचे संचालकही हेच.

स्वातंत्र्यपूर्व काळात १९४०–४१ च्या सुमारास राजकारणात प्रवेश. यवतमाळ जिल्ह्यातील त्या वेळच्या तरुण मंडळींचा हा लाडका नेता. स्वातंत्र्योत्तर काळात नगर काँग्रेस कमिटी आणि नंतर जिल्हा काँग्रेस कमिटीचा अध्यक्ष.

१९५४ पासून सहकारी संस्थांमध्ये जास्त लक्ष घालायला सुरुवात. यवतमाळात सहकारी तत्त्वावर प्रथम स्थापन झालेल्या आदर्श गृहनिर्माण सहकारी संस्थेचा संस्थापक आणि अध्यक्ष. या जोडीलाच मजूर कामगार सहकारी संस्था, कुंभार कामगार सहकारी संस्था, यवतमाळ जिल्हा औद्योगिक सहकारी संस्था, जंगल कामगार सहकारी संस्था, सहकारी शेतकी संस्था वगैरे विविध संस्थांचे संस्थापक आणि अध्यक्ष.

इंग्रजी भाषेत एक म्हण आहे– 'Power corrupts and absolute power corrupts absolutely. (सत्ता व्यक्तीला भ्रष्ट करते आणि संपूर्ण सत्ता संपूर्ण भ्रष्ट करते.) याची प्रचिती श्री. दर्डा यांचे बाबतीत पूर्णपणे आलेली

आहे. आदर्श गृहनिर्माण सहकारी संस्थेत त्यांनी केलेल्या उपद्‌व्यापांची माहिती पुढील अंकातील एका स्वतंत्र लेखात येईलच. दर्डा यांना सहकारी संस्थांमध्ये मोकळे रान मिळाल्यामुळे व आपण काहीही केले तरी त्याची दाद-फिर्याद लागू शकणार नाही हा अहंकार त्यांच्यात निर्माण झाल्यामुळे त्यांची नजर इतरत्रही हळूहळू फिरू लागली. इतर ठिकाणी त्यांनी केलेल्या अनेक गैरप्रकारांपैकी केवळ काही ठळक गैरप्रकारांची माहिती देण्यासाठीच या लेखाचा प्रपंच करण्यात आला आहे.

१ : दर्डा यांनी स्थापन केलेल्या इंडस्ट्रियल को ऑपरेटिव्ह सोसायटीला झिंक, कापूर वगैरे पुष्कळशा वस्तू परदेशातून आयात करण्याचा परवाना बऱ्याच वर्षापासून प्राप्त झालेला आहे. परंतु दर्डा हा सर्व माल नेहेमीच मुंबईत परस्पर काळ्या बाजारात विकत आले आहेत व अशा रीतीने सोसायटीच्या जीवावर त्यांनी अक्षरशः हजारो रुपयांची कमाई केली आहे.

२ : यवतमाळ शहरातील भरवस्तीतील एका बोहोरी व्यापाऱ्याची दुमजली इमारत दर्डा यांनी ' मंगल-मुद्रण ' या स्वतःच्या छापखान्यासाठी मासिक ७५ रुपये भाड्याने घेतली. सुरवातीला काही दिवस या ठिकाणी छापखाना होताही. पण दर्डांचे ' पृथ्वीवंदन ' तयार होताच मंगल मुद्रण जरी त्या इमारतीत गेले तरी दर्डांनी ही इमारत सोडली नाही व तिचे लहान लहान भाग आपल्या हाताखालील विविध संस्थांना स्वतःच भाड्याने दिले. गेल्या सतरा–अठरा वर्षांपासून दर्डा या भाड्याच्या पोटी मासिक ४५०रुपये भाडे मिळवित आहेत व स्वतः मात्र फक्त ७५ रुपये भाडे भरीत आहेत. दर्डाजींच्या वैयक्तिक हिशोबात मात्र हा सर्व पैसा कोठेच दाखविण्यात आलेला नाही.

३ : याच काळात दर्डा यांनी तीन जीप्स खरेदी केल्या असून त्यांची नोंद आर. टी. ओ. च्या कार्यालयात आहे. दर्डा ह्यांचा व्यक्तिगत उद्योग काही नसताना किंवा त्यांची वडिलोपार्जित कोणतीही इस्टेट नसताना त्यांनी या तीन जीप्ससाठी पंचेचाळीस हजार रुपये कोठून आणले हे एक कोडेच आहे. विशेष म्हणजे मंगल मुद्रण व लोकमत साप्ताहिक या काळात दर्डाजींच्या मालकीचे राहिले नव्हते. ते त्यांनी हिंद कन्स्ट्रक्शन कंपनीला विकले होते व आपण स्वतः मासिक २५० रुपये महिन्याने हिंद कन्स्ट्रक्शन कंपनीत नोकरीस आहोत असे कागदोपत्री दाखविले होते. मासिक २५० रुपये मिळविणारा साधा नोकर तीन तीन जीप्स एका वर्षात कशाच्या आधारावर विकत घेऊ शकतो ? खरे म्हणजे इन्कमटॅक्स चुकविण्यासाठी दर्डाजींनी योजिलेली ही एक शक्कल होती. दुसरे काहीही नाही.

४ : १९५६–५८ या काळात दर्डा यांनी पृथ्वीवंदन ही एक चार मजली आलिशान इमारत बांधली. त्याच वेळची या इमारतीची किंमत सहज दीड लाखाच्यावर जाईल. इतका पैसा त्यांच्याजवळ कोठून आला. हे समजायला

मार्ग नाही.

५ : पृथ्वीवंदन या इमारतीजवळच गोपाळराव शहाडे यांची छोटीशी जागा आहे. पण आपल्या अधिकाराच्या तोऱ्यात दर्डाजींनी ती जागा ताब्यात घेऊन तिच्यावर बांधकामही केले. पुढे शहाडे यांनी याबाबत दर्डा यांच्याविरूद्ध दिवाणी दावा दाखल केल्यानंतर त्यात दर्डा यांनी दाखल केलेल्या निवेदनात 'या जागेवर ५००० रुपयांचे बांधकाम मी केले आहे.' असे विधान केले आहे. मासिक २५० रुपये मिळविणारा साधा नोकर भराभर अशा रीतीने मोठमोठ्या रकमा कशा खर्च करू शकतो ते समजत नाही.

६ : दर्डा यांच्या पत्नी सौ. वीणादेवी दर्डा यांनी आदर्श गृहनिर्माण सहकारी संस्थेकडून बारा हजार रुपये कर्ज घेतल्याची नोंद संस्थेच्या कागदोपत्री आहे. सौ. वीणा दर्डा या स्वतः इन्कम-टॅक्स भरत असल्या तरी याबद्दलची नोंद त्यांच्या हिशोबाच्या वह्यात नाही.

७ : नागपूर येथे रहाटे कॉलनीत दर्डा यांनी इंप्रुव्हमेंट ट्रस्टकडून कर्ज घेऊन ९००० रुपयांत एक प्लॉट खरेदी केला व त्यावर घर बांधले. ही गोष्ट १९६० पूर्वीची आहे. पण याबद्दलचा उल्लेखही दर्डा यांच्या हिशोबाच्या वह्यात कोठेच नाही.

८ : वरील प्लॉटवर बांधलेल्या घरासाठी दर्डा यांनी प्रिमीयर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीकडून वीस हजार रुपये कर्ज घेतले होते. पण प्रत्यक्षात त्यावर झालेल्या बांधकामाची त्या वेळचीच किंमत पन्नास-साठ हजार रुपयांवर आहे. मग हा जास्त पैसा आला कोठून ?

९ : मुंबईला वांद्रा येथील अमृत को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीत दर्डा यांच्या नावे एक जागा आहे. निर-निराळ्या शहरी एकाच व्यक्तीला अशा रीतीने घरबांधणीसाठी कर्ज देण्याची तरतूद सहकारी कायद्यात अगर कोणत्याही गृहनिर्माण सहकारी संस्थेच्या उपनियमात नाही. याचाच सरळ अर्थ हा की, दर्डा यांनी इतर संस्थांना अंधारात ठेवून प्रत्येक ठिकाणी कर्ज प्राप्त केले आहे.

१० : ज्या प्लॉटवर 'पृथ्वीवंदन' ही वास्तू आज उभी आहे तो प्लॉट दर्डाजींचे आजोबा श्री. पृथ्वीराज बोरा यांच्या मालकीचा होता. त्यांनी या प्लॉटपैकी काही भाग दर्डाजींच्या मातोश्री श्रीमती कुसुमबाई दर्डा यांना बक्षीस दिला व या प्लॉटवर श्री. पृथ्वीराज बोरा व श्रीमती कुसुम दर्डा या दोघांनीही स्वतंत्रपणे प्रत्येकी बारा हजारांचे कर्ज उचलले. आज या प्लॉटवर दोन स्वतंत्र इमारती नसून 'पृथ्वीवंदन' ही एकच इमारत आहे. वास्तविक ही इमारत दर्डा यांनीच बांधलेली असून तिच्याकरिता आदर्श गृह निर्माण सहकारी संस्थेच्या पैशाचा आणि सामानाचा वारेमाप वापर मुक्तपणे करण्यात आला आहे.

११ : यवतमाळ जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या मालकीची एक जीप (जिचा क्रमांक ९६४३ होता) व मादनी

शेतकी सहकारी संस्थेचा एक ट्रॅक्टर यांच्या पेट्रोल व डीझेलकरिता झालेला सर्व खर्च हिंद कन्स्ट्रक्शन कंपनीच्या हिशोबात लावलेला आढळतो. याचा सरळ अर्थ हा की, दर्डाजींनी या संस्थांच्या वाहनांचा स्वत:साठी गैर-वापर केला, परंतु त्याद्वारे प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा हिशोब मात्र कोठेच दिला नाही.

१२ : दर्डा चालवीत असलेल्या 'लोकमत' साप्ताहिकाच्या खपाबद्दल अतिशयोक्तिपूर्ण माहिती सरकारला पुरवून त्यांनी न्यूजप्रिंटचा भरपूर कोटा प्राप्त केला. यवतमाळ जिल्ह्यात लोकमत साप्ताहिकाचे खरे वर्गणीदार पन्नासच होते. त्यांची खरी आवश्यकता होती फार तर एक टन न्यूजप्रिंटची. परंतु त्यांना मिळत होता मात्र दहा टन. उरलेला सर्व माल दर्डाजी परस्पर मुंबईतच काळ्या बाजारात विकून टाकीत असत. या व्यवहारात त्यांनी अक्षरश: हजारो रुपये आजवर कमावले आहेत.

१३ : दर्डाजींची गणना आज लक्षाधीशात होते. पण त्यांची भूक मात्र भागलेली नाही. आपण स्वातंत्र्यसैनिक आहोत आणि म्हणून आपल्याला मदत मिळावी असा अर्ज त्यांनी सरकारकडे केला आणि यवतमाळ शहरातील अत्यंत मोक्याची जागा–जिची किंमत बाजारभावानुसार दीड लाखावर जाईल ती फुकटात पदरात पाडून घेतली. वास्तविक ही जागा सरकारने आधीच यवतमाळ येथील आदिवासी मंडळाला भाडेपट्ट्याने वहिवाटीकरिता दिली होती व त्या मंडळातर्फे त्याची नियमितपणे वहिवाटही केली जात होती. परंतु निरनिराळ्या युक्त्या प्रयुक्त्या योजून दर्डांनी ती जागा बळकावलीच. दर्डा हे स्वातंत्र्यसैनिक आहेत या सबबीवर सरकारकडून आपला वशिला व आपले वजन वापरून त्यांनी लक्षावधी रुपयांच्या जमिनींचे सरकारकडून दान घेतले आहे.

१४ : इलेक्ट्रिसिटी बोर्डात असताना त्यांनी स्वत:चा कसा फायदा करून घेतला हे सांगण्यासाठी स्वतंत्र लेखच लिहावा लागेल. नॉन मॅट्रिक दर्डाजी बोर्डाचे सदस्य बनल्याबरोबर काही दिवसातच बोर्डाच्या खर्चाने मशिनरीच्या खरेदीचे निमित्त साधून परभारे परदेशवारी करून आले.

१५ : यवतमाळ जिल्हा परिषदेच्या १९६२ च्या पहिल्या निवडणुकीत ते सपशेल आपटले. पण तरीही नॉमिनेटेड सदस्य म्हणून त्यांनी स्वत:चा वशिला लावलाच. जिल्हा परिषदेच्या स्टँडिंग कमिटीचे ते सदस्य बनले. जिल्हा परिषदेचे मुखपत्र 'ग्रामदूत' दर्डाजींच्याच छापखान्यात सुरुवातीपासून छापले जात आहे.

१६ : 'लोकमत' साप्ताहिक सुरू होण्यापूर्वी दर्डा यांनी श्री. भय्यालाल जयस्वाल यांच्या सहकार्याने 'हिंदुस्थान मुद्रण' हा छापखाना सुरू करून त्यातून 'नवे जग' हे साप्ताहिक सुरू केले. सर्व मलिदा आपणच घ्यायचा या दर्डाजींच्या पद्धतीमुळे लवकरच त्यांचे जयस्वाल यांच्याशी वितुष्ट आले. याचा परिणाम

असा झाला की, 'नवे जग' हे साप्ताहिक आणि 'हिंदुस्थान मुद्रण' हा छापखानाही बंद पडला आणि भय्यालाल जयस्वाल यांना यवतमाळला कायमचा रामराम ठोकून नागपूरला वकिलीची पाटी लावावी लागली.

१७ : महात्मा गांधींच्या निधनानिमित्त यवतमाळ येथे ३१ जानेवारी १९४८ या दिवशी झालेल्या शोकसभेत हजारो रुपयांच्या देणग्या गोळा करून यवतमाळ येथे 'गांधी भवन' बांधण्याचे ठरले होते. या इमारतीत वाचनालय, सभागृह, अध्ययन कक्ष वगैरे राहून एक अध्ययन केंद्र म्हणून त्याचा विकास व्हावा ही सुरुवातीची कल्पना. पण ही कल्पना केवळ कागदोपत्रीच राहून आज या इमारतीत निरनिराळी कार्यालये असलेली आढळतात. आता तर त्यात एक गेस्ट हाऊसही उभे करण्यात आले आहे. याप्रमाणे या अध्ययन केंद्राला दर्डांनी आज व्यापारी केंद्राचे स्वरूप दिले आहे.

१८ : अमोलकचंद महाविद्यालय म्हणजे यवतमाळची शान. गेल्या पंधरा वर्षांपासून ते सतत प्रगतीपथावर होते. पण तीन-चार वर्षांपूर्वी दर्डा यांच्याकडे या महाविद्यालयाच्या अध्यक्षपदाची सूत्रे आल्यापासून सर्वच परिस्थिती पालटली. साठ-सत्तर प्राध्यापक असलेल्या आणि मासिक पन्नास हजारांचे बजेट असलेल्या या महाविद्यालयाच्या प्राध्यापकांचा गेल्या ५–६ महिन्यांपासून पगारच झालेला नाही. या महाविद्यालयाच्या इतिहासात ही परिस्थिती प्रथमच आली असली तरी दर्डाजींना ती जुनीच आहे. कारण ते जेथे हात घालतात तेथे आजपर्यंत असेच होत आले आहे.

१९ : महाविद्यालयाच्या गव्हर्निंग बॉडीच्या अध्यक्षपदावर राहूनही पगाराची जबाबदारी शिरावर न घेता झटकून मोकळे होणारे दर्डाजी स्वतःच्या मुलाच्या शिक्षणासाठी मात्र हजारो रुपयांचे पाणी करीत आहेत. नुकताच त्यांचा एक मुलगा इंग्लंडमध्ये शिकायला गेला आहे.

२० : एक साप्ताहिक म्हणूनसुद्धा यवतमाळ येथे धड चालत नसलेले 'लोकमत' आता दर्डाजींनी नागपूरहून दैनिकाच्या स्वरूपात सुरू केले आहे. याच्यासाठी दर्डाजींनी कशा रीतीने आणि कोठून पैसा गोळा केला आणि ग्राहकांची संख्या फुगवून दाखविण्यासाठी काय काय लटपटी केल्या हे वर्णन करण्यासाठी एक स्वतंत्र लेखच लिहावा लागेल.

२१ : लोकमताच्या जोडीला दर्डाजींनी 'स्नेहश्री' हे मासिकही आता सुरू केले आहे. दर्डाजींची वृत्तपत्रे चालतात ती वर्गणीच्या भरवशावर नसून जाहिरातींच्या उत्पन्नाच्या आधारावर, असा सर्व जनतेचा समज आहे आणि तो मुळीच चूक नाही, हे त्यांची वृत्तपत्रे आणि मासिके वरवर चाळली तरी लक्षात येते.

२२ : दर्डा यांची वाणी मोठी मिठ्ठास आहे. तिचा कौशल्याने उपयोग करून ते प्रतिपक्षावर अचूक आपले जाळे

फेकतात आणि प्रतिस्पर्ध्याला हातोहात आपल्या कळपात ओढतात. यवतमाळ जिल्ह्यातील विरोधी पक्षाला त्यांनी आपल्या या खास अस्त्राचाच उपयोग करून खिळखिळे करून टाकले आहे. विरोधी पक्षाचे मोठमोठे मोहोरे त्यांनी या पद्धतीने आपल्या पायाशी ओढले आहेत. हरीभाऊ जामनकर, नंदकुमार अगरवाल, दत्तराव देशमुख, गोविंद-राव बुचके, बाळासाहेब घुईखेडकर, दादा राऊत, जयनारायण अहीर वगैरे कितीतरी नावे या संदर्भात सांगता येतील.

अशी आहे ही सारी कथा. दर्डाजींना याबद्दल खंत वाटण्याची आवश्यकता नाही. कारण आज ते यवतमाळ जिल्ह्याचे खरेखुरे शहेनशहा बनलेले आहेत. कोणी त्यांच्याविरुद्ध बोलायचा अवकाश की त्याला निरनिराळ्या रीतीने त्रास देण्याचे त्यांचे खास तंत्र आहे. मग काहींना नोकरी गमवावी लागते तर काहींना चालत्या धंद्यावर पाणी सोडावे लागते. काहींची समाजात बेईज्जत केली जाते तर काहींना तुरुंगात पाठविले जाते. कोणाचेही राज्य येवो, दर्डाजींना त्याची झळ पोहोचत नाही. महाराष्ट्र मंत्रिमंडळावर आज ते मुळीच अवलंबून नाहीत. उलट महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील काही मंत्री मात्र अव-लंबून आहेत. महाराष्ट्राचे क्षेत्र त्यांना आता अपुरे पडू लागले आहे. आणि म्हणूनच की काय, त्यांनी आता दिल्ली जवळ केली आहे. लोकमत दैनिकाच्या उद्घाटन समारंभाला इंदिरा गांधींच्या खास गोटातले माहिती व नभोवाणी खात्याचे मंत्री श्री. इंद्रकुमार गुजराल व विद्याचरण शुक्ला हे दोघे मुद्दाम हजर होते. ही गोष्ट बदलत्या परि-स्थितीची द्योतक आहे.

आणि म्हणूनच आजपर्यंत अक्षरश: हजारो तक्रारी दर्डा यांच्याविरुद्ध यवत-माळपासून थेट दिल्लीपर्यंत करण्यात आल्या असूनही दर्डाजींना त्याची किंचितशीही झळ पोहोचलेली नाही.

कितीही तक्रारी करा. त्यांची कधीच दखल घेतली जात नाही. आणि म्हणून अशा निराश मन:स्थितीमध्ये महाराष्ट्र सरकारला आणि त्या सरकारचे धुरीण माननीय वसंतरावजी नाईक यांना एक शेवटची विनंती करावीशी वाटते आणि ती ही की दर्डाजींनी केलेल्या या सर्व कार्याबद्दल त्यांना 'आधुनिक सहकार महर्षी' हा किताब देण्यात यावा.

ही विनंती तरी ऐकली जाईल का?

● ● ●

**(लेखांक दुसरा पुढील अंकी)**

# सो ल क ढी

## गुलहौशी शिक्षणतज्ज्ञ

प्राध्यापक जी. डी. ऊर्फ गोवर्धनदास पारीख हे मूळचे जुन्नरचे (वास्तविक ही गोष्ट आवर्जून सांगायचे आम्हाला काहीच कारण नव्हते. परंतु व्यक्तिमात्रांवर लिहिताना अशा गोष्टी सांगितल्यास व्यक्तिचित्रण कलात्मक तर होतेच पण रंगतदारही होते की काय-असा संशय अलीकडचे काही व्यक्तिविषयक लेख वाचून आला होता; त्याचा अनुकरणात्मक प्रभाव उपरिनिर्दिष्ट वाक्यावर पडलेला आहे. असो.) कर्मभूमी मुंबई. राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्राचे ख्यातनाम प्राध्यापक. दहा वर्षे मुंबई विद्यापीठाचे रेक्टर. शिक्षणतज्ज्ञ असा महाराष्ट्राबाहेर तसाच महाराष्ट्रातही फैलावलेला लौकिक. एकूण असामी चिल्लर नव्हे.

शिक्षणक्षेत्रात अनेक वर्षे काढलेली असल्याने पारिख यांचा या विषयाचा व्यासंग सखोल आहे. (त्यांच्या ढगाळ आवाजामुळे तो जास्तच सखोल वाटतो.) त्यात पुन्हा पारीख हे निष्क्रिय शिक्षणतज्ज्ञ नव्हेत : रेक्टर म्हणून मुंबई विद्यापीठातील त्यांची दहा वर्षांची कार्यसंकूल कारकीर्द विद्यापीठाच्या इतिहासात अभूतपूर्व आहे. पारीख रेक्टर होण्यापूर्वी मुंबई विद्यापीठाची अवस्था एखाद्या सहकारी साखर सोसायटीसारखी होती; ते निवृत्त होताना त्याचे खरेखुरे विद्यापीठ झाले होते! मधल्या दहा वर्षात पारिख यांनी अशा चिरस्थायी सुधारणा मुंबई विद्यापीठात केल्या होत्या की त्यानंतर रेक्टर या पदाचीच गरज विद्यापीठाला भासली नाही--ते आपले, सहस्त्रबाहु रजिस्ट्रार चिदंबरम यांच्या हाती सुखरूप आहे.

आज प्राध्यापक जी. डी. ऊर्फ गोवर्धनदास पारिख यांची आठवण मुद्दाम काढली कारण त्यांनी नुकत्याच मांडलेल्या शिक्षणविषयक काही विचारांनी आम्ही अगदी कमालीचे भारून गेलो आहो. या विचारांची ओळख साऱ्या भारतवर्षाला झाली पाहिजे, अशी आमची पक्की धारणा आहे. पारिख सांगतात : शिक्षणक्षेत्राबाहेरचे सामाजिक वातावरण अत्यंत बिघडलेले आहे. ते बाहेरचे वारे विद्यार्थी चळवळीत शिरल्यास शिक्षणाची सुधारणा होणे दुरापास्त होऊन बसेल, हा अनुभव आजच येत आहे. विद्यार्थ्यांचे प्रश्न नाहीत असे कोणीही म्हणणार नाही; ते आहेत व ते विचारात घेऊनच सोडवण्याची उपाययोजना झाली पाहिजे. (काय ?, वाचताना कसे बरे वाटते की नाही ?)... विद्यापीठाने विचारविनिमयाने घेतलेले निर्णय बदलू शक-

तात. कारण ते राजकीय निर्णय नसल्यामुळे ते प्रतिष्ठेचा प्रश्न बनलेले नसतात. परंतु दांडगाईने चळवळ करून हे निर्णय बदलून घेण्याचा मार्ग कोणाच्याच हिताचा ठरणारा नाही. शिक्षण हे आंदोलनाचे क्षेत्र नव्हे; सहकार्याचे. (काय वाक्य आहे – 'देव दीनाघरी धावला 'मध्ये छान शोभून दिसेल.)... शिक्षण क्षेत्रातील विविध घटकांचा संवाद होणे हे आज थांबले आहे. शिक्षणसंस्थांचे संचालक, शिक्षक, विद्यार्थी, पालक, सरकारचे प्रतिनिधी यांनी एका व्यासपीठावर येऊन आपल्या समस्या थोड्या धीटपणे मांडल्या तर त्यातून मार्ग अवश्य निघेल. (हे वाचल्यावर लगोलग 'मंगल प्रभात' कार्यक्रम सुरू होईल असा होतोना भास ?)

'शिक्षणक्षेत्रातील ज्वलंत समस्या' या (नेहमीच्याच) विषयावरील एका परिसंवादात प्राध्यापक पारिख यांनी वरील (नेहमीचेच) विचार मांडले होते. कंसातील वाक्ये कंसाबाहेरसुद्धा मोठ्याने म्हणणारे काही नाठाळ लोक म्हणतील की प्राध्यापक पारिख यांसारखे शब्दांचे कशिदे काढणारे गुलहौशी शिक्षणतज्ज्ञ ही शिक्षणक्षेत्रातली आणखी एक ज्वलंत समस्या आहे.

मी नाठाळ नसल्यामुळे मला हे नाठाळांचे म्हणणे बिलकूल पटत नाही. किंबहुना त्यातून एक रोगट मनोवृत्ती व्यक्त होते असेच मी मानतो, आणि त्याने सचित होतो. लोकशाहीमध्ये सगळ्यांनी बोलायला हवे : बरे-वाईट, कमी-जास्त, खरे-खोटे, नाजूक-परखड, वरवरचे-खोलवरचे, प्रिय-अप्रिय, पथ्यकर-कुपथ्यकर, हवे तसे-नको तसे, कसेही बोलले तरी चालेल; पण बोलायला हवे. प्राध्यापक पारिख यांना हे ठाऊक आहे; मलाही ठाऊक आहे; ठाऊक नाही फक्त नाठाळांना. अहो, तुकाराम महाराजांनी मागेच सांगून ठेवले आहे.

लोकशाही म्हणे मारा आडवा हात :
बोलाचीच कढी, बोलाचाच भात ◻

## थोर्थोर वसंतराव नाईक

वसंतराव नाईक हे किती थोर पुरुष आहेत ते आपल्या सगळ्यांना चांगले ठाऊक आहे. नुकताच त्यांचा साठावा वाढदिवस दुष्काळी महाराष्ट्राने थाटामाटाने साजरा केला. त्या निमित्ताने वसंतराव नाईकांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि कारकीर्दीचे कठोर मूल्यमापन करणारे बहुत लेख मराठी आणि इंग्रजी नियतकालिकातून प्रसिद्ध झाले : वसंतराव नाईक हे कित्ती कित्ती थोर आहेत ते या लेखांनीच मला सांगितले. त्याआधी ते थोर आहेत अशी अगदी ढोबळ कल्पना मला होती : म्हणजे असे की मी आपल्यापरीने बऱ्यापैकी थोर असूनही माझा सुखी संसार चालवताना अगदी मेटाकुटीला येतो तर महाराष्ट्रराज्याचा बिकट संसार गेली दहा वर्षे पाईप फुंकीत चालवणारे मुख्यमंत्री वसंतराव नाईक माझ्याहून किती पट थोर असतील, याचा आपला एक मोघम अंदाज मी केला होता. पण ते

कसे आणि किती प्रकारे थोर आहेत हे वाढदिवशी प्रसिद्ध झालेल्या लेखांमुळेच नेमके कळले, हे कृतज्ञतापूर्वक नमूद केले पाहिजे. याच लेखातून आणखी एक गोष्ट स्पष्ट झाली : वसंतराव नाईक आपल्या राज्याचे मुख्यमंत्री आहेत म्हणून त्यांच्या सोयऱ्याधायऱ्या लेखकमंडळींना ते थोर वाटतात असे बिलकुल नव्हे; ते नुसती शेती वा वकिली वा शिकार करीत राहिले असते किंवा आपला पाईप फुंकीत बसले असते तरी अंगभूत गुणांच्या जोरावर ते थोर्थोरच ठरले असते. असो.

या सगळ्या लेखांबद्दल माझी एक खासगी तक्रार आहे ती मला जाहीरपणे सांगायला हवी. या लेखातून वसंतराव नाईकांच्या वाक्तृत्विक कौशल्याचा यथास्थित गौरव फारसा झाला नाही. हे बरे नव्हे. आम्ही तर वसंतराव नाईकांच्या भाषणांनी अनेक वेळा अचंबित होत्साते चाट पडलो आहोत. जे आमचे झाले ते त्या लेखकांचे का होऊ नये ? : त्यांना कदाचित अचंबित वा चाट वा दोन्ही कसे व्हावे, हेच नीटसे अवगत नसावे. वसंतराव नाईकांचे मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेवर काहीच्याबाहीच प्रभुत्व आहे; त्यामुळे अनेक वेळा उत्स्फूर्त भाषण करण्यावर त्यांचा भर असतो; देशोदेशीचे श्रोतृवृंद त्यांच्या अमोघ वाक्पाटवाने संमोहित होतात. पण अमोघपण हे त्या वक्तृत्वाचे एक किरकोळ वैशिष्टच झाले. (त्याला 'किरकोळ' म्हणायचे बाकीच्या वैशिष्टचांच्या तुलनेने; एरवी आपल्या नुसत्या अमोघ वक्तृत्वाने शिकारी वसंतरावांनी कित्येक वाघ गार केल्याच्या शिकारकथा आम्ही ऐकल्या आहेत. वाघ म्हणे त्यांच्या गोळीपेक्षा गोळीबंद बोलण्याला अधिक घाबरतात.) माझ्या दृष्टीने त्यांच्या वक्तृत्वाचे सर्वांत आकर्षक वैशिष्टच म्हणजे त्यातील व्यापक दृष्टिकोन आणि विचारप्रगल्भता. माझे लक्ष नेहमी बाह्यांगापेक्षा अंतरंगाकडे अधिक असते; म्हणून मला हे वैशिष्टच ठळकपणे जाणवले असावे.

मात्र याबद्दल उदाहरणांनीच बोलणे मी पसंत करतो : नऊ ऑगस्टच्या क्रांतिदिनी मुंबईच्या षण्मुखम सभागृहात झालेल्या पक्षीय सभेत वसंतराव नाईकांनी राज्यातल्या साठेबाजांना आणि नफेखोरांना झणझणीत इशारा दिला. पण तो देताना, व्यापक, अखिल भारतीय पातळीचे भान वसंतरावांनी सोडले नाही. भारत संरक्षण कायदा वापरण्याची परवानगी मध्यवर्ती सरकारने दिल्यास आपण साठेबाजांना आणि नफेखोरांना बरोबर वठणीवर आणू, असे विवेकी वसंतरावांनी सांगितले. दुसरा एखादा अविचारी आणि अव्यापक दृष्टीचा मुख्यमंत्री असता तर त्याने राज्यसरकारला असलेले अधिकार वापरून साठेबाजांचा आणि नफेखोरांचा बंदोबस्त करून टाकला असता; पण वसंतरावांच्या वत्सल व्यक्तिमत्त्वात हा आततायीपणा नाही. (नाही म्हणायला मागे स्वयंपूर्ण महाराष्ट्राबद्दल काही घोषणा करताना

आणि यंदाच्या विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्यावेळी सीमाप्रश्नावरील ठरावाबाबत विरोधीपक्षांशी संगनमत करतांना वसंतराव थोडेसे घसरले. अर्थात घसरूनही तोंडघशी न पडण्याच्या कलेत ते वाकबगार आहेत.) दुसरे उदाहरण आहे नुकत्या पुण्याला झालेल्या ताम्रपत्रवितरणाच्या समारंभाचे. या सभारंभाच्यावेळी पुण्यातले वातावरण तापले होते. भाववाढविरोधी आंदोलन जोरात होते. पण राज्यातल्या प्रक्षोभाने हा धीरगंभीर मुख्यमंत्री यत्किंचित विचलित झाला नव्हता. या समारंभात, भारत अणुबाँब निर्माण करण्यास समर्थ आहे, असे सांगून वसंतरावांनी समस्त श्रोतृसमुदायाला भाववाढ, महागाई, टंचाई, दुष्काळ, घाऊक व्यापाऱ्यांचा माजोरीपणा, किरकोळ दुकानदारांची लूटमार या वस्तुस्थितीतून उचलून एकदम वेगळ्या पातळीवर आणि वेगळ्या वातावरणात नेले. येथेही त्यांनी जागतिक राजकारणाचे जे व्यापक भान व्यक्त केले ते माझ्यासारख्या सूक्ष्म दृष्टीच्या अभ्यासकाला लक्षणीय वाटले. एखाद्या राज्यातले, राज्याच्या दृष्टीने जीवघेणे वाटणारे प्रश्न, वैश्विक पार्श्वभूमीवर किती फालतु वाटतात याची जाणीव राज्यातल्या नागरिकांनी ठेवली नाही तरी मुख्यमंत्र्यांनी ती ठेवायलाच हवी.

वसंतराव नाईकांच्या मूल्यमापनातील न्यून पुरते केल्याच्या अतीव समाधानात पेन खाली ठेवतो. (नाहीतरी पेनमधली शाईसुद्धा संपली आहे.) लेखनसीमा.

● ● ●

---

'केसरी'त लिहिलेल्या 'कारकुनीतील बत्तीस वर्षे' या आत्मपर लेखात प्रसिद्ध साहित्यिक श्री. ज. जोशी सांगतात : लेखनावर मला फारसे पैसे कधीच मिळाले नाहीत.

आधी कारकून; त्यात 'जोशी'; अशा माणसाला कितीही मिळाले तरी ते 'फारसे' असणार नाही. ¤

या वर्षाच्या सुरुवातीपासून ब्रिटनमध्ये राहून संशोधन करीत असलेले सोव्हिएत जननशास्त्रज्ञ डॉ. झोरेस मेदव्हेदेव्ह यांचे रशियन नागरिकत्व रद्द केल्याची घोषणा लंडनमधील सोव्हिएत दूतावासाने केली आहे. ¤

आत्तापर्यंत केंद्रशासित असलेल्या लखदीव, मिनिकॉय आणि अमीनदिवी या बेटांना यापुढे 'लक्षद्वीप' या नावाने संबोधण्यात येईल. तसेच म्हैसूर राज्याला 'कर्नाटक' असे नवे नाव लाभले आहे. ¤

'मेरिलिन मन्रो' या चरित्राचा लेखक मॉरिस झोलोटो याने नॉर्मन मेलर या प्रख्यात लेखकावर ६० लाखांच्या नुकसानभरपाईचा दावा लावला आहे. नॉर्मन मेलरने लिहिलेल्या 'मेरिलिन' या पुस्तकातील माहिती आपल्या चरित्रग्रंथातून चोरली आहे, अशी मॉरिस झोलोटोची तक्रार आहे. ¤

---

# तापलेल्या मुंबईतली विधानसभा

डॉ. अनिल अवचट

## उत्तरार्ध

विधानसभेतले वातावरण सीमा प्रश्न आणि घेराओने तापलेले होते तसे मुंबईतले वातावरण तेलाने तापलेले होते. अधिवेशनाच्या आधी काही दिवसच शिवसेनेने मटन दुकानदारांवर दबाव आणून मटन स्वस्त दरात विकायला लावले होते. अशाच किराणा दुकानाच्या एका प्रकारात कुर्ला येथे तीस तारखेला दंगलच उद्भवली. त्याच्या निषेधार्थ किराणा मालाच्या दुकानदार संघटनेने दुसऱ्या दिवशी दुकाने बंद ठेवली.

त्या दिवशी मुंबईत धुमाकूळ होता. दुकानदाराने दुकान बंद केले तरी शिवसैनिक तिथे जाऊन ते त्याला उघडायला लावीत. स्वतः भाव फलकावर वस्तूंचे भाव लिहीत. साखर दोन रुपये पंचावन्न पैसे, नारळ पन्नास पैसे, गोडेतेल सहा रुपये. इत्यादी. त्या भावाने त्याला विक्री करायला भाग पाडीत.

तेल साडेअकरा, बारा रुपये किलोपर्यंत पोहोचले होते, अशा वेळी सहा रुपयाने तेल मिळतेय पाहिल्यावर माणसे, बायका, पोरे सगळे दुकानांच्या दिशेने धावू लागली. प्रत्येक दुकानासमोर मोठमोठ्या रांगा दिसू लागल्या. दुकानापाशी शिवसेनेचा एखादा झेंडा आणि वाघाच्या जबड्याखाली भावफलक.

मुलांनी शाळा बुडवल्या. पुरुष माणसांना ऑफिसात कळताच अर्ध्या दिवसाची दांडी मारून डबे, बाटल्या घेऊन ते रांगा धरू लागले. गोरेगावपासून फोर्टपर्यंतचा भाग पाहिला. रांगा नाहीत असा भाग सापडला नाही. इथला माल संपला म्हणून लोक दुसरीकडे धावत. तोपर्यंत तिथला संपलेला असे. या धावपळीत माहिमचा माणूस

ताडदेवला कसा येऊन पोहोचला हे त्याचे त्याला कळत नसे. माझा टॅक्सीवाला साऊथ इंडियन होता. त्याचाही या बाबतीत शिवसेनेला पाठिंबा होता. एरवी मिशाळ उग्र चेहेऱ्यांच्या शिवसैनिकांच्या वाऱ्याला उभ्या राहणार नाहीत अशा स्त्रिया आज त्यांच्याशी कुठे तेल मिळेल हो, या विषयावर मोकळेपणाने बोलत होत्या. अशाच एका शिवसैनिकाला पाच-दहा ब्राह्मण बायकांनी घेरले होते. त्या म्हणत होत्या, 'आम्हाला दुकान नुसते उघडून द्या, पुढचे काय करायचे ते आम्ही बघतो' शिवसैनिक कपाळाला हात लावीत होता.

विधानसभा भवनात पत्रकार मंडळी भेटली. गप्पा याच विषयावर चालल्या होत्या. एकजण म्हणाला, इट इज फर्स्ट टाईम दॅट शिवसेना हॅज टेकन इकॉनॉमिक इश्यू.

दुसरा म्हणाला, शिवसेना हॅज स्नॅचड् दी इनिशिएटिव्ह ऑफ लेफ्ट पार्टीज. तिसरा म्हणाला, पण किरकोळ दुकानदारांना धरून काय उपयोग आहे? खरे चोर हे बडे व्यापारी आहेत. चवथा म्हणाला, पण ठाकरे म्हणताहेत, उद्या शिवसेना या रिटेलर्संना घेऊन बड्या व्यापाऱ्यांच्यावर मोर्चे काढणार आहे. एकजण म्हणाला, बघू या काय होतंय ते.

सगळ्या प्रकारात पोलिस तटस्थ होते. एक दिवस मुंबईला वाऱ्यावर सोडल्यासारखे वाटत होते. एका संबंधित मंत्र्यांना पत्रकार छेडत होते की पोलिस काय करत आहेत. ते म्हणत होते पोलिस कारवाई करीत आहेत. एक म्हणाला, कुठे दिसत नाही. मंत्री म्हणाले, दुकानासमोर निदर्शने करण्याचे कुणालाही स्वातंत्र्य आहे. पण ते दुकानात घुसले तर पोलिस अटकाव करतील. पत्रकार म्हणत होते, तुम्ही म्हणता असे कुठे घडताना दिसत नाही.

तेवढ्यात विधानसभेची बेल वाजली. पत्रकार प्रेस गॅलरीत जाऊन बसले. ¤

कालच्या धक्काबुक्कीच्यावरून आज बराच गदारोळ होणार असा अंदाज होता, हे निमित्त चांगलेच मिळालेले, सोडेल कोण? आज पॉईंट्स् ऑफ ऑर्डर्स, अडथळे यांची खैरात होणार असे दिसत होते. नेहेमीप्रमाणे एक वाजता सभागृह भरले. सभापती आले. उभे राहून त्यांनी म्हटले, काल या आवारात घेराव आणि त्यातून उद्भवलेल्या घटनांविषयी खेद प्रकट करण्यासाठी सभागृह उद्या दुपारपर्यंत तहकूब करीत आहे.

काँग्रेस सदस्यांनी बाके बडवली. सगळे उभे राहिले. वर वार्ताहर फोन करायला पळाले. काँग्रेस आमदार 'कशी जिरवली'च्या आविर्भावात विरोधकांकडे पाहून हसत होते. शे. का. पक्षवाले तरी नाईकांभोवती जमून जोक मारून हसत होते. मृणाल गोरे या प्रकारावर रागावून सभागृहातून बाहेर निघून गेल्या.

हे सगळे इतक्या पटकन झाले की आमदार अजून सभागृहाच्या दिशेने येत

होते. तोच ही परत येणारी मंडळी त्यांना खाली भेटली. एका येणाऱ्या माणसाला परतणाऱ्याने सांगितले,

'शाळा सुटली' तो म्हणाला, शाळा सुटू देरे' ते सही करायचं पुस्तक आहे ना बाहेर ? मग बस झालं.

कालची सी. एम. ची सुटका करणारी मंडळी एकत्र फिरत होती. काँग्रेसवाले कौतुकाने त्यांना दाद देत होते. पाठीवर थाप मारीत होते.

वरची विधानपरिषदही अशीच तहकूब झाली.

आजचा दिवस अनपेक्षित घटनांचा होता. सकाळी तेलप्रकरण आणि आताचे हे तहकूबी प्रकरण. तशात आणखी तिसरे एक अनपेक्षित घडायचे होते.

दुपारी जनसंघातर्फे किरकोळ दुकानदारांचा मोर्चा विधानसभेवर आला. पण विधानसभा आधीच तहकूब झाली होती. तेव्हा त्यातले चाळीस-पन्नासजण तिथून दुपारी ४॥ च्या सुमारास सचिवालयाजवळ गेले. त्यात पंधरा-वीस स्त्रिया आणि इतर पुरुष होते. त्यात सिंधी लोकांचा भरणा अधिक होता. सचिवालयाच्या आवारात एकेक करून शिरले. आतल्या पोर्चपाशी जमून घोषणा द्यायला सुरुवात केली. निदर्शक थोडे होते पण जोरदार होते. घोषणाही तशाच. नाईक कौन है, इंदिराजीका चमचा है, इत्यादी. कुणाही मंत्र्याला बाहेर पडायला मनाई केली. तिथे त्यावेळी हा मोर्चा अनपेक्षित असल्याने पोलिस थोडेच होते. नाईकांची लांबलचक गाडी आली. निदर्शक त्यावर आडवे पडले. कोणी त्यांच्या गाडीवरचा तिरंगी झेंडा उपसून काढला. वरून पोलिसांच्या गराड्यात नाईक आले. स्त्री निदर्शकांतून वाट काढताना पोलिसांची पुरेवाट झाली. स्त्री पोलिस तिथे नव्हते. पोलिस स्त्रियांना बाजूला काढायचा प्रयत्न करू लागताच तिथे उभ्या असलेल्या विरोधीपक्षीय आमदारांनी त्याला ऑबजेक्शन घेतले. नाईक कसेबसे बाहेर पडले. गाडीत बसले आणि निघून गेल.

या दरम्यान साहेबराव हंगरगेकर, विमल रांगणेकर, आणखी एकदोघे अशी काँग्रेसची आमदार मंडळी सचिवालयात कामाला गेली होती. हा प्रकार काहीवेळ पाहून ती आमदार निवासाकडे पायी परतत होती. मोर्चातले काही लोक सचिवालयाकडे गटाने जात होते. त्यापैकी काहींनी त्यांना अडवले. साहेबराव हे पंढरपुरचे आमदार. उंच, जाडजूड, प्रौढ, गांधी टोपी, नेहरू शर्ट धोतर असा खास काँग्रेसचा वेष. त्यामुळ त्यांना पाहून ते चारसहा लोक धक्काबुक्की करायला लागले. एकाने त्यांची टोपी पाडली. साहेबराव गडबडीने पुढे निघून गेले. त्यांच्या बरोबरच्या एकदोघांना निदर्शकांनी गाठले. त्यांना सोडवायला रांगणेकरबाई मागे धावल्या. त्यांनी दरडावताच ती मंडळी पळून गेली. साहेबरावांच्या टोपीने नंतर त्यांनी एकमेकांचे बूट पॉलीश केले. शेवटी ती जाळून टाकली.

हा प्रकार आमदार निवासासमोर रेडिओ स्टेशनच्या गेटपाशी घडला.

बरेच आमदार बघत असूनही कोणी पुढे झाले नाही.

तेवढ्यात त्रिभूवन नावाचे काँग्रेसचे आमदार तिथून जात असता त्यांना कुठूनतरी दगड येऊन डोक्याला जखम झाली. बरोबरच्या आमदारांनी जखम दाबून धरून त्यांना आणले. रक्ताने भरलेला हात आमदारांना दाखवत ते म्हणाले, अरे, हा काय प्रकार आहे? त्यावर बरेचसे आमदार धावले. तो पावेतो पोलिसांनी एका पळणाऱ्या मुलाला संशयावरून पकडून पोलिसांच्या जीपमध्ये ठेवले होते. आमदार तिथे पोहोचले. त्यांनी गाडीतून त्याला ओढून पिटायला सुरुवात केली. इन्स्पेक्टरने सांगितले की तो आमच्या अटकेत आहे. त्याला हात लावू नका, पण त्याचे कोणी ऐकले नाही.

रात्री काँग्रेसपक्षाच्या मिटींगमध्ये आमदारांनी संतप्त होउन पोलिसांवर खूप टीका केली. या राज्यात आमदारांना संरक्षण मिळणार आहे की नाही? इथली शाश्वती नसेल तर आम्ही आमच्या मतदारसंघात परत जातो. खापर्डे नावाच्या खासदार बाईंनी पोलीस आपल्याशी कसे उद्धट वागले याची हकीगत सांगितली.

त्या हा प्रकार सी. एम. च्या कानावर घालायला निघाल्या होत्या पण सचिवालयाबाहेर पोलिसांनी त्यांना आत जाऊ दिले नाही. त्यांनी आपण काँग्रेस खासदार आहोत, हे पहा माझे कार्ड, म्हणून सांगितले. पण त्यांनी खादीचे पातळ नेसले नव्हते. नायलॉनचे नेसले होते. त्यामुळे पोलिसांनी त्यांना जाऊ दिले नाही.

नाईकांनी सगळ्यांना सबुरीचा सल्ला दिला. ◻

दुसऱ्या दिवशीच्या दैनिक पेपर्समध्ये सचिवालयासमोरच्या प्रकाराचे आणि तेल आंदोलनाचे बरेचसे फोटो आणि बातम्या होत्या. तरी प्राधान्य सचिवालयासमोरच्या प्रकारालाच होते. तेल आंदोलन मागे घेतल्याची ठाकऱ्यांची घोषणा होती. सर्वजण चाट झाले. आंदोलनाने वेग घेताच गाडी बंद पडावी असे वाटले. कालच त्यांनी किरकोळ दुकानदारांना घेऊन होलसेलर्सवर मोर्चे नेणार असे म्हटल्याचे ऐकले होते. आणि रात्री बारा की दोन वाजता, सरकारला एक संधी देण्यासाठी आंदोलन स्थगित करीत असल्याचे पत्रक काढले.

असे जरी असले तरी दिवसभर लोकांचे आंदोलन कालच्यासारखेच चाललेले दिसत होते. फक्त वातावरणातला ताण कमी झाला होता. बहुतेक किराणा दुकाने बंदच होती. ती उघडायला लावण्यासाठी जमाव जमतच होते, काल शिवसेनेने अधिकृतपणे भाग घेतला होता. त्यामुळे त्यांचे उत्तेजन जसे होते तसे सर्वांवर काही बंधनही होते. आज तसले काहीच नसल्याने जमाव बेवारशीपणे या दुकानांहून त्या दुकानावर इतस्ततः भटकत होते.

ही परिस्थिती गावात होती. विधान-

सभेच्या परिसरात कालच्या प्रकाराचा दणकाच जास्त जाणवत होता. काँग्रेस आमदार जोरजोरात चर्चा करीत होते. विरोधी आमदार कुठे दिसतच नव्हते. एक काँग्रेस आमदार म्हणाले, काल पोलिसांनी जे वर्तन केले ते न समजण्यासारखे आहे. या जनसंघी लोकांचा पोलिसात भरणा झालाय असा माझा संशय आहे. परभणीचे इक्बाल म्हणाले, परवाच्या घेरावच्या प्रकारात मी होतो. सचिवालयासमोरच्या निदर्शकांना एका इन्स्पेक्टरने हे ते इक्बाल म्हणून माझ्याकडे बोट करून दाखवले. त्याबरोबर माझ्या नावाच्या मुर्दाबादच्या घोषणा झाल्या. मिराशी, लोणारी, होशिंग यांच्याबद्दल होत होत्याच.

स्वतःस सामाजिक विचारवंत म्हणवणारे एक आमदार म्हणत होते, पोलिसांचे हे वर्तन पाहून आम्हाला सर्वच गोष्टींचा विचार केला पाहिजे. मला तर यात बंडाळीची चाहूल दिसते.

बऱ्याच आमदारांच्या बोलण्यात एक समान गोष्ट अशी की इथे असे करणार असाल तर आम्ही खेड्यात जाऊन तिथे असे सुरू करू. (थोडक्यात, अठ्ठेचाळीसच्या गांधी व धोतर प्रकाराची पुनरावृत्ती.) कँटीनमध्ये आम्लेट, टोस्ट हाणताना थोड्या संभावीत शब्दात एक म्हणाले, या जनसंघी लोकांनी विचार केला पाहिजे की या वर्तनाचा खेडोपाडी काय परिणाम होईल.

तेवढ्यात एक विरोधी आमदार भेटले. ते म्हणाले, पोलीस जेव्हा कमी असतात तेव्हा ते बघ्याची भूमिकाच घेतात, त्यांचा फोर्स येतो तेव्हा ते ॲक्शन घेतात. हे नेहमीचेच आहे. आमच्याबाबतीत हे नेहमीच घडते. काँग्रेसवाल्यांच्या बाबतीत ते काल घडले म्हणून बोंबलताहेत, झाले.

बेल वाजली, आणि पाच मिनिटांनी सभापतींचे आगमन झाले.

काँग्रेसचे शिवाजीराव पाटील ठराव मांडायला उठले. काल जनसंघाने राष्ट्रध्वजाचा अपमान आणि गांधी टोपीची अप्रतिष्ठा केली त्याच्या निषेधाचा त्यांचा ठराव होता. ठरावातली एकदोन वाक्ये वाचत आहेत तोच म्हाळगी, डी. बी. पाटील उभे राहून जोरजोरात बोलू लागले. सभापतींनी त्यांना खाली बसायला सांगितले. त्यावर अधिकच मंडळी उठून बोलू लागली.

साधारणपणे माणूस कधी बोलतो, निदान एक माणूस तरी ऐकत असेल तेव्हा. इथे विरोधी सभासदांना तशी जरूरी वाटत नव्हती. सभापती महाराज, असे म्हणून एकाच वेळी बरेच वक्ते बोलत रहात. सभापती काय, शेजारच्या माणसाला एक वाक्यसुद्धा समजत नसे. पण तरीही पाचपाच मिनिटे बोलणे चाले.

गडबडीत बंडखोर काँग्रेसचे ए. टी. पाटील उभे राहिले. त्यांना मात्र सभापतींनी बोलायची परवानगी दिली. त्यामुळे इतर विरोधी आवाजही कमी झाले. ए. टी. पाटील म्हणाले, काल राष्ट्रध्वज आणि गांधी टोपी यांचा जनसंघाने जो अपमान केला त्याच्या

निषेधार्थ आम्ही लोकशाही आघाडीचे आमदार सभात्याग करीत आहोत. असे म्हणून ते आणि पाचसहा लोक निघून गेले.

विरोधक बघतच राहिले. काँग्रेस-वाल्यांनी खिजवून बाके वाजवली.

मृणाल गोरे उभ्या राहिल्या आणि म्हणाल्या, मलाही एक निवेदन करायचे आहे. सभापती म्हणाले, तुम्ही खाली बसा. त्या म्हणाल्या, ए. टी. पाटलांना का परवानगी दिली ? ही पार्श्यालिटी का चालली आहे ? पण सभापतींनी त्यांचे न ऐकता शिवाजीराव पाटलांना परत ठराव मांडायला सांगितले.

त्याबरोबर मघाचे सगळे विरोधक परत उभे राहून बोलत राहिले. सभा-पतींनी डी. बी. पाटलांना बसायला सांगितले. ते ऐकेनात तेव्हा सभापती म्हणाले, तुम्हाला इथले कामकाज चालू द्यायचे नाही असे दिसते आहे. काल मी तुम्हाला ठराव वाचायची उगीच परवा-नगी दिली असे आज मला वाटत आहे. माझ्या वागणुकीचा तुम्ही गैरफायदा घेत आहात. मी तुम्हाला बोलायला परवानगी देणार आहे. तरी तुम्ही बोलू देत नाही.

गडबड चालूच.

सभापतींनी नावे घ्यायला सुरुवात केली. मिस्टर डी. बी. पाटील, मिस्टर कारखानीस, मिस्टर म्हाळगी...' अशी नावे घेताना जे शांत बसले होते त्यांनाही 'तुम्ही सामील आहात काय' असे विचारायला सुरुवात केली. शे. का. पक्षाच्या एकदोन आम-दारांनी नाही म्हणून सांगितले. सुटा-मधले एक गोरेपान कृश गृहस्थ मागे बसले होते. त्यांना सभापतींनी विचारले, मिस्टर बनातवाला, आर यू आॅल्सो जाॅइनींग देम ? बनातवाला उठून हात पुढे करून खांदे उडवून म्हणाले, 'यस सर, आय अ‍ॅम फोर्स्ड टू डू दॅट' सर्वजण हसले.

सर्व नावे घेऊन झाल्यावर सभापती म्हणाले, नियम क्रमांक अमुक प्रमाणे मी यांचे सदस्यत्व तीन दिवस रद्द करीत आहे. त्याचबरोबर आजची सभाही उद्या दुपारपर्यंत तहकूब करीत आहे.

सर्वजण उठले, आणि चालू लागले.

वर विधान परिषद एव्हाना सुरू झाली.

हे सभागृह लहान होते. एकंदर सीन कोर्टासारखा. सभापती वि. स. पागे आले. काँग्रेसचे श्री. शिंदे ठराव वाचून दाखवू लागले. शे. का. पक्षाचे एन्. डी. पाटील उठून बोलू लागले. पागेंनी समज दिली. शेवटी तीन दिवस सदस्यत्व रद्द आणि आजची मिटींग अ‍ॅडजर्न. ◻

तीन दिवसाचे रामायण संपले.

दुसऱ्या दिवशीची विधान सभा विरोधकांशिवाय भरणार होती. त्यामुळे तिथे आता काय होणार असे वाटले. त्या दिवशी बऱ्याचशा काँग्रेस आमदारांनी जनसंघावर तोंडसुख घेतले. शिवाजीराव पाटील तर ठराव मांडणारे. पी. बी. पाटलांनी तर जन-संघावर कविताच केली. अलिकडे कवि-

तांचा सार्वजनिक ठिकाणी फारच उपद्रव होऊ लागला आहे. धोंगड्यांचा रोडगा, परवा दुष्काळ निवारणार्थ कविसंमेलन होते तिथे वि. म. दांडेकरांना आलेली काव्य सुरसुरी ही अलिकडची उदाहरणे. तास-तास बोलून बोटभरही रिपोर्ट येत नाही. आणि या चार ओळी मात्र ब्लॅक टायपात चौकटीत छापून येतात. म्हणून ही ट्रीक आता पॉप्युलर झाली आहे.

श्रीपतराव बोंद्रयांनी तर सर्वांवर मात केली. जनसंघाने त्रिभुवन या दलित आमदाराचे ठरवून डोके फोडले असा त्यांनी आरोप केला. चार-सहा लोकांवर एक दगड येतो, तो नेमका त्रिभुवन या दलिताला लागतो, हा सगळा चमत्कारच. बोंद्रयांच्या म्हणण्याप्रमाणे असेल तर जनसंघ सदस्यांना विमानविरोधी तोफांचे युनिटच चालवायला दिले पाहिजे.

जनसंघाच्या हुकूमशाहीचाही प्रत्येकजण उल्लेख करीत होता. गेल्या तीन दिवसात मला जनसंघाकडून तर कुठून हुकूमशाहीचा प्रत्यय आलेला नव्हता.

तीन दिवसाच्या गडबडीवर अखेर काँग्रेसने मात करून सगळे खापर विरोधकांवर, विशेषतः जनसंघावर फोडण्यात यश मिळवले आहे या परिस्थितीत विरोधकांनी काय करायला हवे होते, याचीही चर्चा आवारात आणि बाहेर होत होती. पहिले म्हणजे वसंतराव नाईकांनी मी ठराव मांडू शकत नाही म्हणताच तोच ठराव, 'कडक' न करता तसाच विरोधकांनी मांडायचा होता. म्हणजे एकतर तो संमत होण्याची शक्यता होती. नाहीतर काँग्रेसची पंचाईत तरी नक्की झाली असती. दुसरे म्हणजे घेरावनंतर मिटींगमध्ये शिवाजीराव पाटलांच्या ठरावाच्या वेळी गडबड करून तीन दिवस सदस्यत्व रद्द करून घेतले ही दुसरी चूक. त्या चर्चेत काँग्रेसला गप्प करता येईल असे खूप बोलण्यासारखे मुद्दे होते. ते प्रेसला आले असते.

या सगळ्या गोष्टीत एका गोष्टीची जास्त खंत वाटते. विधानसभा किंवा संसद हे जनमानसाचे प्रतिबिंब उमटविण्याचे मुख्य ठिकाण. पण तिथे बाहेर फारसा कुणाच्याही डोक्यात नसलेला सीमा प्रश्नच गाजत राहिला. पहिल्या दिवशी निदान सीमा प्रश्न तरी होता. पण त्यानंतरचे तीन दिवस, नंतरच्या घेरावो भोवतीच फिरत राहिले.

घेराओने विधानसभा वातावरणाला जी गती आली, ती थोपवून त्यावेळेस महाराष्ट्रात भडकलेल्या महागाईकडे कोणीच लक्ष वळवू शकले नाही. मुंबईतील सर्व सामान्य लोक त्या तीन दिवसात उत्स्फूर्तपणे तेल आंदोलनात उतरले असता विधानसभेत मात्र दोन इंच शर्ट फाडला, कंबरेत लाथ मारली हेच प्रश्न शेवटपर्यंत ज्वलंत वाटत होते.

हे सर्व सत्तारूढ पक्षाला हवेच होते. नाईकांनी सीमा प्रश्न स्वहस्ते विरोधकांच्या गळ्यात बांधला. तिथेच सगळे डावपेच फसले. विरोधकांमध्येही कोणाएकाची ताकद आज अशी दिसत नाही की जो इतर विरोधकांना गप्प बसवून

लोकांच्या विशिष्ट प्रश्नांवर विधानसभा कामकाज केंद्रित करील. सर्वात आश्चर्य म्हणजे ज्या शिवसेनेचे आंदोलन बाहेर येवढे गाजत होते त्यांचे आमदार प्रमोद नवलकर आणि मनोहर जोशी हे तिथे गप्पच होते. त्यांनीही या प्रश्नाची तड लावली नाही. या सगळ्या गडबडीत तीन दिवस सदस्यत्व रद्द करून तर विरोधकांनी अगदी अखेरची संधी सुद्धा गमावली.

या तीन दिवसात नाईकांनी मिटिंग घेऊन भाव वगैरे ठरवण्याचे नाटक केले. हे भाव आजच्यापेक्षा जरा कमी असले तरी काही महिन्यांच्या पूर्वीच्या भावाच्या तिप्पट चौपटही आहेत. म्हणजे वाढीव भावाला राजमान्यता अर्पण करण्याचाच हा कार्यक्रम झाला.

या अधिवेशनानिमित्ताने विरोधकांचे वर्तन लोकशाहीला धरून होते का याचीही चर्चा झाली. कॉंग्रेस पक्षीयांचे म्हणणे असे. सभागृहाच्या आवारात प्रत्येक लोकप्रतिनिधीस काही हक्क असतात. घेरावसारखी तंत्रे रस्त्यावर वापरा. पण इथे ते लोण नको. कारण मग काम करणेच अशक्य होईल. या म्हणण्यात फारसा दम नाही. एकतर घेराओ हे आता सत्याग्रही तंत्र झाले आहे. आमदारांनी सी. एम.ना घेराओ घातला तर सी. एम.नी सभापती मार्फत मार्शलकरवी आपली सुटका करून घ्यायची. हा सोपा आणि राजरोस मार्ग. जी शिक्षा होणार असेल त्याला घेराओ घालणाऱ्यांची तयारी असल्यावर काही हरकत उरत नाही.

भाषणात अडथळे आणावेत का, सभागृहाचे कामकाज बंद पाडावे का असेही आक्षेप आहेत. इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्सची तुलना करता असे प्रकार संसदीय शिष्ठाचारात बसत नाहीत आणि आपण बऱ्याच काळाचे अल्पसंख्य आहोत ही भावना विरोधकांमध्ये असताना ही तंत्रे अधिकाधिक वापरली जात आहेत. तिकडली लोकशाही इकडे घेताना ती जशीच्या तशी येऊ शकणार नाही, काही बाबतीत इष्टही नाही. हे उघड आहे. पण ही तंत्रे तुम्ही कशी आणि कशासाठी वापरता यावरच त्यांचे समर्थन अवलंबून आहे. उदाहरणार्थ, सरकार महागाईचा प्रश्न टाळीत असेल आणि विरोधकांचा तो चर्चेला आणायचा निग्रह असेल, तेव्हा तुम्ही आरडा ओरड करणे हे बाहेरच्या लोकांना समजू शकते. पण एरव्ही नाही. सभात्याग तर आता इतके सर्वत्र झाले आहेत की त्याचा ती बातमी वाचणाऱ्यांवर जरासाही परिणाम होत नाही. अशा तंत्राचे महत्त्व आणि प्रतिष्ठा ही विरोधकांनीच सांभाळायला पाहिजे.

'खेडोपाड्या'चा उल्लेख करणारी कॉंग्रेसवाली मंडळी खड्यातल्या महागाई प्रश्नाला हात घालीत नव्हती. पण हे समजू शकते. सत्तारूढपक्षाचा पिंड यापेक्षा फारसा वेगळा काय असणार ? पण विरोधक आमदारसुद्धा महागाई आंदोलनात रस्त्यांवर फिरताना, माहिती घेताना किंवा उत्तेजन देताना

पृष्ठ ३३ वर

# कलकत्ता मेल

## सौ. तारा पंडित


### दोन्ही घरचा पाहुणा....

२७ जुलै हा दिवस उगवला आणि मावळला. ज्यांना हरताळ पाळायचा त्यांनी पाळला. नव्हता पाळायचा त्यांनी नाही पाळला. रस्त्यावर वातावरण मोठं विचित्र होतं. हरताळ आहे असंही वाटेना अन् नाही असंही वाटेना. दोन्ही परस्परविरोधी मतांच्या लोकांनी मिरवणुका काढल्या आणि चौकाचौकातून त्या एकमेकींना आडव्या आल्या. आता 'काहीतरी' होणार ह्या आशेने कशाशीच काही कर्तव्य नसलेले अनेक बघे लोक रस्त्यावर येऊन उभे राहात होते. पण त्यांचा अपेक्षाभंग होत होता. सवयीचा परिणाम! ज्यांना सदैव खून, मारामाऱ्या पाहायची सवय त्यांना शांतपणाही बोचायला लागतो हेच खरं! आश्चर्य म्हणजे ह्या 'बघ्या' लोकांना कशातच काही इंटरेस्ट नसतो. हरताळ पाळलेल्यांमध्ये अशांचाच भरणा अधिक. नाहीतरी कुणा लेकाला काम करायला आवडतं इथे? तेवढीच सुटी!

काही सरकारी नोकर आपल्याला कर्तव्याची फार जाणीव असल्याचा आव आणीत होते. रायटर्स बिल्डिंगमध्ये काम करणारे कारकून लोक तर तेथेच रात्रभर जागून पत्ते खेळत होते नि चहा पीत होते. सारी रात्र अशी जागून काढल्यावर दुसऱ्या दिवशी त्यांनी ऑफिसमध्ये कितीसं काम केलं असेल ह्याची कल्पनाच करावी. नुसती हजेरी लावण्यापुरतंच कामाच महत्त्व असतं. तेवढं त्यांनी केलं पण तेवढ्यासाठीही मुख्यमंत्र्यांची शाबासकी मिळवली. घरी जाताना ट्राम, बसेस फार कमी असल्यामुळे गैरसोय होत होती. मुख्यमंत्र्यांनी पोलिसांना हुकूम दिला, 'अरे, ह्यांची घरी जाण्याची काही व्यवस्था करा. हाल होताहेत त्यांचे!' अन् मग पोलिसांनी आपल्या गाड्यांमधून साऱ्या सरकारी नोकरांना पोचवलं. रोजच्यापेक्षा अधिक लवकर नि अधिक आरामात ते घरी पोचले.

बसवाल्यांनी भीतभीत थोड्याशा बसेस रस्त्यावर आणल्या. ट्रामचे ड्रायव्हर-कंडक्टर आज गणवेशात नाहीत हे ट्रामचं तिकीट घेताना माझ्या लक्षात आलं. टॅक्सीज् चालतच नव्हत्या म्हटलं तरी चालेल. प्रायव्हेट कारवाले काहीजण मुद्दाम उत्तर कलकत्त्यापासून दक्षिण कलकत्त्यापर्यंत सफर करून आले आणि आमची गाडी एक ओरखडाही न उमटता सुरक्षित राहिली म्हणून अभिमानाने सांगू लागले. बिचारे रिक्षा ओढणारे गिऱ्हाइकाची वाट बघत उभेच होते, कारण त्यांचं पोट हातावर!

दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रातून मुख्यमंत्र्यांनी लोकांचं जाहीर अभिनंदन


सांगायलाच् हवं का?
SATHE MALTex BISCUITS
SATHE MALTex BISCUITS
ताजी, कुरकुरीत व रुचीला आगळीच- वा! ही तर साठे माल्टएक्स बिस्किटेच!
ही आगळी वेगळी रुचिसंपन्नता माल्टमुळेच या बिस्किटात आहे. पचायला हलकी व भरपूर पोषक द्रव्ये असलेली माल्टएक्स बिस्किटे कितीही खा पुन्हा पुन्हा खावीशी वाटतात ती या माल्टमुळेच!
साठे बिस्किटे
आजच खरेदी करा अन् फरक पहा जरा!
'heros'-SBC-49 C MAR

केलं, हरताळ हाणून पाडला म्हणून! अन् तिसऱ्या दिवशी कुठेकुठे अनुचित प्रकार घडल्याच्या नि पाचजण मृत्युमुखी पडल्याच्या बातम्या बाहेर आल्या. त्यात एक अठरा वर्षांचा कोवळा मुलगाही अकारण प्राणाला मुकला.

नेहमीच्या मानाने हे एक अनोखं चित्र होतं. मात्र, नेहमी कसं, हरताळ म्हटला की एकमत व्हायचं, तसं ह्यावेळी घडलं नाही.

२७ जुलै उजाडण्यापूर्वी सभांचा नुसता भडिमार चालला होता. काँग्रेस नि CPM च्या सभा व्हायच्या. जनतेला जो तो आपल्याकडे खेचीत होता. 'हरताळ पाळा', 'हरताळ पाळू नका' ही विरुद्ध विधाने मांडली जात होती. पण मुख्य मुद्दा बाजूलाच पडत होता. ज्या कारणासाठी हे चाललं होतं त्याबद्दल कोणीच विचार करीत नव्हतं. आवश्यक वस्तूंच्या भाववाढीचा नि दुर्मिळतेचा मुख्य प्रश्न होता. एवढं करूनही वस्तूंचे भाव उतरले म्हणता? नावच नको. उलट एका वस्तूबरोबर सगळ्या वस्तूंचे भाव कडाडले. बिचारी जनता! हरताळ पाळला काय, न पाळला काय, जास्त भाव देऊन कमी वस्तू घेत आहे, जे मिळत नाही त्याबद्दल, मूग गिळून बसते आहे. तिचा वाली कुणीच नाही! राजकारणी माणसं आपले डाव खेळून जातात पण सामान्य माणूस तसाच राहतो. दोन्ही घरचा पाहुणा उपाशी अशीच त्याची गत झालीय!

□

## व्हीट ब्रॅन स्कॅंडल

एका वर्षात चाळीस लाखाची इस्टेट! अबबब! कल्पनाच करवत नाही. पण भारताच्या एका सुपुत्राने (?) करून दाखवली. कशी? गव्हाचा कोंडा विकून. कुठे? रेशनच्या दुकानामधून. ह्या महाभागाचं नाव प्रभुदयाल. अस्सल मारवाडी! राजस्थानचा! हा प्रभुदयाल कलकत्त्यातल्या अनेक रेशन दुकानांचा मालक. पण फक्त दोनच दुकानांचा पत्ता लागला पोलिसांना. आणि हा प्रभुदयाल सापडला एके दिवशी पहाटे हावऱ्याला लपून बसलेला. त्याच्याबरोबर आणखी तीन साथीदारही सापडले. ह्या प्रभुदयालने तर चोवीस परगण्याच्या डिस्ट्रिक्ट कंट्रोलरकडून परवानगी देखील काढली होती नेपाळमधून तांदूळ आणण्यासाठी. हे सारे ऐकून आश्चर्याचा धक्काच बसला. मग खात्री पटली आपल्या देशात सगळं आहे, अन्न आहे, पैसा आहे, फक्त ह्या मौल्यवान वस्तू लपवून ठेवलेल्या आहेत अशा नरराक्षसांनी अन् म्हणून सामान्य माणसाला हाल भोगावे लागत आहेत.

संध्याकाळी मारवाड्याच्या दुकानात काही सामान आणायला गेले होते. (मारवाड्यांच्याच दुकानात जावं लागतं नाहीतरी!) त्याला म्हटलं—'शेटजी आजची बातमी कळली? तुमचाच जातभाई तो! तुम्ही किती सरळ मनाने व्यापार करता. ह्या माणसाने तर काळिमा फासला तुमच्यासारख्यांना

आणि 'कल्याण' मासिकाच्या श्री. हनुमान प्रसाद पोद्दार, श्री. गोयनका यांच्यासारख्या निस्वार्थी लोकांना! एका वर्षात चाळीस लाखाची इस्टेट केली पठ्ठयाने!'

मारवाडी म्हणाला, (तोही त्यातलाच, पण चांगुलपणाचा आव आणला त्याने)—अहो, कित्येक लाखांची इस्टेट केली असणार त्याने तेव्हा कुठे पेपरमध्ये चाळीस लाखांचा आकडा छापलाय्. हे लोक असेच. करणार काय? आम्हालाच लाज वाटते.

दुसऱ्या दिवशी आणखी आश्चर्यकारक बातमी— अन्नमंत्री श्री. काशीकांत मोहत्र यांचा सी. ए. (विश्वासू हस्तक) श्री. अरूण दासगुप्त ह्यालाही पकडण्यात आलं. तोही ह्या व्हीट ब्रॅन स्कॅंडलमध्ये सामील असल्याचा पत्ता लागला. घ्या आता. अस्तनीतच निखारे सापडू लागल्यावर काय करणार! रोज समोरच्या दाराने जाणारा माणूस नेमका त्याच दिवशी मागच्या दाराने बाहेर पडला पण पोलिसांच्या हातून सुटू शकला नाही. अन्नमंत्र्यांचा वास्तविक जिवलग स्नेही हा. पण त्यांनी मुळीच पर्वा केली नाही. आता ह्या गृहस्थाला 'लालबझार'मध्ये सर्वसाधारण कैद्यांप्रमाणे — त्यांच्याचमधला एक म्हणून सामान्य खोलीत ठेवण्यात आले आहे जेथे पंखादेखील नाही! अशा तऱ्हेची ही घटना पहिलीच असावी. सरकार असाच शोध घेत राहील तर घरातच कित्येक चोर सापडण्याचा संभव आहे!

● ● ●


---

**नापाम....**

संयुक्त राष्ट्रसंघाने तयार केलेल्या एका अहवालानुसार, विकसनशील राष्ट्रे युद्धात यापुढे नापाम बॉंबचा उपयोग अधिकाधिक करतील, याचे साधे कारण असे आहे की तो इतर विध्वंसकांपेक्षा स्वस्त आहे. नापामला पेट्रोलियम ऑईल लागते. त्याचा एका मेट्रिक टनाचा बाजारभाव १५० रुपये आहे. इतर विध्वंसकांना लागणाऱ्या पांढऱ्या फॉस्फरसची एका मेट्रिक टनाची किंमत ३००० रुपये आणि मॅग्नेशियमची किमत ५००० रुपये आहे.

नापाममुळे इजा पोचलेल्या रुग्णांवर उपचार करणे गरीब राष्ट्रांना परवडण्यासारखे नाही. तीस टक्के भाजलेल्या १००० पीडितांना योग्य उपचारसाहाय्य करण्यासाठी इस्पितळात २५० अनुभवी डॉक्टर्स, १५०० परिचारिका, ६००० लिटर्स रक्त, आणि १६००० लिटर्स मिठाचा विशिष्ट द्राव, अशी व्यवस्था लागेल.

व्हिएतनाम युद्धात आणि आफ्रिकेतील पोर्तुगीज वसाहतीत नापाम बॉंब सर्रास वापरले गेले. संयुक्त राष्ट्रसंघ त्या बाबतीत काही करू शकला नाही. □



# नवे लुटारू

डॉ. उषा महाजनी

भारतात आणि दक्षिणपूर्वेकडील अशियाई देशात हिंदू आणि बौद्ध कलाकारांनी अतिशय लहानात लहानापासून तो भव्यातिभव्य अशा अप्रतिम कलाकृती शेकडो वर्षांपासून निर्माण केल्या आहेत. ह्या कलानिर्मितीच्या मागे धार्मिक वृत्तीच होत्या. हिंदू व बौद्ध जगताचे दुर्दैवच म्हणायचे, की पश्चिमेकडून व उत्तरेकडून क्रूर टोळयांचे त्यांच्यावर सारखे अमानुष हल्ले होत राहिले. क्रूरपणे हत्त्या करून अमाप संपती लुटण्यावरच ह्या हल्लेखोरांचे समाधान होत नसे. हेतुपुरस्सर त्या टोळया पवित्र देवतांच्या मूर्ती, पुतळे वगैरेंची मोडतोड करून त्यात आनंद व अभिमान मानीत असत. मुसलमानांच्या धर्मवेडेपणाला भारत बळी पडल्याने देशातील असंख्य देवळांचा नाश झाला. परंतु आशिया खंडाच्या दक्षिण पूर्व भागात मात्र त्यामानाने इस्लामियांनीं बराच शांततापूर्वक प्रवेश केला व हिंदू आणि बौद्ध देवळांचा व स्मारकांचा नाश केला नाही. तथापि त्या प्रदेशातील छोटी छोटी राष्ट्रेच आपआपसात लढाया करीत. आपल्या धर्माची असली तरी शत्रू प्रदेशातील म्हणून देवळे वगैरे जमीनदोस्त करण्यास मागेपुढे पाहत नसत. तेराव्या शतकात चीनमधून मोगल राजांच्या स्वाऱ्या होऊन त्यांनी लुटालूट करून कारागिरांच्या कलाकृतींचाही नाश केला.

युरोपियन वसाहतींचे राज्य भारतावर स्थापन झाल्यानंतर मात्र मूर्तिभंजकांच्या दुष्ट प्रवृत्तींना आळा बसला. स्पेनच्या मानाने इतर युरोपियन राष्ट्रे बरीच सुसंस्कृत होती. परधर्माची पवित्र

स्थळे व प्रार्थना मंदिरे यांचा विध्वंस — मग ती अमेरिका खंडातील असोत नाहीतर फिलिपिन्स मधील असोत — करून तेथील लोकांचा अमानुष छळ करणे हे स्पॅनिश लोक आपले पवित्र कर्तव्य मानीत असत. आशियाई लोकांचा व त्यांच्या कलेचा नाश करून आपले साम्राज्य वाढविणे हा काही इतर युरोपियन लोकांचा मुख्य हेतु नव्हता. आपला जास्तीत जास्त आर्थिक फायदा कसा होईल हीच दृष्टी साम्राज्यविस्तार करण्यात होती. आणि युरोपियनांचे साम्राज्य विस्ताराचे कार्य जोरात चालू असताना तद्देशीय लोक स्वातंत्र्यउपभोगण्यास अगदी नालायक आहेत अशी समजूत असूनही भारतादि देशातील जुन्यापुराण्या वस्तू पवित्र मूर्ती, बांधकाम व इतर कलाकौशल्यांच्या वस्तूंचे जतन करण्यात वसाहतवाद्यांनी अतिशय परिश्रम घेतले. लॉर्ड कर्झन यांचा विशेषत्वाने नामोल्लेख करायला हवा. साम्राज्यशाहीचे प्रतीक म्हणजेच कर्झनशाही अशी त्यांची ख्याती होती. परंतु पुराण वस्तु संशोधन खाते भारतात निर्माण झाले ते त्यांच्याच दूरदर्शित्वाचे फळ होय. आणि त्यानंतर हळूहळू पाश्चात्य पंडितांनी भारतात नष्ट होत चाललेल्या साहित्य-कला इत्यादी गोष्टीत लक्ष घालण्यास सुरूवात केली. सरकारी सहाय्याने जुने ग्रंथ शोधून काढून संशोधित केले. खंडित झालेल्या मूर्ती व देवळे यांची पुनःस्थापना केली. मग ते अगदी लहानसे देऊळ असो किंवा इंडोनेशियामधील भव्य बोरोबुदर (Borobudur) नाहीतर कंबोडियामधील अंकोरवात (Ankorwat) येथील नेत्रदीपक विस्तीर्ण देवळे असोत त्या सर्वांची पुनःस्थापना करण्यात ह्या संशोधकांनी विलक्षण चिकाटीने मेहनत घेतली.

**पण आता पूर्वीच्या रानटी मूर्तिभंजकांच्या टोळधांपेक्षाही अतिशय स्वार्थी, लुच्चे व धूर्त अशा विसाव्या शतकातील लुटारूंच्या भक्ष्यस्थानी भारतातील व त्याच्या दक्षिणपूर्व देशातील हे वैभव पडत आहे.**

मूर्तिभंजन करून मोडतोड करणे म्हणजेच आपला धर्म वाढविणे व आपल्या धर्मावर आपली नितांत निष्ठा आहे असे दाखविणे अशी मूर्खपणाची कल्पना असली तरी इस्लामी व स्पॅनिश लोकांची प्रामाणिक श्रद्धा होती. स्थानिक लोकांच्या कलेचे कौतुक करण्यात किंवा त्याबद्दल आपणास नितांत आदर आहे असे भासविण्याचे ढोंग त्यांनी कधी केले नाही. आधुनिक लुटारूंची गोष्टच निराळी आहे. कोकराचे कोवळे लुसलुशीत मास मिळेल म्हणून लांडगा जी कोकराबद्दल माया दाखवील त्याच दृष्टिकोनातून हे पाश्चात्य पंडित हिंदू व बौद्ध पुरातन कलेकडे पाहत आहेत. त्यांचे हे प्रेम इतके गाढ व निस्सीम आहे,की गुपचुप चोरी करून ह्या वस्तूंचे स्थलांतर करून आपला वैयक्तिक वस्तुसंग्रह वाढविण्यात त्यांना काही दिक्कत वाटत नाही. आपल्या चौर्यकर्मात आड

येणाऱ्यांचा खून करण्यास चोर कधी मागेपुढे पाहत नाही. तद्वतच ह्या लुटारूंना मूर्तिभंजक होण्यातही काही खेद होत नाही. मूर्ती पळविताना तिचा एखादा हातपाय मोडतील किंवा उगीच कुठे एखादा कपटा उडवतील कारण ही खास पुरातन मूर्ती आपण उत्खनने करून काढली आहे असा त्यांना आभास निर्माण करायचा असतो. त्यात काही गैर आहे किंवा शरमेची गोष्ट आहे असे त्यांना मुळीच वाटत नाही.

झटपट श्रीमंत व्हावे म्हणून अनेक लुच्चे लोक किंवा दारिद्र्याने गांजलेले गरीब लोक पैशाच्या लालसेने ह्या लुटारूंच्या कारस्थानाला बळी पडून मदत करीत असतात.

ज्या ज्या देशात अभिमानाने दाखवावे, सांगावे असे वैभव आहे त्या या देशातून आधुनिक लुटारूंनी आपली जाळी पसरली आहेत. प्राचीन वस्तूंबद्दल आदर व प्रेम दाखविण्याचा बहाणा करून त्यांची लुटालूट करणे एक सार्वत्रिक नियमच होऊन बसला आहे. विसाव्या शतकातील इतर चोऱ्या फार मोठ्या व प्रचंड असतात. तशाच पुरातन वस्तूंच्या चोऱ्या फार मोठ्या होत आहेत. इतकेच काय इजिप्त, तुर्कस्तान, ग्रीस, लेबानान, इस्राईल, इटली इत्यादी देशांतून दरसाल सत्तर लाख डॉलर्सच्यावर पुराण्या वस्तूंच्या चोऱ्या होत आहेत असे अधिकृतरीत्या कळते. लॅटिन अमेरिका, दक्षिण पूर्व आशियामधूनही लक्षावधी डॉलर्स किंमतीच्या वस्तू पळवून नेण्यात येत आहेत, (Times 26 March 1973.)

भारतही काही टोळधाडींच्या तडाख्यातून सुटलेला नाही. १९७० ते १९७२ ह्या दोन वर्षात दोन हजारांवर मूर्ती भारतातून चोरून नेल्या आहेत. विशेष धोक्याची सूचना म्हणजे ह्या चोऱ्यांचे प्रमाण वाढते आहे. १९७० साली ५५३ मूर्ती चोरीस गेल्या तर १९७२ साली ७७२ मूर्ती चोरल्या गेल्या.

हिंदुस्थान आणि मलेशिया या देशात स्थिर सरकारे आहेत. निदान त्यांनी तरी हा बेकायदेशीर व्यवहार थांबविण्याची कसून खटपट करायला हवी. सर्वांत शोचनीय स्थिती आहे कंबोडिया, लाओस, दक्षिण व्हिएटनाम व थायलंड या देशांची. थायलंडमध्ये तर अमेरिकेचा सध्या मोठा लष्करी तळ पडलेला आहे. हिंदू, बौद्धांच्या ह्या कलाकौशल्याच्या वस्तू ह्या सुसंस्कृत लोकांना जणू स्वर्गीय ठेवाच आहे असे वाटते. पाश्चात्य अधिकाऱ्यांचे या देशातून जाळे पसरलेले असल्याने व हे लुटारू त्यांचेच देशबांधव असल्याने त्यांनी कितीही वस्तू पळविल्या तरी ते खरे कलेचे भक्त आहेत ह्या नावावर त्यांची लूट सहजी खपून जाते.

कंबोडियामधील अंकोरवात (Ankorwat) येथील प्रचंड व विस्तीर्ण देवळांची दुर्दशा पाहून न्यूझीलंड (New Zealand) मधील एका संशोधकाने असे उद्गार काढले, की पैशाने जर अंकोरवात मधली देवळे विकत घेता आली असती आणि आहेत ह्याच

स्थितीत उचलून परदेशात नेता आली असती तर एका आठवड्यात पाश्चात्यांनी ती लांबवली असती. दक्षिण पूर्व आशियातले एक बातमीदार (Don Roak) तर म्हणतात, की युद्धक्षेत्र जसजसे अंकोरवातच्या परिसराजवळ सरकत आहे तसतसे ह्या देवळांचे एकेक अवशेष नाहीसे होत आहेत. पाश्चात्य देशात मूर्तींना भरमसाठ मागणी आहे. मग त्या शाबूत असोत नाहीर भग्नावस्थेत असोत. नासधूस थांबविणे फारच कठीण. कंबोडियामध्ये युद्धातून बचावलेल्या जेवढ्या काही मूर्ती वगैरे आहेत त्या सर्व जाहीर लिलाव करून विकण्यासाठीच आहेत अशी ह्या लोकांनी सोयीस्करपणे समजूत करून घेतली आहे. (Don Roak–Malasia :– Loosing its trasures. American report Vol. III No. March 12, 73, page 13) लाओसमधल्याही मूर्ती हळूहळू पळवल्या जात आहेत. विशेषत: बुद्धमूर्तींना जास्ती मागणी आहे. मूर्तींचे मुंडके धडावेगळे करायचे व फार जुन्या अस्सल मूर्ती आहेत असे भासविण्यासाठी असली घातपाती कृत्ये करताना त्यांना दिक्कत वाटत नाही.

अशा तऱ्हेची लुटालूट दुसऱ्या देशातून करून नेणे हे नेहमी निंद्यच पण सध्या इंडोचायनामध्ये साम्राज्यवादी अमेरिकेने लष्करी तळ ठोकलेत त्यांच्या देखरेखीखाली अशी कृत्ये व्हावीत याचेच वाईट वाटते. लाओस मधील गरीब बिचाऱ्या गरजू शतकऱ्यांकडून कवडी किंमत देऊन अमेरिकन सरकारी अधिकाऱ्यांनी–वरिष्ठांपासून कनिष्ठांपर्यंत सर्वांनी–अमोल वस्तू खरीदल्या आहेत ब्रिटिशांचे जोवर इथे साम्राज्य होते तोवर त्यांची भारतातली अमाप संपत्ती व कोहिनूर हिऱ्यासारख्या असंख्य मौल्यवान वस्तू लांबविल्या आहेत, तेव्हा दुसऱ्या देशातून कुणी ऐतिहासिक वस्तू पळविल्या तर भारतीयाला त्याचे काही विशेष आश्चर्य वाटत नाही आणि आता ह्याच कारभार ब्रिटिशांनी इंडोचायनामध्ये अमेरिकन शांततेच्या नावाखाली चालवला आहे.

पूर्वीच्या मूर्तिभंकांच्या रानटी स्वाऱ्या व हल्लीचे अमेरिकेने इंडोचायनात तळ ठोकल्याने होणारे हल्ले यात काही फारसा फरक नाही. पूर्वीचे हल्लेखोर स्वारी करीत व आपल्या हातांनी पवित्र मूर्ती छिन्नभिन्न करीत पण हे आधुनिक हल्लेखोर विमानातून येऊन तीस हजार फुटांवरून एक बटन दाबून हजारो टन बॉंब टाकतात व त्या खाली निरपराध माणसे, गुरे-ढोरे, शेतजमिनी यांचे नुकसान करतात–पण काळाशी टक्कर देऊन आणखी हजारो वर्षे टिकल्या असत्या अशा हजारो देवळामूर्तींचाही सत्यानाश करीत आहेत.

१९६८ च्या फेब्रुवारी महिन्यात दक्षिण व्हिएटनामधील कम्युनिस्टांच्या (Tet) हल्ल्यास तोंड देण्यासाठी व्हिएटनाममधील प्राचीन राजधानी ह्यू (Hue) वर जोराचे हवाई हल्ले करण्याचे अमेरिकेने हुकूम सोडले. ह्याच प्राचीन राजधानीत व्हिएटनामच्या दुर्मिळ व मौल्यवान असंख्य वस्तूंचा

साठा होतो.

कॉर्बन युनिव्हर्सिटीच्या काही ख्यातनाम विद्वानांनी व्हिएटनाममधील हवाई युद्धाबद्दल एक रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे (cornell study) या नावाने तो प्रसिद्ध आहे. त्यात स्पष्ट म्हटले आहे, की ह्या हल्ल्याने प्राचीन वस्तूंचे जे नुकसान झाले आहे त्याची तुलना करता एखाद्या म्युझिअमचा किंवा लायब्ररीचा नाश हा काहीच नव्हे. ग्रीक व रोमन धर्ममठांवर हल्ले करून युरोपियन संस्कृतीचा जो नाश झाला त्याबरोबर वरील नुकसानीची तुलना होऊ शकेल. ◻

Dr. Usha Mahajant, Professar : Dept of Political Science, South East Asia Studies, Central Washington State College, Elleusburg, Washington 98926 U. S. A.)

---

## तापलेल्या मुंबईतली विधानसभा : पृष्ठ २४ वरून

दिसले नाहीत, ही गोष्ट मात्र समजू शकत नाही. आपली संख्या कमी, यापेक्षासुद्धा आपली जनसामान्यात पाळेमुळे नाहीत ही न्यूनत्वाची भावना बहुतेक विरोधी आमदारांच्या वागण्यात अधिक दिसत होती.

दुसऱ्या कुणी डाव्या पक्षांच्या हातात हे आंदोलन जाण्यापेक्षा शिवसेनेने ते केलेले बरे असे सत्ताधाऱ्यांना वाटणे साहजिक आहे. आज जरी वाढले तरी निर्णायक क्षणी ते आपल्या हातात राहील असा त्यांना भरवसा असावा.

हा सीमा-प्रश्न कधी संपणार कोणास ठाऊक. शे. का. पक्षाची या प्रश्नावर फार मदार. महाराष्ट्रातल्या विधानसभेचे ते ठरलेले आख्यान आहे. कीर्तनकारही ठरलेले. हजेरी लागलीच पाहिजे. मुख्य प्रश्न बाजूला टाकण्याचे एक मस्त हत्यार म्हणून आज त्याचा चांगला उपयोगही आहे.

तेल - चार रुपये होते, त्याचे सहा झाले. आता बारा झाले. दूध दीड रुपया होते, त्याचे दोन झाले. आता चार झाले. याच क्रमाने सगळ्या वस्तूंचे भाव. लोक कधी उठत नाहीत. ते जरासे उठलेत, तोच सगळा अवसानघात.

महाभारतातली गोष्ट आठवली. द्रोणाची इतकी गरिबी, त्यात अश्वत्थाम्याने दुधाचा हट्ट धरला. शेवटी द्रोणांनी पाण्यात पीठ कालवून अश्वत्थाम्याचे समाधान केले. आज असे समाधान करायला गरिबांजवळ पीठही नाही.

● ● ●

# पडपड पावसा थेंबाथेंबी

श्रीधर इनामदार

नक्षीदार खिडकीचे दार उघडून मी खाली नजर टाकली. वर आलो होतो लिफ्टने. यावेळी मजल्यांचा अंक डोळ्यांसमोर नव्हता. अधांतरी, विमानात असल्यासारख वाटत होते. पलीकडे टीपॉयवर मी नुकत्याच रिकाम्या केलेल्या डिश्-कपबशांचे प्रति-बिंब होते. कोणाचीही पर्वा न करता मी खाद्य-पेयांचा पूर्ण फडशा पाडला होता, शिष्टाचारादाखल काही शिल्लक न ठेवता! थोडक्यात, मी अगदी आनंदात होतो. संध्याकाळची विलक्षण सुंदर हवा पसरली होती, समोर माझ्या आवडीचे काम होते, मालक माझ्यावर खूष होता. 'तुमच्या मर्जीने होऊ द्या!' तो म्हणाला होता, 'करा म्हणजे झाले!' मजुरीचा प्रश्न नव्हता. सर्व सूर लागले होते आणि मी त्या उंच बंगल्याच्या अगदी वरच्या दालनातून किंचित बेफिकिरीने खाली नजर टाकीत होतो.

त्या पोरटयांची काळीकरंद मस्तके मला दिसत होती. चेहरे नाही, केस. भांगाच्या रेषांनी सावरलेल्या केश-संभाराच्या दोन-दोन दळांनी माझ्या डोळ्यांसमोर कृष्णकमळाच्या रेघा आणल्या. कृष्णकमळाचे वर्तुळ पूर्ण झाले. पोरींनी फेर धरला होता. मधो-मध पाट मांडला होता, त्यावर हत्ती—गुडघ्यापेक्षा जरा मोठ्या पोरींपेक्षा लहान असा तो महाकाय हत्ती पोरींनी मांडला होता. रिबिनी-रेशमांनी नटवला होता. त्याच्या सोंडेत बळेच कोणत्याशा फुलांची माळ दिली होती आणि त्याच्या भोवताली गलक्यानेच फेर मांडला होता. लवकरच त्या गलक्याला काही

सूर सापडले. भोंडल्यांची गाणी माझ्या कानांपर्यंत येऊ लागली.

गेल्या वर्षीची ही गोष्ट. गाण्यांचे ओले, गर्द स्वर वर वर येत होते आणि मी संतापत होतो. त्या पोरटयांच्या आनंद-लीलांनी मला होत्याचा नव्हता करून टाकण्यास सुरुवात केली होती. एरव्ही मी त्यात रंगून गेलो असतो. हत्तीच्या पाटाभोवती मीच रांगोळी काढली असती. खिरापत भांडून मागून घेतली असती. हत्तीला नटवणारा माझ्यासारखा कोणीही नाही, हे प्रत्येकाकडून वदवून घेतल्याखेरीज समाधान मानले नसते.

परंतु याक्षणी माझे डोके बाँबसारखे फुटले होते. भोंडल्याच्या त्या गाण्यात रस नव्हता. लय नव्हती. त्याचा सुवास उडून गेला होता.उरली होती नुसती फुले.

मघाशी आलो, तेव्हाच चिडत आलो होतो. वास्तविक बंगल्यासमोर सुरेख सडा शिपला होता. निखाऱ्यावरून आल्यासारखा मी त्या ओल्या मातीवरून पोर्चमध्ये आलो होतो—

संतापण्याबरोबरच मी आश्चर्य करीत राहिलो. दिवस दुष्काळाचे आहेत. माणसे सडे शिपतात! माझ्याचपुरते बोलावयाचे, तर आंघोळ जाऊ द्या, पिण्याच्या पाण्याचा घोट घेतानाही माझ्या डोळ्यांसमोर कोरडया ठणठणीत पडलेल्या खोल विहिरी फेर धरीत होत्या. कुंचला पाण्यात भिजवितानाही टँकरभोवती जमलेली माझ्या दुष्काळग्रस्तांची गर्दी मला दचकवून जाई—

अरे, करावयाची काय ही कला? माझी भूक भागविण्यासाठी! त्यावर कोणी मनातून विचारी, तुम्ही कशासाठी? पाण्याचा एक थेंब इकडचा तिकडे पोचवून दाखवा, अन्यथा उपयोग काय तुमच्या 'असण्या'चा?

'दुष्काळपीडित—सहाय्य—पैसे' वगैरे ठीक होते. त्याने बुद्धी 'बरोबर'ची खूण करीत होती, अंतःकरणाचे त्यामुळे समाधान नव्हते!

हातांनी काहीतरी व्हायला हवे होते! हाताने काही घडले असते, तर त्यामुळे अंतःकरण ठिकाणावर राहिले असते. ते शक्य नव्हते. रोजचे काम थांबवून चालणार नव्हते. मी काही कोणी पगारदार लागून गेलो नव्हतो, रजा घेऊन 'मन चाहे गीतों' का कार्यक्रम करूनही अलगद 'मंथ-एन्ड'ला चार पायांवरच पडणाऱ्या मांजरासारखा पुनः उभा राहीन! जरा इकडचे तिकडे केले, तरी आमची अर्थव्यवस्था सीसॉच्या फळीसारखी प्रचंड हेलकावे घेऊ लागे. करतो काय?

दुष्काळग्रस्त भागातून निदान एकदा कोरडी चक्कर तरी मारून यावी, असे ठरवीत होतो, आणि तोच हे काम सापडले होते. स्वतः मालकाने मला गळ घातली होती, वाटेल तेवढी मजूरी देण्याची तयारी दाखविली होती.

अवाढव्य मजुरीचे जाऊ द्या. थोडया दिवसांनतर त्यातील 'इंटरेस्ट' कमी होतो निदान माझ्या बाबतीत तरी तसे होते. मजुरी असतेच; परंतु हे काम मला भुलवून गेले होते. कामाने मला कांचन-

मृगासारखे मोहात टाकले होते, आणि वनवासी भूमिकन्येच्या उत्कंठेने मी वेडावलो होतो. कसलाही विचार न करता होकार देऊन बसलो होतो.

या प्रचंड प्रासादाच्या मालकाचे हे खास दालन. विशिष्ट कोन साधून बसविलेल्या या भव्य आरशासमोर एक अवाढव्य 'वूड-स्क्रीन'—काष्ठ-पट आहे. या लाकडी पडद्यावर त्याला काही चित्राकृती रेखून हव्या होत्या. आरशातील त्याच्या प्रतिबिंबांनी सर्व दालनाला एक पाण्यावरील गालिचासारखे तरंगते, हेलावते रूप येणार होते. यायला हवे होते.

मी काम पत्करले होते, आणि विचारात बुडून गेलो होतो. आठ दिवस नुसते त्या लाकडी पटाकडे पाहण्यात गेले होते. लाकूड सुंदर होते. कामाला मऊ, टिकावयास कठीण. हलकासा रंगही प्रसन्नपणे उठावदार करून जाणारे, रंगाची प्रफुल्लता बरीच वर्षे सांभाळून राखणारे. वाहवा, माझी परीक्षा पाहणारे हें काम! अशा कामाकडून अपयश पत्करणेही आनंदाचे असते. अजिबात घाई न करता याचे डिझाइनिंग करावे, आणि अजिबात वेळ न घालविता ते अमलात आणावे, असे ठरवून मी आज आलो होतो. वेळ प्रसन्न होती, मी प्रसन्न होतो.

आणि अशा वेळी त्या मुलींच्या भोंडल्याने मला उध्वस्त करून टाकले होते. खिडकीचे दार बंद करून मी आतमध्ये वळलो. मंद विद्युत्-दीपांनी दालन उजळून गेले.

आणि माझ्या ते लक्षात आले, तेव्हा माझा मीच आश्चर्यचकित झालो. विस्मित दृष्टीने त्या वूड-स्क्रीनकडे पहात राहिलो.

दिव्याच्या झिळमिळत्या उजेड-लाटा त्यावर पसरल्या होत्या. रंगीत तावदानांचे पुसट रंगही त्यावर जडले होते. हलक्या रंगांच्या पडद्यांच्या मंद हेलकाव्यांबरोबर त्या वूड-स्क्रीनवर पाण्यात खडा पडताच उमटणाऱ्या लाटांसारख्या लहरी तरंगून जात होत्या. जरा हललो असतो तर पलीकडील त्या भव्य आरशाने माझे प्रतिबिंब मला दाखविले असते. ते एका आनंदित माणसाचे असणार होते.

होय, मी आनंदून गेलो होतो. त्या लाकडी पडद्यावर रेखावयाच्या रेखाकृती मला डोळ्यांसमोर दिसू लागल्या होत्या. आरशात माझे प्रतिबिंब दिसले नाही. मी जागचा हललोच नाही. त्या काष्ठ-पटलावर कल्पनेने रेखा काढण्यात मी मग्न झालो होतो.

—'ओ हो! माय् गॉड्!'

त्या शब्दांसरशी मी दचकलो, आणि दाराकडे पाहिले. चकित होऊन भिंतीवरील घड्याळाकडे पाहिले.

घड्याळावर सोनेरी सूर्यप्रकाशाची तिरीप पडली होती, आणि त्याचे घाऱ्या डोळ्यांसारखे काटे चमकत होते. संबंध दालनच कोवळ्या सूर्यकिरणांनी उजळून निघाले होते!

'ओव्हरनाइट्!' बाबुजी पुढे येऊन म्हणाले, 'कमाल केलीत! किती वाजले, पाहिलेत का?'

साडे सहा. सकाळचे साडेसहा वाजून गेलेहोते. 'रात्री पन्नास वेळा तुम्हाला येऊन हाका मारल्या!' विस्मयचकित डोळयांनी माझ्याकडे पहात बाबुजी म्हणाले, 'तुम्हाला शुद्ध नाही! कमाल केलीत! अखेर तीन वाजता माझाही डोळा लागला.' ते ओशाळल्या स्वराने म्हणाले, आणि माझ्या हातातील पॉइंट त्यांनीच काढून घेऊन समोर स्टँडवर ठेवला. वूडस्क्रीनकडे नजर टाकून ते गडवडीने म्हणाले, आता नाही! आता मी ते पाहणारच नाही! प्रथम तुम्ही चला!'

मला त्यांनी ढकलूनच बाहेर काढले. ब्रेक-फास्ट होईपर्यंतत आठ वाजले होते. त्या लाकडाच्या पटाकडे बाबुजी पहातच राहिले. त्यांचे डोळे विस्फारले गेले होते.

'एका रात्रीत पुरी केलीत आखणी, अं?' भारावल्या आवाजाने ते म्हणाले, 'या प्रकाराला काय म्हणावे, तेच समजत नाही!'

आंखणीचे काम, मी रात्रीच पूर्ण करून टाकले होते. एवढा वेळ न जाणवलेली झोप आता डोळयावर उतरून आली, आणि डोळे चुरचूरू लागले. मी आळस दिला, आणि प्रसन्नपणे बाहेर पडण्याची तयारी केली.

'एक मिनिट!' बाबूजी म्हणाले, तुम्हाला एक गंमत दाखवितो. आजची वर्तमानपत्रे पाहिलीत का?'

आता पहात राहण्याची माझी पाळी होती! 'ओळखा पाहू हा फोटो?' बाबुजींची नात माझ्या मांडीवर लोळत वर्तमानपत्रांतील एक फोटो दाखवीत लाडालाडाने म्हणाली. तिचे केस माझ्या डोळयात घुसले, व मी म्हटले, 'पाहू, पाहू?'

–शंकाच नव्हती! मी मुद्दामच म्हटले, 'कोण? ही कोण मुलगी बोवा? काही पत्ता नाही लागत!'

छोटीचा–माझ्या हातांशी लडिवाळपणे झोंबणाऱ्या या पोरीचाच तो फोटो होता! तिच्या हास्याच्या खळखळाटांतच मी उभा राहिलो. तिच्या डोक्यापेक्षा उंच हात करून मी ते वृत्तपत्र पाहू लागलो. ती खिदळतच होती. बाबूजीही हसत होते.

छोटी, व तिच्या पाच-सात मैत्रिणी. जवळजवळ एकाच वयाच्या. पाच-सहा वर्षाच्या या पोरटयांनी एक 'जम्मत' केली होती! आपले खाऊचे पैसे साठविले होते. आणि 'दुष्काळग्रस्तां' साठी तो चिमणचारा कोणा मंत्र्याच्या हवाली करतानाचा तो फोटो वर्तमानपत्रांनी छापला होता.

'ही प्रीमी ना ग?' एका छोकरीच्या फोटोकडे बोट दाखवून मी विचारले.

'प्रीमी'–प्रमिला–छोटीची एक मैत्रीण मला माहीत झाली होती. तिच्या अवखळ डोळयांतील खटयाळपणा फोटोतही अलगद अवतरला होता. प्रीमीची व छोटीची मैत्री हा मला एक आश्चर्याचा खजिनाच होता! प्रीमीच्या वडिलांची गरिबी जगजाहीर होती. छोटीने हसतच मान डोलावली. ती प्रीमीच होती.

मी वर्तमानपत्र टेबलवर ठेवून दिले, व म्हटले, आग लागो या आमच्या दारिद्र्याला!'

—आगीचा चटका बसल्यासारखे बाबूजी चमकले, व म्हणाले, 'काय म्हणालात?'

'आमच्या दरिद्रीपणाला काही सीमा आहे की नाही, असे मी म्हणत होतो!' मी त्या फोटोकडे बोट केले.

'का? झाले तरी काय?' बाबूजींनी विचारले.

'या पोरींचे पैसे-रुपये बारा भ्याऐंशी!' मी उपहासाने म्हणालो, 'आमच्या दुष्काळ-निधीत त्याने मोठी भर पडली, नाही? बाबूजी, आम्हा मोठ्यांना असे काही वाटले नाही की त्या पोरींच्या रकमेत तेवढीच भर घालून त्यांना ते परत देऊन टाकावेत म्हणून? नवलाची गोष्ट आहे! एवढ्या लांबलचक गाड्या घेऊन समारंभस्थळी जाण्याचा साधा पेट्रोल-खर्चही आमच्या प्रतिष्ठितांनी त्या रकमेपेक्षा अधिक केला असेल! काय साधते या पोरांच्या खाऊचे दाणे आमच्या राष्ट्रीय आपत्तीसाठी घेण्यात, देव जाणे!'

मी रागानेच बाहेर पडलो. मागे राष्ट्रीय-संरक्षण निधीच्यावेळीही मला असाच राग आला होता. आमच्या अधिकाऱ्यांनी, मंत्र्यांनी, अगर आम्हीही, एवढी साधी कल्पकता दाखवू नये काय? या पोरांचे भातुकलीचे स्वयंपाक त्यांनाच खाऊ घालण्यात अधिक आनंद नाही काय? सामान्य बुद्धीचा प्रश्न होता. मी अधिक बोललो नाही. माझ्या मनातील उद्वेगात त्याने भर मात्र पडली. मी संतापत, जळफळत राहिलो.

माझी असहाय्यता मला जाळीत राहिली. दुष्काळग्रस्तासाठी मला हातानी काहीतरी करावयाचे होते. आमच्या मनातील त्याच्याएकी अस-णारी तडफड, त्यांच्यापर्यंत पोहोचवा-वयाची होती.

हातात मात्र काहीही नव्हते! मनो-मन खजील करणारे, पोरांच्या मर्दुम-कीचे हे दर्शन या स्वतःवरील संतापात भर मात्र घालून गेले होते.

काय असेल ते असो! त्या दिवशी दुपारी बाबूजीकडे जाणे साधले नाही. त्यांच्या काष्ठ—पटावरील आखणी मी पुरी केली होती. उरलेले कामही तशाच झपाट्याने हातावेगळे करण्याचे योजीत होतो, परंतु ते लांबणीवर पडले. एकाला दोन असे दिवस गेले आणि चक्क पंधरा दिवस मला तिकडे जायलाच लागले. या दरम्यान त्यांच्याकडूनही काहीच 'हाका-मारी' आली नाही, त्याचेही आश्चर्य वाटले. त्यांनी कामाची घाई करू नये, हा त्यांचा मोठेपणा होता आणि माझी बेफिकिरी! काहीशा ओशाळल्या चेह-ऱ्यानेच मी बंगल्यात शिरलो. बाबू-जींच्या सौ.च समोर आल्या. 'या!' नेहमीच्या सौहार्दाने त्यांनी स्वागत केले. 'एक-दोन अर्जन्ट कामे होती!' मी बेपर्वाईने सांगून टाकले, 'त्यामुळे तुमचे काम घेता आले नाही. आता पुरे करून टाकू!'

'काही हरकत नाही.' त्या म्हणाल्या, 'खरे म्हणाल, तर आम्ही तुमच्याच रागावण्याला घाबरलो आहोत!'

मी बुचकळ्यात पडलो. 'माझ्या?' मी आश्चर्याने विचारले, 'मला रागावण्याचे काय कारण? आणि जरी रागावलो, तरी तुम्हाला घाबरावयाचे काय कारण?'

'आमचेच चुकले!' शरमिंद्या मुद्रेने त्या म्हणाल्या, 'छोटीला किती बजावले होते–तरी तिने घोटाळा करावयाचा तो केलाच. काही राहिला नाही!'

'कसला घोटाळा पण?' मी विचारले.

'दाखविते!' त्या म्हणाल्या, आणि कामाच्या त्या दालनात आम्ही प्रवेश केला. मी प्रथम त्या वूड स्क्रीनकडे नजर टाकली, व ओरडलोच! 'हे काय? हे–हे–कोणी केले?' मी ओरडून विचारले.

'छोटीने!' तिच्या आई अवघडून म्हणाल्या, 'तरी मी सर्वांना बजावीत होते. दार उघडे राहिले, आणि पोरटीने डाव साधला! आता काय करावयाचे?'

मी मान हलविली. त्या बोर्डवर किंचित खालच्या अंगाला लाल हातांचे ठसे उमटले होते. तेथील माझी आखणी नाहीशी झाली होती, पॉलीश पार गुप्त झाले होते!

आता तेवढ्यापुरते पॉलीश मारून चालणार नव्हते! चित्राचा एकसंधपणा त्याने नष्ट झाला असता. सबंध स्क्रीनवर पुनः पॉलीश मारणे भाग होते. ते खर्चाचे होते, व माझी सबंध आखणीही रसातळाला गेली होती!

'ठीक आहे!' मी हात चोळीत म्हणालो, 'आता काय करायचे, तेवढे सांगा! बाबूजींना'

यावर बाईसाहेबांनी चेहऱ्याचे वर्तुळ लंबगोलाकार केले. चित्रांचा छोटा रुमाल तोंडावर नाचवला, व म्हणाल्या,

'अय्या! प्लीज! हे दिल्लीला गेलेत! कळालं तर घर डोक्यावर घेतील! मला घरात ठेवणार नाहीत! प्लीज, ते यायच्या आत काही करून ते सुधारून टाका ना! कराल ना! माझ्यासाठी'

त्याचा अर्थ तोच. डोंबले आणि डोसके! मला तशाही स्थितीत हसू आले. सुधारून काय टाका?

मी विचार करू लागलो, आणि बाईंनी माझा होकार गृहीत धरला. 'सुटले बाई!' सुटकेचा श्वास टाकून त्या घाईने बाहेर पडल्या, आणि त्या स्क्रीनसमोर मी तेवढा उरलो.

शेजारचा तो प्रचंड आरसा आता एका गोंधळलेल्या, त्रासलेल्या माणसाची प्रतिमा दाखवीत होता. ती माझीच आहे, हे ध्यानात यायला फार वेळ लागला. कसे सुधारावयाचे हे?

भानावर आलो, तो छोटीच्या आवाजाने. 'अंकल, अंकल! धसमुसळेपणाने कारटी म्हणाली–आता मी तिला लांब ढकलले. 'चल पळ इथून!' मी म्हणालो, 'कोणी केला हा चावटपणा? पुसायचे कसे आता ते?'

छोटी लाजली. दूर उभी राहून क्षणभर तिने विचार केला, व म्हणाली,

'पण पुसायचे कशाला ते, अंकल?'

'मग काय करू म्हणतेस ?' मी संतापून विचारले. 'त्याच्यावरूनच काढा!' त्या शहाणीने सांगितले, 'माझ्याच हातांचे चित्र काढा की! मी देऊ काढून ?'

परंतु माझा चेहरा पाहून पुढच्याच क्षणी ती बाहेर पळाली! दाराबाहेर तिच्या खिदळण्याचा आवाज आला, आणि मी भडकून गेलो. या क्षणी पोरटी जवळपास असती, तर थोबाडून काढली असती!

छे! जवळ नव्हती, तेच बरे होते!

त्यानंतर माझी नजर स्क्रीनकडे वळली मात्र आणि चमत्कार घडल्यासारखे मला ते जाणवले. छोटीचा मला राग आला खरा परंतु तीच मला काही सुचवूनही गेल्याचे माझ्या लक्षात आले!

भारल्यासारखा मी तिकडे पहातच, राहिलो.

दोनच दिवसांनी बाबूजी परत आले तेव्हा आनंदाने वेडावून गेले, सौ. ही आनंदून गेल्या होत्या. मीही प्रसन्नपणे माझ्या पूर्ण झालेल्या त्या भव्य वूड स्क्रीनवरील कामाकडे पहात होतो.

स्क्रीनवर मी भोंडला खेळणाऱ्या पोरींचेच चित्र रेखले होते. रंगांनी जागविले होते, आणि त्यांच्या फेरामधोमध हत्तीच्या मागे एक प्रचंड गुलमोहोर दाखविला होता—फुललेला. त्याच्या लालभडक पानांच्या जागी छोटीचे चिमुकले हातच उमटविले होते!

जणू त्या हातांच्या महादानानेच भीषण दुष्काळावर पर्जन्य वर्षाव करून जाणार होता. त्याला त्या भोंडल्याचेच अप्रूप होते! ● ● ●


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

# युवाशक्ती आणि गोरजगाव


दादूमिया

सुधाकर भास्करराव जोशी. वय वर्षे फक्त बावीस. आदर्शवादी समाज कार्यकर्ता. तेराव्या वर्षापासून संघाचा निष्ठावंत स्वयंसेवक. बडोदा विश्वविद्यालयात सक्रिय विद्यार्थी. शिक्षण बी. ए. बी. कॉम. सध्या 'लॉ'चे शिक्षण.

आदर्शवाद व सामाजिक सेवा यांच्या ओढयातून 'गोरज' नावाच्या गावात समाजकार्य सुरू केले. 'गोरज' ग्राम दत्तक घेतले. बडोदा शहर सोडून गेली दीड वर्षे ह्या चार हजाराच्या गावी वास्तव्य आहे. गावात प्रामुख्याने आदिवासी, हरिजन व वसावा लोक. ब्राह्मणांची गावात तीन-चार घरे. सात-आठ बनिया कुटुंबे. गावात एक आयुर्वेदिक सरकारी दवाखाना. दुसरा खाजगी दवाखाना आर. एम. पी. डॉक्टरचा. अकरावीपर्यंत शाळा. शाळेत मुले चारशे. प्राथमिक शाळेत अडीचशे व उरलेली माध्यमिक शाळेत. मास्तर-मास्तरणी साऱ्या बडोद्याहून गेलेल्या. त्यांचा सरासरी मासिक पगार दीडशे रुपये.

चार हजार लोकांत दीड हजार भूमिहीन मजूर. त्यांची सरासरी मासिक प्राप्ती तीस रुपयांपेक्षा जास्त नाही. ह्या उत्पन्नावर सारे कुटुंब संसार करणार. उरलेल्या लोकांत दोनशे सुखवस्तु कुटुंबे आहेत. प्रत्येक कुटुंबात साधारणत: दहा एकर जमीन आहे. याचा अर्थ पुढल्या पिढीत प्रत्येक कुटुंबाच्या वाटयास दोन-तीन एकर जमीन येणार. उरलेली वस्ती ? वरील लोकांची पोरेबाळे, आया-बहिणी व वृद्ध यांच्यात ती वस्ती विभागली गेली आहे.

गावाची भौगोलिक स्थिती मोठी मजेदार आहे. अगदी मध्यभागी सवर्ण सुखवस्तु लोकांची वस्ती आहे. ह्या वस्तीभोवती आठ वर्तुळात (Rings) इतर लोक राहतात. प्रत्येक वर्तुळ एक-



दोस्त सुधाकर

दीड मैलाच्या अंतरावर आहे. एका पऱ्याहून दुसऱ्या पऱ्यास (मोहला) जाण्यासाठी साधारणतः अर्धा तास चालावे लागते. ह्या वर्तुळांच्या मध्य-भागी देव नावाची नदी वाहते. पावसाळ्यात ही नदी भरली की सारे गाव isolated ! जणू जगाशी संबंधच नाही.

हे गाव तालुका स्थान वाघोडिया-पासून आठ मैल दूर आहे. जोडणारा रस्ता कच्चा आहे. पावसाळ्यात आठ मैलांचा चिखल तुडवावा तेव्हा गोरज गाव दिसणार !

नैसर्गिक सौंदर्य अप्रतिम आहे. पण फक्त पावसाळ्यात, सर्व परे हिरवेगार दिसतात. ताडाची झाडे खुलून दिसतात. आजूबाजूस डोंगराळ प्रदेश आहे. पावसाळ्यात सारे डोंगर हिरव्या शालूंनी नटतात. जवळ मोठमोठी अरण्ये आहेत. त्यातील लाकूड उपयोगी असल्यामुळे तेथील जंगल खाते भाव मारते !

अशा सुंदर, रमणीय स्थळी आमचा दोस्त सुधाकर जोशी राहतो. ◻

: मला राहून राहून आश्चर्य वाटते ते हे, की तुझ्यासारखा संघीय तरुण अशा मागासलेल्या गावात गेलाच कसा ?

: डॉक्टर, आमची तरुण-तरुणींची 'युवाशक्ती' ही संघटना तुम्हाला माहीत आहेच. आम्ही साऱ्या तरुणांनी ठरविले, की आपण काही सामाजिक समस्या निवडून त्या सोडविण्याची कोशीश केली पाहिजे कॉलेजची फी-वाढ होते पण त्याच्या मागे प्राथमिक कारणे काय ? देशात गरिबी भयंकर प्रमाणात आहे पण त्याचे मूळ कारण काय ? असल्या प्रश्नांचा जेव्हा आम्ही विचार करू लागलो तेव्हा आम्हास असे आढळले, की आमचे वडीलधारे लोक अगदी मूलभूत प्रश्नाकडे कानाडोळा करतात व वरवर केवळ दिखाऊ मलमपट्टी करण्याच्या मागे असतात.

: पण तुम्ही तरुण मंडळी आणखी जास्त काय करीत आहांत ?

: म्हणून आम्ही मूलभूत प्रश्नास हात लावण्याचे ठरविले.

: म्हणजे काय ?

: उदाहरणार्थ, अविकसित खेडेगावी जी भयंकर परिस्थिती आहे त्यामागील कारण मोठे दुःखदायक आहे. आमच्या सुशिक्षितांना तेथे जाऊन, स्वतः राहून गरिबांच्या दुःखाशी समरस होण्याची दानत नाही. उलट, सुशिक्षितांनी खेडेगावातील तरुण वर्ग खेडेगावाच्या बाहेर पळविण्याचे सारे प्रयत्न चालविले आहेत.

: पण तुम्ही काय करीत आहांत ? म्हणजे मूलभूत कार्याच्या दृष्टीने ?

: सर्वप्रथम मला तरुणांचा दृष्टिकोन बदलावयाचा आहे. गेली सव्वीस वर्षे आमच्या वडिलधाऱ्या लोकांनी तरुणांना देशाभिमानी किंवा समाजाभिमुख अशी कोणचीच दृष्टी दिली नाही. फक्त खुर्चीचा हव्यास व पैसे खाणे आणि स्वतःची जाहिरातबाजी. ती का, तर पुन्हा निवडून येण्यासाठी ! यात समाजास न काही फायदा न काही मार्गदर्शन. आम्हास ही सारी प्रथा वा दृष्टीच बदलून टाकावयाची आहे.

: पण तरुणांना ही कल्पना कितपत आवडली ? का त्यांचाही यास विरोध झाला ?

: मला विरोध झाला नाही. कारण तरुण मित्रांना त्यांच्या भाषेत मी प्रेरणा देऊ शकलो, त्यांच्या समस्या दूर करण्याचा नेहमी प्रयत्न करीत राहिलो, त्यांच्या अस्वस्थ मानसिक स्थितीचा या प्रयोगासाठी उपयोग कसा होईल याचा विचार मी सतत करीत असल्यामुळे मला उलट तरुणांचा भरपूर पाठिंबा मिळत गेला. एवढा, की मी आज जो गोरज गावात रहात आहे तो या तरुण विद्यार्थी मित्रांनी मिळून उभ्या केलेल्या पैशाच्या जोरावर.

: म्हणजे ?

: कोणी विद्यार्थी मला दरमहा पाच रुपये देतात तर कोणी दोन दोन रुपये. गोरज गाव आम्ही दत्तक घेतले आहे. ही कल्पनाच त्यांना Grand वाटते. या गावाची सामूहिक जबाबदारी जणू आमच्यावर आहे असे प्रत्येकास आज वाटते.

: पण असे विद्यार्थी किती आहेत ?

: युवाशक्ती संस्थेचे आज चार हजार सभासद आहेत.

: पण सक्रिय किती ?

: दोनशे ते अडीचशे.

: बस्स ?

: का, पांच टक्के सक्रिय तरुण काय कमी आहेत वाटते ?

: कमी ? एकदम मायक्रोस्कोपिक ! बाकीचे ९५ टक्के तरुण दूर का रहातात ?

: डॉक्टरसाहेब, आज तरुणांसमोर आदर्श कोणते आहेत ?

तरुणांना शाळा कॉलेजातून चांगले मार्गदर्शन व्हावे अशी अपेक्षा असते. पण आमच्या शैक्षणिक संस्था म्हणजे एक बाजार आहे. फी द्या व डिग्री उचला. मुलांवर शिक्षणाचे चांगले संस्कार व्हावे अशी इच्छा आज कोणत्याच शैक्षणिक संस्थेची दिसत नाही.

: शिक्षणसंस्था सोडल्या तर एरवी असे संस्कार घडवितील अशा संस्था वा संघटना आपल्याकडे नाहीत का ?

: आहेत, पण सरकारी धाक व अपप्रचार यांच्यामुळे तेथे जाण्यास तरुण बिचकतात. त्याला पर्यायी सरकारी संस्था वा संघटना असत्या तर आज जो व्हॅक्यूम तरुणांत दिसत आहे तो दिसला नसता. या सर्व अनास्थेपायी, आदर्शांच्या अभावी व वैचारिक आणि आर्थिक दारिद्र्यामुळे आजचा तरुण संभ्रमित व अपुरुषार्थी दिसून येतो.

: तुमच्याकडे जे २००–२५० लोक आहेत ते असे संभ्रमित वा विफल का झाले नाहीत ?

: पूर्वी ते विफल होते. मात्र त्यांना काम करण्याची हौस होती, जिद्द होती. दुर्दैवाने, त्यांना संधी मिळत नव्हती. आमच्या नव्या विचारांनी हे तरुण भारून गेले, त्यांना आशेचा किरण दिसला, काम करण्याची संधी मिळाली, त्यांची शक्ती Channelise झाली. तरुण बदलत नाहीत असा एक खोटा भ्रम आमच्या वडील मंडळीत आहे. तो आम्ही दूर करून दाखविला आहे.

: पण हा बदल कसा झाला ?

: भारत-पाक युद्धाच्या वेळी आमची 'युवाशक्ती' जन्मास आली. आम्ही रोज पहाटे प्रभातफेरी करीत असू. इतिहासातील हुतात्म्यांचा आदर्श आम्ही डोळ्यासमोर ठेवला होता. युद्ध संपले. आमच्या प्रभातफेऱ्या हळुहळू कमी झाल्या. मात्र त्याऐवजी सामाजिक समस्या आम्ही हाती घेतल्या, युवाशक्ती हा एक फोर्स होता. तो वाया न जाऊ देण्याची जबाबदारी माझ्यावर होती. प्रभातफेऱ्यातून मातृभूमीचे प्रेम जागवले जात होते. ह्या मातृभूमीची समृद्धी वाढविण्यासाठी प्रत्येकाने काही हातभार लावावा ही कल्पना तरुणांना स्फूर्तिदायक ठरली. त्यातून आमच्या ग्रामविकास योजनेचा जन्म झाला. ◻

: गोरज गावातील वैद्यकीय मदत कितपत कार्यक्षम आहे ? मी विचारले.

: गावात सरकारी दवाखाना आहे. तेथे सरकारी मदत फुकट मिळते. येथे आयुर्वेदिक औषधपाणी मिळते. ही सोय बडोदा आयुर्वेदिक कॉलेजतर्फे केली जाते. सरकारी योजना मुळात चांगली असावी. खेडेगावच्या लोकांसाठी स्वस्त व सुलभ औषधी योजना आवश्यक आहे. मात्र आयुर्वेदिक डॉक्टरांना ही दृष्टी नसावी. गावात दुसरा खाजगी दवाखाना आहे. मी काही करणार नाही, पेशंट आपोआप तुझ्याकडे येईल, मात्र माझे कमिशन मला मिळाले पाहिजे, असे ह्या सरकारी आयुर्वेदिक डॉक्टरचे धोरण आहे.

: पण खेडेगावातील रोगी ह्या प्रकाराविरुद्ध बोंब नाही मारीत ?

: खेडेगावातील समाज अगदी सुप्त आहे. त्यास सारे कळते पण आपण काही करू शकू असा आत्मविश्वास या समाजाजवळ आज शिल्लक नाही. याचे मुख्य कारण त्यांचा अशिक्षितपणा.

: खाजगी डॉक्टरांची चलती आहे काय ?

: एकदम चलती. खाजगी डॉक्टर तर आर. एम. पी. आहे. पण महिन्यास दोन हजार रुपये सहज पाडतो! साध्या सर्दीला दोन इंजेक्शने! पाण्याची इंजेक्शने तर सर्रास. कोणी गंभीर असल्यास व बोलावणे आल्यास हा प्राणी जागेवरून हालणार देखील नाही. मरू दे रोग्यास असे उघडपणे बोलणार. आणि रोगी दगावला तर यास खरेच काही वाटत नाही. एक गरीब गेला, पृथ्वीवरची घाण कमी झाली असे रोग्यांच्या नातेवाईकांना निर्लज्जपणे तो ऐकवितो. मोठे शेतकरी ह्या डॉक्टर-कडे कधीच जात नाहीत. ते सरळ वाघोडियास जातात. ह्याच्याकडे गर्दी गरिबांची. पैसा आधी ठेवला तरच हे डॉक्टर रोग्यास बघणार. पैसे नसले व पेशंट जरी सिरीयस असला तरी हा डॉक्टर म्हणतो, मेलास तर सुटशील या जगातून. हे लोक इतके दळिद्री आहेत की डॉक्टरला त्यांच्याच्याने उलटून बोलणेही अशक्य आहे.

: हा शोध आहे!

: खरेच सांगतो, प्रतिक्रिया होण्यास पोटात थोडेतरी असावे लागते. अपमान समजतो, पण त्याची प्रतिक्रिया रिकाम्या पोटी जन्मूच शकत नाही. मुर्दाड मन होते अति-दारिद्र्याने.

: वाघोडियाची वैद्यकीय सोय कशी आहे?

: गोरज वाघोडिपासून आठ मैल दूर आहे. याचा अर्थ, रोगी अत्यवस्थ असेल तर वाघोडिया कामाचे नाही. त्याचप्रमाणे पावसाळच्यात चिखल झाल्यामुळे व नदीला पाणी आल्यामुळे गावाच्या बाहेर पडणे अशक्य असते. सामान्य रोगांसाठी तेथे जाणे महाग पडते. बस भाडे एक रुपया आहे. एकट्यास जाता येत नाही. दोन-चार लोकांना जायचे म्हणजे पाच रुपयाची नोट उडते. वाघोडियाचा डॉक्टर पी. एच.सी. (Primary Health Centre) असल्यामुळे फुकट आहे. हे केंद्र चांगले आहे. खाबूगिरी नाही. वैद्यकीय सोयही उत्तम आहे. रोग्यांना वॉर्डात दाखलही करतात. त्यांच्यापाशी सोशल वर्कर्स आहेत. मनात आणले तर सोशल वर्कर्स अगदी खेडच्यात खोलवर जाऊन चांगले काम करू शकतील. दुर्दैवाने, हे होत नाही.

: पण खेडेगावातील लोक नीट औषधपाणी करण्यासाठी उत्सुक आहेत का?

: नाही, त्यांचा जुन्या पारंपरिक औषधांवर अजून खूप विश्वास आहे. पाले, गुटचा, काढे, मंत्र-तंत्र, जादू-टोणा ह्यावर जास्त भर आहे. नवीन औषध-व्यवस्थेची त्यांच्या मनात भयंकर भीती आहे. अर्थात यास डॉक्टर्स जबाबदार आहेत.

: ते कसे?

: डॉक्टर्सचा दुष्टतेचा व्यवहार चालतो. उदा. खेडेगावी एखादी बाई अडली असेल तर डॉक्टर तेथे वेळेवर कधीच पोचत नाही. इंजेक्शन असे देतात की त्याचा त्रास मूळ रोगापेक्षा जास्तच होतो. औषधोपचाराबरोबर सूचना महत्त्वाच्या असतात. त्या कधीच

दिल्या जात नाहीत. आज वाघोडियास पी. एच. सीचा डॉक्टर खरोखर चांगला आहे. पण आधीच्या डॉक्टरांच्या अनुभवावरून ही आदिवासी जनता या तालुक्याच्या जागी जायलाच घाबरते. दुर्दैवाने सरकारी डॉक्टरांची नेहेमी बदली होत असते. सारे डॉक्टर्स सारखे नसतात. उदाहरणार्थ वैद्यकीय प्रचार हा कोणच्याच डॉक्टरला आवडत नाही. स्लाईडस, फिल्म्स वगैरे सारे साहित्य त्यामुळे केवळ पडून रहाते. खोटे रिपोर्टस मात्र सारे वर व्यवस्थित पाठविले जातात. त्याचे एकच कारण की डॉक्टरांना आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव नाही.

: खेडेगावात शिक्षण कितपत वाढत आहे ?

: शिक्षणाच्या बाबतीत आदिवासी प्रजा अगदी उदासीन आहे. 'मुलगा शिकला तरी शेवटी नांगरच चालविणार ना ? मग शिकून फायदा काय ?' असे प्रश्न जो तो विचारतो. आपण शिक्षणाची महत्तता त्यांना पटवावी, पण त्यांच्या त्यांच्या घरात एवढे काम असते की शाळेत मुले गेल्यावर ही कामे करणार कोण ह्या त्यांच्या प्रश्नास आपल्याजवळ उत्तर नसते. हळूहळू मला असे वाटू लागले आहे, की आपले सध्याचे शिक्षण खेडेगावातील मुलांना कुचकामाचे आहे. दारिद्र्यामुळे यांना नोकर ठेवणे अवघड होते. सारी कामे मुलांनाच करावी लागतात. खेडेगावची परिस्थिती पाहिली, की तेथे शिक्षण मुलांना उपयोगी ठरेल किंवा शिक्षणाचा प्रसार होईल असे निरोगी वातावरण तेथे नाही याची खात्री होऊ लागते.

: याची कारणे काय ?

: खेडेगावात जी शिक्षक मंडळी शहरातून धाडली जातात ती गावातील परिस्थितीशी समरस होणारी नसतात; ते त्यांना अशक्य वाटते. त्यामुळे शिक्षक या नात्याने त्यांची सामाजिक जबाबदारी व कर्तव्ये ते पार पाडू शकत नाहीत. शाळेत ह्या शिक्षकांमुळे निरुत्साही वातावरण तयार होते. गुल्ले मारणे, रजेवर उतरणे, वेळेवर न जाण, उत्साहाने न शिकविणे–थोडक्यात, ही मंडळी निव्वळ पगार घेण्यासाठी तेथे कशीबशी राहतात.

: विद्यार्थी कसे असतात ?

: शिक्षणाविषयी पालकांची आधीच आस्था कमी. त्यातून असे शिक्षक. विद्यार्थी कितीही चांगले असले तरी त्याने काय होणार ? शाळेत रजिस्टरवर पूर्ण संख्या पण प्रत्यक्षात अर्ध्याहून कमी उपस्थिती असा प्रकार आढळतो. एक गोष्ट नक्की. तेथेही हुषार मुले आढळतात. खेडेगावात मुलांची ग्रहणशक्ती जास्त असते. एकदा डोक्यात पक्के भिनले की सहज विसरले जात नाही. पण अशी मुले वर कॉलेजात गेली की तेथे बिघडतात. कारण शहरी वातावरणाशी ते Adjust होऊ शकत नाहीत. ११ वीपर्यंत त्यांचे जीवन अंधःकारमय असते. शहरात गेल्यावर तेथील झगझगाटाने त्यांचे डोळे दिपून जातात. त्यामुळे त्यांची मने विकृत होतात. खेडेगावी ते परतु शकत नाहीत. शह-

रात ते खेडवळ समजले जातात. त्यांची मानसिक स्थिती त्रिशंकूप्रमाणे होते. असे एक जरी उदाहरण घडले तरी गावात शिक्षणाविरुद्ध अपप्रचार होण्यासाठी ते पुरेसे होते.

: मुलींचे शिक्षण किती ?

: जवळ जवळ नाही. कारण त्यांची लग्ने आजही ११–१२ व्या वर्षी होतात. त्यानंतर मुलगी मोठी होते. अशा मुलीस शाळेत धाडणे गावाच्या शिस्ती-विरुद्ध होते. मात्र ह्या मुली घरकामात अत्यंत हुषार असतात. संसारात दक्ष व शेतीत खूपच उपयोगी. मात्र अज्ञाना-मुळे त्यांचे जग एकदम संकुचित असते.

: हरिजनांचे शिक्षण ?

: आज हरिजनांना शैक्षणिक सव-लती खूप आहेत. त्याचा भरपूर फायदा आज ही मंडळी घेत आहेत. त्यांची बहुतेक सारी मुले शिकतात.

: पण शाळेत हरिजन म्हणून त्यांना दूर ठेवले जाते का ?

: गावात अस्पृश्यता आहे, मात्र शाळेत अस्पृश्यता आढळत नाही. त्यांना सरकारी सवलती खूप मिळत असल्या-मुळे बाकीचे लोक नाराज असतात. म्हणजे सामाजिक दुरावा निराळ्या कारणाने चालू आहेच.

: गावात हरिजन घरे किती ?

: साधारण तीस-एक घरे आहेत. आमच्या गावात जास्त आदिवासी आहेत. शैक्षणिक क्षेत्रात हरिजन पुढार-लेले तर आर्थिक क्षेत्रात हरिजनांपेक्षा हे किंचित बरे. सामाजिक न्याय हरि-जनांच्या वाट्यास येत नाही. आदिवासी गावात बहुसंख्य असल्यामुळे सामाजिक न्यायाचा प्रश्न उदभवत नाही.

: मग आदिवासींची समस्या कोणती ?

: गरिबी, अत्यंत हलाखीची स्थिती. हे कारण दूर झाले तर त्यांच्या साऱ्या समस्या दूर होतील. घरात त्यांना रोजच दुष्काळ असतो ! सकाळी खायला मिळाले तर रात्री तसेच रिकाम्या पोटी झोपून जातात, एक दिवस गेला तर त्यांना बरे वाटते. आजला आजची चिंता, उद्याची बात उद्या. भुकेमुळे पोटात येणाऱ्या कळा आता त्यांना रडवू शकत नाहीत, त्यांची त्यांना सवय झाली आहे. ते सांगतात, आम्ही उपाशी राहिलो त्याचे आम्हास दुःख वाटत नाही. आमची मुलेबाळे जेव्हा अन्नासाठी तडफडतात, उपाशी रहातात तेव्हा आम्हाला वाईट वाटते.

: यांच्या दारिद्र्यास जबाबदार कोण ?

: हे लोक आळशी आहेत अशातला भाग नाही. पोटासाठी हे खूप मेहनत करतात, काबाडकष्ट करतात. त्याचा पूर्ण मोबदला त्यांना मिळत नाही. त्यांच्या दुर्दैवास जबाबदार शेतकरी, जमीनदार व सरकारी योजना हाताळ-णारे मूर्ख अधिकारी व गुंड ही सारी मंडळी होत. ह्या अडाणी व रांगड्या माणसाची हे लोक मिळून फसवणूक करतात, त्याला लुबाडतात व धाक-धपटशा दाखवितात. रिकामे पोट या अन्यायाविरुद्ध उभे राहू शकत नाही. त्यांची गरिबी अशा रीतीने वाढतच रहाते.

: असे जनरल बोलू नका. मला एकेका गटाविषयी विचारू द्या.

: व्यापारी लोकांविषयी आधी सांगतो. व्यापारी ह्या आदिवासींना प्रत्येक गोष्ट दुप्पट किमतीने विकतात. आपल्यापेक्षा ह्या आदिवासी लोकांना महागाई दुप्पट सहन करावी लागते.

: हे असे का ?

: या विषयी मी व्यापाऱ्यांशी चर्चा केली. गरीब लोकांना सारा माल उधार द्यावा लागतो. गरीब लोकांचे सारे पैसे परत येत नाहीत. म्हणून आधीपासूनच किमती जादा लावल्या, की थोडे फार नुकसान भरून निघते असे त्यांचे म्हणणे. पिकाच्या हंगामाच्या वेळी हे व्यापारी जुन्या करारानुसार सारे भात, गहू, ज्वारी वगैरे पिके कमी भावात खरेदी करतात.

: जुन्या करारानुसार म्हणजे काय ?

: शेतकऱ्यांनी कर्ज घेतलेले असते. ह्या कर्जावर वीस ते पंचवीस टक्के व्याज असते. त्याबरोबर पीक ह्या व्यापाऱ्यांनाच ते म्हणतील त्या भावाने विकावे लागते. हे धान्य, व्यापारी साठवतात व पुढे दुप्पट भावाने ह्याच शेतकऱ्यांना विकून टाकतात. ह्या प्रोसेसमध्ये शेतकरी जन्मभर कर्जबाजारी रहावा अशी तरतूद केलेली असते.

: पण शेतकरी आवाज उठवीत नाहीत ?

: नाही. कारण अडीअडचणीच्या वेळी, सणावारी, लग्नाच्या प्रसंगी किंवा पेरणीच्या वेळी त्यांना व्यापारीच उपयोगी पडतात. गावाचे वातावरण असे प्रामाणिक असते की अडीअडचणीच्या वेळी उपयोगी पडणाऱ्यास केवळ तोंडी केलेल्या करारानुसार हे शेतकरी एकनिष्ठपणे आपले धान्य विकतात.

: हे झाले व्यापाऱ्यांच्या गटाविषयी. खेडेगावातील इतर शोषक गट कोणते ?

: व्यापारी सोडून गावात चार गट सहकार्याने गरिबांचे शोषण करतात. हे चार लोक म्हणजे प्रमुख श्रीमंत शेतकरी, गुंड, सरपंच व पोलीस. यांचा भर सहकारी भ्रष्टाचारावर असतो. गावात यांचा दरारा कैक पिढ्यांपासून चालत आला आहे.

: व्यापारी या टोळीत सामील खरे का ?

: नाही, ते महाबनेल व हुशार असतात. व्यापाराच्या जोरावर त्यांचे एवढे जबरदस्त शोषण चाललेले असते की त्यांना छोट्या छोट्या शोषणात रस वाटत नाही. किंबहुना या टोळीचे प्रकार त्यांना मानवत नाहीत. धंदा हेच व्यापाऱ्याचे प्रमुख ध्येय असते. उदा. सारा कापूस गोरज मध्येच राहील, तो साराच्या सारा आपण एकट्याने विकत घ्यावा अशा खटपटीत ते असतात. हा कापूस बडोद्यास गेला तर कदाचित त्यास दुप्पट भाव येण्याचा संभव असतो. पण हा कापसाचा ट्रक स्वतंत्रपणे गोरजबाहेर जाईल काय अशी याची जिद्द असते.

: 'व्यापारी व टोळीवाले यांच्यात तुम्हास काही फरक आढळतो ?'

: दोघांचे ध्येय एकच. शोषण. गरि-

बांना जास्त गरीब करणे व त्यांच्या जिवावर आपण गबर होणे. मात्र व्यापारी व टोळीवाले यांच्या साधनात फरक आढळतो.. टोळीवाल्याप्रमाणे व्यापारी अत्याचारी होऊ शकत नाही.

: अच्छा, म्हणजे त्यांचे शोषण अहिंसात्मक असते.

: हा, असेच म्हणा ना–

'आता टोळीवाल्यांच्या प्रकाराचे वर्णन सांग.'

: गावातील शेतकऱ्यात काही घरांकडे गावाची जबाबदारी पूर्वापार चालत आली आहे. गावात काहीही करावयाचे असल्यास व काहीही झाले तर यांचा सल्ला विचारण्यात येतो. आणि न्याय देण्याचे कामही याच २-४ मंडळीकडे असते. ही Monopoly Power यांच्या डोक्यात गेली आहे. या संधीचा ते पुरेपूर फायदा उठवितात. त्यांचा सल्ला व न्याय हा फक्त त्यांच्या व त्यांना साथ देणाऱ्यांच्या फायद्याच्या दृष्टीने निश्चित केला जातो.

: वर वर्णन केलेल्या टोळीवाल्यापैकी इतर तिघे–गुंड, पोलीस व पंचायत. या दोन चार प्रमुख शेतकऱ्यांपैकीच काही जण पंचायतीत बसतात, सरपंच दाखवितो की तो साऱ्या गावचा आहे. पण तोही या लोकांना आतून मिळालेला असतो.

: प्रमुख शेतकरी आर्थिकदृष्टया कसे असतात ?

: गडगंज त्यांना काय, इतरांची लूटच करायची ना ? उदाहरण म्हणून सांगतो. एखाद्या माणसास त्रास द्यायचा यांनी ठरविले की पोलिसांच्या मदतीने त्या माणसावर दारूची भट्टी चालविण्याचा किंवा चोरी करण्याचा आरोप ठेवला जातो. त्यास पकडून मारहाण होते. उपाशी ठेवले जाते. कंटाळून हा माणूस शेवटी गुन्हा कबूल करतो. मग त्याच्यापासून पन्नास रुपये, शंभर रुपये उकळविले जातात !

: पण पैसे जवळ नसल्यास ?

: बहुधा त्याच्याजवळ पैसे नसतातच. अशा वेळी मागणी होते ती in kind ची, कॅशची नाही.

: म्हणजे ?

: त्यांच्यापाशी असलेले झाड, गुरे, ढोरे, दुभती गाय, शेती किंवा तयार पीक, जमीन, मुलेबाळे–यातील काहीही त्यांना द्यावे लागते. मुलेबाळे राबण्यासाठी फुकट मिळतात, दुभती गाय दुधासाठी तर पिकापैकी काही हिस्सा सरळ सरळ लुबाडला जातो.

: हे क्रौर्य आहे–

: डॉक्टरसाहेब, हे तर काहीच नाही. तुझी बायको व मुलगी माझ्याकडे धाड अशीही मागणी हे गुंड शेतकरी करतात आणि त्यांची मागणी पुरविली जाते.

: पण ह्यास विरोध होत नाही ?

: विरोध झाला तरी न्याय देणे यांच्याच हाती असते ना ?

: सरपंच काय करतो ?

: त्याची खरी ड्यूटी म्हणजे गावचे शासन, गावाचा खरा राजा तो. पण हा या टोळीवाल्यांना इतका मिळालेला असतो की स्वतंत्रपणे निर्णय घेणे त्याच्याच्याने अशक्य होऊन बसते.

समजा, कोणाचा चुकून विरोध झालाच तर गुंड त्यांच्या दिमतीला असतातच. दारू पिऊन असे ठोकून काढतात ह्या विरोधकांना की पुसायची सोय नाही. त्यामुळे ह्या लोकांचा धाक वाढतो, दरारा वाढतो. पुन्हा कोणी विरोध करायला उभा राहात नाही.

: आणि पोलीस ?

: पोलीस मुख्य म्हणजे एवढ्या interior पर्यंत पोहचतच नाही. समजा पोलीस पोहचलेच तर ते ह्या टोळीवाल्यांना विचारतात, काय हकीगत आहे, तुमचे काय म्हणणे आहे ? ह्याच लोकांकडून हे पोलीस पैसे काढतात.

: पैसे कशासाठी ?

: हे टोळीवाले पोलिसांना 'मामला संपला' (पती गयु) असे समजावतात, चहापाण्याचे पैसे देतात व वाटेला लावतात. पोलिसांची राहाण्याखाण्याची सोय सरकार थोडीच गावात करते ? तोही विचार करतो व तालुक्याच्या गावी मुक्कामाला जातो.

: काँग्रेस सरकार ह्या गावाच्या शासनात कोणती भूमिका करते ?

: ही सारी कर्मचारी माणसे काँग्रेस सरकारचीच असतात, पंचायत काँग्रेसचीच. त्यावर सहीशिक्का काँग्रेसचाच. अर्थात काँग्रेस हे नाव तेथे गैरहजर असते. पण पांढरी खादी टोपी ही सर्वत्र हजर असते. व्यापाऱ्यापासून पंचायतीपर्यंत ! यांच्या तोंडी 'गरिबी हटाव 'च्या घोषणा असतात. आमच्या गावी एक मंत्री आले होते. समाजवाद, गरिबांची सेवा, गरिबी हटाव, गांधीवाद वगैरे मोठमोठे भव्य शब्द वापरून त्यांनी साऱ्यांना गार केले व निघून गेले. लोकशाहीचा हजार वेळा उच्चार केला त्यांनी पण ही लोकशाही आहे का हे तुम्हीच मला सांगा.

: पंचवार्षिक योजनांचा तुमच्या गावाला किती फायदा झाला ?

: जराही नाही. योजनेतील तरतूदी मात्र डोळे दिपविणाऱ्या आहेत. अर्थात प्रत्यक्षात त्यातील काहीही घडत नाही. उदा. पाण्याची सोय, पक्का रस्ता तयार करणे, नदीवर पूल बांधणे, चेक डॅम बांधून त्यातून कालवे काढून शेतीसाठी ते पाणी वापरणे, शिक्षणाची पुरी सोय करणे, खते पुरविणे, औषधोपचाराची सोय करणे – हे सारे आकर्षक वाटते. ह्या साऱ्या सरकारी योजनाच आहेत पण गेल्या पंचवीस वर्षात या योजना फक्त कागदावरच राहिल्या आहेत.

: पण सुधाकर, तुझे या गावातील कार्य कोणते ?

: ही परिस्थिती समजवून घेऊन ती समाजासमोर ठेवणे हे पहिले व किचकट काम मी आज तेथे करीत आहे. आज साऱ्या सुशिक्षित समाजास आपला देश या खेडेगावी चालणाऱ्या भ्रष्टाचारामुळे विकसित होऊ शकत नाही हे ठाऊकच नाही. तेथे आपले लाखो रुपये, चांगली माणसे व साधने उगीच अडकून पडली आहेत. कोणत्याही विरोधी पक्षाचे इकडे लक्षच नाही. कारण हे टोळीवाले कोणात्याही पक्षास गावात येऊनच देत नाहीत. हे आले तरी

निवडणुकांपुरतेच येतील, पुन्हा वर्षभर चरण्यास आपल्यास रान मोकळे, असे या पुंडाचे धोरण असते व आजवर तरी ते धोरण यशस्वी ठरले आहे.

: अशा परिस्थितीत तुझ्यासारख्या सामाजिक सेवकाच्या जीवाला धोका खरा !

: चांगलाच. दीड महिनाभर तर ह्या गुंडांनी मला राहाण्यास जागा व जेवणासाठी अन्न मिळू नये अशी उत्तम व्यवस्था ठेवली. त्यांनी माझ्याविरूद्ध whispering कॅंपने सुरू केली. मला धाकधमक्या येण्याचे सुरू झाले. माझ्या कामात निरनिराळ्या मार्गांनी अडथळे निर्माण केले गेले. माझ्या प्रत्येक हालचालीवर पाळत ठेवली जाऊ लागली. माझी सारी पत्रे — येणारी व जाणारी— फोडून वाचण्यात येतात. मला जास्तीत जास्त मदत तरुणांची मिळणार हे जाणून तरुण वर्गात माझी बदनामी सुरू करण्यात आली. तरुणांना वश करून घेऊन माझ्याविरुद्ध कारस्थाने सुरू करण्यात आली. मला मित्र वाटणारे तरुण फोडण्यात आले व त्यांच्या मदतीने माझ्याविषयीची माहिती गोळा करण्यात आली. ह्या माहितीचाच पुढे गैरवापर करण्यास सुरुवात झाली.

: ह्या धाकदपटशामुळे तुझ्या मनावर कोणता परिणाम झाला ?

: हा सारा काळ माझ्या मानसिक चिंतेचा, अशांत स्थितीचा होता. खेडेगावचे वातावरण व राजकारण मला नवीन होते. मी तेथे राहीन की नाही अशी भीती मला वाटू लागली. उपासमार, अपमान व असहकार यांच्यामुळे मी अधूनमधून बेजार व उदास होई. ध्येयनिष्ठा असल्यामुळे मी तसाच येथे चिकटून राहिलो. परत बडोद्याला गेलो तर मला पै-पैसा धाडणाऱ्या मित्रांचा तो द्रोह होईल अशी भीतीही मला वाटे. माझे जुने संघाचे संस्कार अशा वेळी उपयोगी ठरले.

: पुढे ?

: कालांतराने खूप पाळत ठेवल्यावर या गुंडांना माझी ध्येयनिष्ठा व लोकसेवेच्या निःस्वार्थी हेतूचा शेवटी शोध लागला व ते त्यानंतर माझ्याविरुद्ध कारस्थाने करण्यास लाजू लागले. अर्थात टेहेळणी, पाळत वगैरे प्रकार आजही चालूच आहेत.

: तुझा पुढचा कार्यक्रम कोणता ?

: सरकारी योजना ज्या आज कागदावरच पडून आहेत त्या जरी मी साकार करू शकलो तरी मी स्वतःस धन्य समजेन. यासाठी मला गावकऱ्यांचा सहकार व माझ्या शिकलेल्या मित्रांची मदत लागेल. शिकलेली व सन्मान्य वकील, डॉक्टर, इंजिनियर्स, शिक्षक वगैरे मंडळी माझ्या गावी भेट देऊ लागली व सहकार्य देऊ लागली तर गावात एक निराळे वातावरण तयार होईल. त्यातून माझ्या गावाचा सामाजिक व आर्थिक विकास साधण्याची माझी योजना आहे. अर्थात त्यासाठी खूप वेळेची, माणसांची व पैशाची जरूर लागणार आहे.

: पण ही मदत कशी मिळेल ?

: योजनांसाठी तर सरकारी पैसा भरपूर आहे. प्रश्न आहे तो गावास न मिळू देणाऱ्या गुंडांचा. त्यांचे पारिपत्य

कसे करावे हा मोठा प्रश्न आहेच. जनता जागृत झाली तर त्या जनतेच्या दाबासमोर हे लोक आपोआप नमतील अशी माझी खात्री आहे. जनता असंख्य आहे, त्याउलट हे लोक मूठभर आहेत. मात्र धाकधपटशा व दमबाजी यांच्या जोरावर हे गुंड ह्या दुर्बळ जनतेस आजपर्यंत नमवीत आले आहेत. त्या जनतेस कोणी निःस्वार्थी पुढारी लाभला नाही. जे पुढारी झाले ते ह्या गुंडांनी खिशात टाकून गट्ट केले. एकाचा तर खून झाला पाच वर्षांपूर्वी !

: अशा परिस्थितीत या कार्यास तयार कोण होणार ?

: बडोद्यातील आमच्या युवाशक्ती संघटनेपाशी अडीचशे तरुण सामाजिक कार्यासाठी आज तयार आहेत. गोरज ग्राम योजनेसाठी त्यापैकी काहीजण स्वतःच्या जीवनातील एक-दोन वर्षे देण्यासाठी तयार आहेत. काही पार्टटाईम यावयास तयार आहेत. डॉक्टर त्यांची विद्या, इंजिनियर त्यांची कला, शिक्षक त्यांचे ज्ञान आमच्या योजनेसाठी द्यावयास तयार आहेत. ह्या साऱ्यांचा गावातील लोकांवर निश्चित परिणाम होणार आहे. आमचे संस्कार- पाहून त्यांच्यात बदल होईल अशीही आशा आहे.

: याचा Final outcome काय ?

: आमच्यापासून स्फूर्ती घेऊन इतर अनेक तरुण पुढे येतील व असे कार्य त्यांच्या संस्थांतर्फे इतरत्र पुढे चालू ठेवतील—या साऱ्याची एकंदर बेरीज झाल्यास पुढील दशक दोन दशकांत तरुणांना एक नवीन दिशा लाभेल असे मला वाटते.

● ● ●

कामगार जगत्

# हिंद सायकल्स एक गुंता !

माणूस प्रतिनिधी

१ ऑगस्ट पासून 'हिंद सायकल्स' कारखान्यात टाळेबंदी पुकारण्यात आली होती. त्याआधीच, संचालकांना डावलून, कामगारांनी कारखान्याचा ताबा स्वतःकडे घेतला. २७ जुलै ते ३१ जुलैच्या ह्या काळात, कामगारांनी सहाशे-सातशे साकलींचे उत्पादन केले होते. ह्याच सुमारास 'सुरी-अहवाल' बाहेर आला होता. टाळेबंदी आणि कारखाना कायमचा बंद करण्यासाठी संचालकांनी जी कारणे दिली होती त्या संबंधात व एकंदर कंपनीच्या व्यवहाराची चौकशी करण्यासाठी ही 'सुरी'—समिती नेमली गेली होती. समितीच्या अहवालाचा अभ्यास करून काही निर्णयाप्रत येईपर्यंत 'कारखानाबंदी'ची कारवाई स्थगित करावी अशी विनंती महाराष्ट्र शासनाने मॅनेजमेंटकडे केली होती आणि तरी देखील मॅनेजमेंटने १ ऑगस्टपासून कारखाना कायम बंद करायचा निर्णय मागे घेतला नाही.

कामगारांचा प्रतिकात्मक लढा, शासनाच्या चाललेल्या खटपटी ह्या साऱ्यांना धाब्यावर बसवून चालकांनी आपला निर्णय कायम ठेवला. ३१ जुलै किंवा १ ऑगस्टला सर्व कामगारांना त्यांची बाकी चुकती करायची आणि कंपनीला टाळे ठोकायचे. कायमचे टाळे ठोकायचे ही चालकांची भूमिका. दोन्ही बाजू ३१ जुलैला निकरावर आल्या. दिल्लीपर्यंत तक्रारी गेल्या. प्रमुख कामगार संघटना, 'गरिबी हटाव कामगार युनियन'चे नेते श्री. तुषार पवार ह्यांनी दिल्लीत ठाण मांडले. ह्या साऱ्या दडपणांना शेवटी मर्यादित यश लाभले, आणि १ ऑगस्टपासून कारखाना बंद करण्याचा निर्णय चालकांनी तूर्त तरी पुढे ढकलला आहे. महिनाभर कामगारांना ले-ऑफ देण्यात आला आहे. ह्या महिन्याभरात शासनाने ह्या कारखान्यासंबंधीत अंतिम निर्णय घ्यायचा आहे. अन्यथा १ सप्टेंबरपासून कारखान्याला कायमचे टाळे ठोकले जाणार आहे.

'हिंदकी स्पीड-किंग साईकिले' विविध भारतीच्या श्रोत्यांना मग कदाचित त्यांची ही परिचित जाहिरात ऐकूही येणार नाही. म. गांधींच्या प्रेरणेतून, स्वदेशीच्या धारणेतून बिर्ला-समूहांतर्गत, हा सायकलींचा कारखाना स्वातंत्र्यपूर्व काळात उभा राहिला. सुरुवातीच्या आठ-दहा वर्षांत तो चाललाही चांगला. पुढे, सुरुवातीची प्रेरणा, धारणा लोपली. आला तो शुद्ध नफेखोर कारखानदारीचा, लुटालुटीचा विचार! झपाटयाने वरची मॅनेजमेंट बदलली. 'पिलानी'चे ग्रॅज्युएट्स 'बडे इंजिनियर्स' म्हणून भरती होऊ लागले. त्यांना मोठाले लठ्ठ पगार आणि काम मात्र काही नाही....आवश्यकतेपेक्षा ज्यास्त इंजिनियर्स असे भरती झाले. परिणाम उघड होते. उत्पादन घटले. दर्जा खालावला. हंगामी कामगारांची अनावश्यक भरती झाली. क्षमता घटली. अनुत्पादक खर्च वाढले आणि कंपनीने नुकसान दाखवायला सुरुवात केली. गेल्या वर्षी कंपनीने साठ लक्षाचा तोटा दाखवला. कामगारांची पगारवाढ, अधिक उत्पादन खर्च ह्यामुळे चालकांनी सायकलींच्या किंमतीत वाढ करण्याची मुभा मागितली. ती नाकारली गेली, तेव्हा कारखाना गाझियाबाद (उ. प्रदेश) किंवा पंजाबात हलवण्याची परवानगी मागितली तीही शासनाने फेटाळली. अधिक आर्थिक मदतही (सुमारे चार-पाच कोटी) कंपनीला मिळवणं 'जमलं' (?) नाही. शेवटचा उपाय म्हणून चालकांनी कंपनीला कायमचे टाळे ठोकायची घोषणा केली. चोवीसशे कामगारांना नोकरीतून कायमचे मुक्त करायची घोषणा केली. सायकलींची किंमत वाढवून देत नाही, कारखाना अन्यत्र (मराठवाडा वा नाशिक वगैरे विभागातही कारखाना न्यायची तयारी मालकांनी दाखवली होती!) हलवायला परवानगी मिळत नाही, कारखान्याला आलेला तोटा भरून काढून तो सुरळीत चालवायला आवश्यक ती मदतही मिळत नाही.

साहजिकच कारखाना बंद करणे एवढाच पर्याय शिल्लक उरतो. कंपनीच्या मालकांची मला समजलेली भूमिका ही, अशी !

'कंपनीच्या मालकांची' हा शब्द-प्रयोग करताना थोडा खुलासा इथे करणे आवश्यक आहे. 'मालक' म्हणजे इथे बिर्ला. त्यांच्याकडे संचालकत्व आहे म्हणून. परंतु त्यांची कंपनीतली भागिदारी फक्त अकरा टक्क्यांचीच आहे. आणि तरीही सर्व सत्ता कंपनीभर त्यांचीच आहे हा ह्या कारखान्यातला 'विनोद' म्हणावा लागेल ! हिंद सायकल्समध्ये ६५% गुंतवणूक आयुर्विमा, सेंट्रल बँक, स्टेट बँक, आदी सार्वजनिक (किंवा सरकारी) संस्थांची आहे. 'गरिबी हटाव' युनियनचे इथले एक प्रमुख कार्यकर्ते श्री. दिना कामत ह्यांच्या म्हणण्यानुसार, ह्या शासकीय संस्थांचे प्रतिनिधित्व देखील संचालक मंडळावर नाही. इतकेच नाही, पण ह्या संस्था आपण गुंतवलेल्या पैशाचा विनियोग कसा होतो हे पहायला देखील कुणाला कंपनीत धाडत नाहीत ! साहजिकच बिर्लांना मनःपूत कारभाराला रान मोकळे मिळते, पैशांची उधळपट्टी होते आणि कामगार मधल्यामधे भरडला जातो. म्हणूनच ह्या लॉक आऊट विरुद्ध आमची संघटना उभी आहे !

कारखान्याला गतवर्षी ६० लाखांचा तोटा झाला हे खरे आहे. पण सूरी समितीच्या अहवालानुसार आणि तिथल्या तंत्रज्ञांनी मला सांगितले त्यानुसार हा तोटा अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे झाला हेही तितकेच खरे ! साधारणतः १८०० ते २००० कामगारांमध्ये, रोजी १५०० सायकलींची उत्पादनक्षमता ह्या कारखान्याची आहे. अमेरिका इंग्लंडसह अनेक देशांकडून मोठ्या प्रमाणावर ऑर्डर्स आहेत. अंतर्गत ऑर्डर्सदेखील चिकार आहेत. असे असूनदेखील उत्पादन मात्र जेमतेम आठशे सायकलींचे आहे. मेंटेनन्स बरोबर नाही. कामगार भरती आवश्यकतेपेक्षा जास्त आहे. आणि मुळात चालकांची कारखाना मुंबईत चालवायलाच फारशी तयारी नाही. ह्या सार्‍याचा परिणाम आजची कंपनीची अवस्था आहे ! शासन, आयुर्विमा, राष्ट्रीयीकृत बँका ह्यांनी वेळीच लक्ष घातले असते तर कदाचित ही अंदाधुंदी टाळता आली असती. आजही टाळता येईल. पण चालकांना उत्सुकता नाही आणि सरकारी यंत्रणांना जागे करणे मोठे कठीण काम असते.

चालकांना उत्सुकता नाही. त्याचीही कारणे विचार करायला लावणारी आहेत. मुंबईत, भारतातल्या इतर कुठल्याही ठिकाणापेक्षा उत्पादन खर्च अधिक असतो ही वस्तुस्थिती आहे. त्यातही सध्याच्या कारखान्यात सर्व सुटे भाग कारखान्यातच बनवले जातात. त्यांची स्वतंत्र खाती जोपासावी लागतात. पंजाबात ठिकठिकाणी सुटे भाग बनवून मिळतात. ते तिथून आपल्या आवश्यकतेनुसार बनवून घेतले नि शेवटची फक्त जुळणी आपल्या कारखान्यात केली तर उत्पादन खर्च बराच कमी

येतो. कारण अशा छोटया छोटया 'शॉप्स'मधून कामगार अत्यल्प वेतनात उपलब्ध असतो साहजिकच जो फायदा मुंबईत सायकल उत्पादनाचा अद्यावत कारखाना चालवून मिळू शकेल, त्याच्या जवळजवळ दुप्पट फायदा वरील पद्धतीत मिळू शकेल. शिवाय ह्या पद्धतीत कटकटीही फारच कमी राहतात.

कारखाना बंद करण्यासंबंधीचे जे दुसरे कारण मला ऐकवले गेले ते मालकांची ह्याहीपेक्षा जास्त लबाडी दाखवणारे आहे. वरळीला हिंद सायकल्सला लागून ग्लॅक्सो कंपनी आहे. 'हिंद सायकल्स'च्या ह्या जागेत ग्लॅक्सोचा विस्तार करायचा अशी एक योजना आहे म्हणे. ग्लॅक्सोला ते बरेच फायद्याचे ठरणारे आहे आणि, गुप्त करारानुसार ह्या जागेची जी किंमत बिर्लांनी मागितली आहे त्यामुळे त्यांचाही मोठा फायदा होणार आहे. कसल्याही कटकटी न करता कामगारांची सर्व थकबाकी चुकवूनही हिंद सायकल्सच्या चालकांना म्हणे कित्येक लाख पदरात पाडून घेता येणार आहेत. मला मिळालेल्या ह्या बातमीला श्री. दिना कामतांचाही दुजोरा मिळाला. बिर्ला मंडळींचा हा कारखाना बंद करायचा मानसच मुळी ह्या अफलातून 'व्यवहारावर' आधारलेला आहे. आणि हे खरे असेल, तर कामगारांच्या जीवनाशी खेळणारा कंपनीचा हा डाव भयानक मानावा लागेल.

म्हणूनच, सूरी-समितीच्या अहलालाचा पूर्ण विचार करून शासनाने वेळीच खंबीर पावले टाकणे आवश्यक आहे. प्रसंगी कारखाना ताब्यात घ्यावा लागला तरी हरकत नाही, परंतु ११% चालकांच्या ह्या योजना उधळून लावायला हव्या आहेत ! २४०० कामगारांच्या गळयाला बसलेला फास ढिला करायला हवा आहे ! ! ◻

## कॅलिको : स्फोटक परिस्थिती ! !

२८ जुलैच्या 'माणूस' मधून कॅलिको केमिकल्समध्ये ओळीने झालेल्या चार अपघातासंबंधी मी लिहिले होते. त्याचवेळी तिथल्या कामगार नेत्यांशी बोलण्याची मला संधी मिळाली. जे समजले त्यावरून चेंबूरमधल्या ह्या भल्यामोठ्या कारखान्यातले एकंदर वातावरण अतिशय स्फोटक असल्याचे जाणवले. खोलात शिरलो तेव्हा असंतोष किती आहे ते जाणवले. इथल्या वातावरणात वेळीच हस्तक्षेप झाला नाही, मॅनेजमेंटने व कामगार संघटनेने (सीटू) संयम बाळगला नाही तर केव्हाही भडका उडू शकेल आणि तो कदाचित गोदरेज किंवा करोना साहू किंवा सिअॅट टायर्स ह्या कंपन्यातल्या गाजलेल्या उद्रेकाएवढाच भयानक ठरू शकेल.

ह्याचे छोटेसे प्रत्यंतर परवाच आले. कंपनीचे जनरल मॅनेजर श्री. भवनानी ह्यांची गाडी कंपनीच्या गेटबाहेर अड-

वली गेली. तब्बल अर्धातास गाडीला घेराव पडला. शेवटी सुरक्षा दलाच्या मदतीने भवनानींना स्वतःची सुटका करून घ्यावी लागली.

कंपनीच्या आवारात बलिष्ठ असणाऱ्या 'सीटू' संघटनेच्या नेत्यांच्या म्हणण्यानुसार, कामगारांबरोबरच्या बोलण्यानुसार ही नुसती सुरुवात आहे. '...आमच्या मागण्या मान्य न झाल्यास असे 'घेरावो' रोज घालावे लागतील!' एक संतप्त कामगार मला सांगत होता.

ह्या कंपनीतल्या कामगारांच्या सहनशक्तीचे मात्र मला कौतुक वाटते. तब्बल ८।१० वर्षे कोर्टाच्या निकालाकडे डोळे लावून ह्या कामगारांनी संयम दाखवला. १९६३ ते १९७१ एवढ्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर 'लाला ॲवॉर्ड' आला तो कामगारांचे हित घेऊन. पण आधी स्विकारण्याचे मान्य करूनही, ऐनवेळी ह्या लाला निर्णयाविरुद्ध कंपनी हायकोर्टात गेली. तिथे निर्णय कंपनीविरुद्ध गेला तेव्हा कंपनीने सुप्रीम कोर्टाकडे धाव घेतली. तशी धाव घेताना काही पैसा कंपनीने कामगारांना 'इंटेरिम रिलीफ' म्हणून दिला. सुप्रीम कोर्टात खटल्याच्या चालू असलेल्या कामकाजाचा अंदाज घेऊन कंपनीने तिथून माघार घेतली. कामगारांना वाटले, कंपनी आता पैसे देणार. लाला निवाडा स्विकारणार. पण कसचे काय! कंपनी पुनः हायकोर्टात गेली. कुठल्यातरी कलमाचा आधार घेऊन! नुकताच कंपनीचा तिथेही पराभव झाला. पण कंपनीचे शेपूट अजूनही वाकडेच आहे. आता कंपनीला पुन्हा सुप्रीम कोर्टाकडे जायचे आहे. एखाद्या पट्टीच्या 'वेळकाढू' क्रिकेटपटूने मॅच 'ड्रॉ' करण्यासाठी निर्लज्ज वेळकाढू खेळण्याचे धोरण स्विकारण्यासारखेच हे आहे! फरक एवढाच की, तिथे फलंदाजाला शिव्या खाव्या लागतात, इथे कामगारांची पिळणूक होत आहे!!

इथे सुरुवातीला 'इंटक'ची संघटना होती तिला अर्धचंद्र मिळून जनसंघ-स्वतंत्र कार्यकर्ते असलेल्यांची 'वर्कर्स-युनियन' आली. तिच्याच कारकिर्दीत, १९६३-६४ मध्ये कोर्टात खटला उभा राहिला. १९६५ मध्ये कोर्टापुढे 'केस' असतानाच, बोनससाठी १८ दिवसांचा अयशस्वी संप झाला. त्यात अनेकांच्या आहुत्या पडल्या. त्या अयशस्वी संपाबरोबरच ती युनियनही लोप पावली आणि आर. जे मेहतांनी कंपनीत प्रवेश केला. त्यांनीच सुमारे ७।८ वर्षे कंपनीची बाजू सातत्याने कोर्टात मांडली. १९७१ मध्ये कामगारांच्या बाजूने, लाला-आयोगाने निवाडा दिला. पण पुढे वर सांगितल्याप्रमाणे वेळ काढू धोरण कंपनीने अवलंबिले. एवढेच नाही तर, इंटेरिम रिलीफ देतांना, स्वतःच्याच वेगवेगळ्या कामगारांना वेगवेगळ्या पद्धतीने वर्तणूक देऊन कंपनीने कामगारात दुफळी माजवून दिली. कॉस्टिक सोडा, कार्बाईड व पी. व्ही. सी. हे तीन विभाग ह्या कंपनीत सुरुवातीला होते. त्यांना या ह्या इंटेरिम रिलीफ कंपनीने दिला. तर नंतर अस्तित्वात आलेल्या, कांपाऊंडींग, टी. सी. ई., पी. व्ही. ए.

आदि विभागांना हा फायदा कंपनीने नाकारला. ह्या तीन विभागांच्या कामगारांना आरजेंनी देखील म्हणे उडवा उडवीची उत्तरे दिली आणि इथेच कॅलिको कामगारात दुफळी माजली.

ह्या तीन खात्यांचा असंतुष्ट कामगार 'सिटू 'कडे सध्या गेला आहे. त्याच्या लढाऊ धोरणाने काही तात्कालिक फायदेही मिळून गेले. आज, कारखान्याच्या आणखी वेळकाढू धोरणामुळे, इतर खात्यांचा कामगारही 'सिटू 'कडे झुकू लागला आहे.

ह्यातच सुपरवायझर्सची संघटनाही 'सीटू 'च्या कॉ. परेरांच्या नेतृत्वाखाली उभी राहिल्याने परिस्थिती आणखी चिघळली आहे. 'सुपरवायझर्स' ही मॅनेजमेंटची शेवटची पायरी. तोच कामगार-मॅनेजमेंटमधला महत्त्वाचा दुवा, हा दुवाच निखळल्यामुळे, परिस्थितीतला तणाव वाढला आहे. ह्या दुव्याला संतुष्ट ठेवण्याचा प्रयत्न नेहमीच बहुतेक सर्व मॅनेजमेंटस् करतात. खास जादा पगारवाढी, काही विशिष्ट सवलतीद्वारा त्याला खूष ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु इथे त्याच्यावरच्या बंधनामुळे, कुठल्याही सुविधा उपलब्ध नसल्याने तो आधीच संत्रस्त झाला होता. 'सीटू 'नी प्रयत्न करताच तो चटकन संघटित झाला. आणि तो संघटित होताच, त्याचे प्रश्न समजावून घ्यायच्या ऐवजी त्याची संघटनाच तोडायचे प्रयत्न मॅनेजमेंटने केले. साहजिकच, चिडलेला हा 'बाबू' कर्मचारी ह्या जुलुमाविरूद्ध अधिकच संघटित झाला. आजही ह्या संघटनेला कंपनीने मान्यता दिलेली नाही. पण जवळ जवळ चारशेहून अधिक संख्या असलेल्या ह्या संघटनेने आपला दरारा चांगलाच बसवला आहे!

ह्या कारखान्यातल्या कामगारांना आज ह्या पद्धतीच्या अन्य कारखान्यांच्या मानाने वेतन अत्यल्प आहे. सुविधा कुठल्याही नाहीत. कॅंटिन नावालाच आहे. 'सॅनिटेशन' नावाची चीज असते हे तर कंपनीला जणू ठाऊकच नाही. 'सेफ्टी' विषयीची बेफिकिरी मागील अंकात मी सांगितलीच आहे!

ह्या साऱ्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी, पगार वाढवून घेण्यासाठी सीटूनी लढा उभारला आहे. तो दिवसेंदिवस उग्र बनत चालला आहे. तणाव वाढतो आहे. वातावरण स्फोटक बनू पाहत आहे! म्हणूनच स्फोटापूर्वीच हस्तक्षेप घडून येणे आवश्यक आहे!

'ता. क. स्टाफ युनियनचे सेक्रेटरी श्री.बाळाजी दिघास्कर ह्यांच्यावर अत्यंत अनपेक्षितपणे कंपनीतून काढून टाकल्याची नोटीस बजावण्यात आली. स्टाफच्या अडचणी समजावून घेऊन, त्याच्याशी बोलणी करून मार्ग काढायचा रास्त मार्ग मॅनेजमेंटने टाकलेल्या ह्या पावलाविरूद्ध कॅलिकोच्या दोन हजार कामगारांनी दि. १० ऑगस्टपासून संपाचे हत्यार उपसले आहे. परिस्थिती अधिक चिघळविण्यासाठी, पोलीस व एस. आर. पी. चे जथे कंपनीने गेटवर आणून ठेवले आहेत आणि ते देखील कामगार अत्यंत शांत असतांना! परिस्थिती गंभीर वळणे घेऊ पाहत असल्याचीच ही चिन्हे आहेत!

१७ ऑगस्ट ७३

¤ ¤ ¤

सुभाष नाईक

# 'झुलता पूल'

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विष्णुशास्त्री चिपळूणकर सभागृहात शनिवारी संध्याकाळी 'थिएटर ॲकॅडमी' च्या तरुण कलावंतांनी 'झुलता पूल' या सतीश आळेकर लिखित एकांकिकेचा प्रयोग सादर केला आणि प्रयोगानंतर त्यावर चर्चा झाली. या चर्चेत प्रभाकर पाध्ये प्रा. अरविंद मंगरूळकर, सौ. सरिता पदकी, माधव वझे, डॉ. विद्याधर पुंडलिक, डॉ. जब्बार पटेल आणि सतीश आळेकर यांनी भाग घेतला.

साहित्य परिषदेचं चिपळूणकर सभागृह...नामवंत साहित्यिक, समीक्षक आणि रसिक प्रेक्षकांनी फुललेलं... 'थिएटर ॲकॅडमी'चे तरुण कलावंत 'झुलता पूल' या एकांकिकेचा प्रयोग सादर करताहेत...एकांकिका दिग्दर्शित केलीय् स्वत: लेखकाने...सतीश आळेकरांनी...अगदी साध्या पण सूचक पद्धतीनं...नेपथ्याचं अवडंबर नाही... क्वचित प्रकाश योजना...संगीताचे सूर ...कधी शब्दच शब्द तर कधी 'माईम' पद्धतीचा अभिनय ... अनेक बारीक सारीक गोष्टी सफाईदारपणे केल्या जातात...नायक स्वत: कधी निवेदक बनतो तर कधी भूमिकेत इतका समरसून जातो...तरुणाची व्यथा वेदना बोलकी होते...आणि.. आशय प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्याची ही धडपड चालू असते...

पण प्रेक्षकांकडून खरा मिळायला हवा तो प्रतिसाद मिळतच नाही... क्वचितच कुणी एखादा खुद्कन हसतो. आजूबाजूला पाहतो आणि पुन: चौकोनी चेहरा करून प्रयोग पाहू लागतो... एकांकिका संपते आणि टाळ्या पडतात.. नेहमीप्रमाणे.

आणि चर्चेच्या सुरुवातीलाच सरिता पदकी प्रेक्षकांच्या या मख्खपणाबद्दल मोकळेपणानं बोलतात...' प्रयोग पाहून आपल्याही मनात पडसाद उमटले असतील...पण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसमोर भरगच्च हॉलमध्ये होणारा याच एकांकिकेचा प्रयोग...तरुण विद्यार्थ्यांचा इतका उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता...

प्रत्येक वाक्य उचललं जात होतं.. बारीकसारीक संदर्भ त्यांच्या चटकन् लक्षात येत...आणि ती तरुण मुलंही हसता हसता गंभीर होत...त्यांना यातलं गांभीर्यही कळत असे...तरुणांच्या मनात खदखदणाऱ्या व्यथेला, वेदनेला, पराजयाला वाचा फोडणारी ही एकांकिका...पाहून त्यांची तरुण मनं डिस्टर्ब होत...अस्वस्थ होत. आणि आज इथे पाहिलं...बुजुर्ग प्रेक्षक फारसे हलत नाहीत...प्रयोग हा प्रेक्षकनिष्ठ असतो– आणि प्रेक्षक बदलताच त्याचे स्वरूप कसे बदलत जाते याचा इथे जणू वस्तुपाठच मिळाला..."

परंतु कसे का असेना परिषदेच्या सभागृहात 'थिएटर अॅकॅडमी' सारख्या संस्थेच्या प्रायोगिक एकांकिकेचा प्रयोग आणि त्यावर चर्चा घडते हे पाहून सरिताबाई आपला आनंद व्यक्त करतात...मनापासून एकांकिकेसंबंधी बोलू लागतात..."एकांकिका समजू शकते.. ती दुर्बोध नाही. तरीदेखील लेखक याच्यात फार बोलला अशी माझी तक्रार आहे. लेखक यात फार डोकावतो असं वाटतं. लेखकाला काही वेगळं सांगायचं आहे...ती त्याच्यातील उर्मी ...तो जोम...जुनी तंत्रे मोडून तोडून ठराविक साच्यात जे सांगणं शक्य नाही त्यासाठी स्वतःचा नवा विशिष्ट फॉर्म निवडला. प्रयोग करून दाखवला...हे सारे चैतन्याचे निदर्शक आहे...ज्या तऱ्हेनं त्यांनी तो मांडला ती तऱ्हा...तो फॉर्म...त्याच्यातून लेखकाच्या मनातला लाइफफोर्स जाणवला...ह्यातलं चैतन्य आवडलं मला...

ती तरुणी जेव्हा त्या तरुणाच्या घरी येते तेव्हाचं ते दृश्य...एकमेकांना बोलण्याची...तारुण्यातल्या गप्पा मारण्याची इच्छा आहे पण नाइलाजानं...त्या तरुणाचे वडील स्वतःच्याच जगात गुरफटलेले... सेन्सिटिव्हिटी हरवून बसलेले...त्यांना आपल्या मुलाचं मन... पाहुण्या तरुणीचं मन कळत नाही ... आणि त्या तरुणांच्या मनातील अस्वस्थता...हे दृश्य चांगलं रंगवलंय...पण आळेकरांनी त्या श्रीमंत तरुणीचं मन फार खोलात जाऊन पाहिलेलं नाही, अशी माझी तक्रार आहे...

नाटकात फार निवेदन नसावं असं मला वाटतं. जे काही सांगायचं ते दृश्य, संवाद, अभिनयाद्वारे सांगायला हवं...पण आळेकरांनी निवेदनाचा वापर करून जो मार्ग स्वीकारला तो स्वीकारायला नको होता...परंतु उत्साहाच्या भरात त्यांनी ही एकांकिका लिहिली आणि त्यानंतर त्यावर हात फिरवावा असं त्यांना वाटलं नसावं"

सरिता पदकीनंतर बोलायला उठतात ते प्रभाकर पाध्ये. "सरिताबाईंनी आपलं वर्णन 'बुजुर्ग' असं केलं परंतु माझं भाषण ऐकल्यानंतर आपण 'बुद्रुक' असं माझं वर्णन कराल की काय अशी भीती वाटते..." असं म्हणत म्हणत ते पुढे बोलू लागतात..." 'झुलता पूल' ही एकांकिका मी वाचली...पाहिली आणि असं वाटलं की हे चाललंय काय? हे कशासाठी चाललंय ? ... सरिताबाईंच्या बोलण्यातून माझ्या या प्रश्नाचं

थोडसं उत्तर मिळालंय्...महाविद्यालयीन तरुणांना हे नाटक आपलं वाटलं...तरुणाच्या मनातले रुद्ध विचार यात व्यक्त केले आहेत...परंतु तरुणीच्या मनाचं दर्शन घडत नाही ही सरिताबाईंनी केलेली तक्रार बरोबर आहे, दुसरी तक्रार म्हणजे नायकाचं निवेदन...तो आपल्या भूमिकेतून दूर होऊन सूत्रधार बनतो...लेखकाला नाटकामध्ये पुढे येऊन बोलायचं कारण काय ?...हे नाटक रिॲलिस्टिक स्वरूपाचं आहे...मग दिग्दर्शक यातील तरुणतरुणीला स्टायलाइज्ड पावलं टाकीत रंगभूमीवर का आणतो ?... दिग्दर्शकाला असं का वाटतं ? असं का होतं ?" असे प्रश्न निर्माण करीत करीत आणि उत्तरे शोधीत शोधीत पाध्ये पुढे सांगू लागतात..." या नाटिकेचा लेखक हा काय आहे ? तो नाटिकालेखक नसून एक लघुकथालेखक आहे...ही एक चांगली लघुकथा आहे...या लेखकाची प्रतिभा ही कथालेखकाची आहे... यातील काही कल्पना फार चांगल्या आहेत...तरुणतरुणी एकमेकांना भेटतात पण जवळ येऊ शकत नाहीत...हे चांगलं दाखवलं आहे...पण नाटकाच्या रूपातून हे व्यक्त होत नाही... हे निवेदन आहे ते कशासाठी ?—ही एक लघुकथा आहे...चांगली." असं म्हणत म्हणत पाध्ये शेवटी सतीश आळेकरांना उद्देशून सांगतात की..."तुझे आहे तुजपाशी । परी तू जागा चुकलासी !"

प्रभाकर पाध्ये आळेकरांची दिशा चुकल्याचं सांगून थांबतात आणि अरविंद मंगरूळकर बोलायला प्रारंभ करतात. प्रारंभीच ते 'एकांकिका वाचली...प्रयोगही पाहिला परंतु प्रयोग पाहून होताच लगेच त्यावर बोलायचं हे कठीण आहे ..अडचणीचं आहे.' असं ते स्पष्टपणे सांगतात...'ही एकांकिका वाचल्यानंतर आणि तिचा प्रयोग पाहिल्यानंतर दोन्ही वेळा माझी प्रतिक्रिया वेगवेगळी झाली. ही एकांकिका वाचली तेव्हा ती मला अधिक आवडली. प्रयोग मात्र मला आवडला. कदाचित त्याला त्याचे तंत्र कारणीभूत असेल... ही एकांकिका जीवनासंबंधी आहे... 'जनरेशन गॅप' संबंधी त्यात विचार आहे...मला वाटतं तरुण, तरुणी आणि त्या तरुणाचे वडील ह्या तिन्ही व्यक्ती अलिप्त, पृथक् अशा आहेत...त्या तिन्ही व्यक्तींचं जीवन असं पृथक्... विस्कळीत दाखवण्याचा हेतू काय असावा ? लेखकाचा हेतू काय ? प्रयोजन काय ? त्यानं काय साधलंय ?' असे एकामागून एक असे प्रश्न ते उपस्थित करतात...पुढे ते प्रयोग करणाऱ्यांना असंही विचारतात की, 'यातील स्टायलाइज्ड हालचालींचे प्रयोजन काय ? त्यावाचून काही बिघडलं असतं का ? ही एकांकिका अशाच रीतीने सादर करायला हवी काय ? तशी अपरिहार्यता फॉर्ममध्ये आहे किंवा काय ? या प्रयोगातील नृत्यसदृश हालचालींचे सूत्र सांभाळलेले नाही...तसे ते सांभाळले असते तर प्रेक्षकांना तद्रूप होता आले असते. मुळामध्ये एकांकिकेचा जीवच इतका लहान असतो की इतक्या अल्पा-

वधीत प्रेक्षकांना चटकन विश्वासात घेणे आणि पुढे चालणे हे अतिशय अवघड असते. अभिनयासंबंधी मला काही सांगायचंय... आपण नाटक वाचतो त्यावेळी मनात एक नाटक तयार केलेले असते...प्रत्यक्ष रंगभूमीवर प्रयोग पाहताना त्याचा आणि मनातील नाटकाचा मेळ बसेलच असे नाही. तसे पुष्कळदा घडत नाहीच. नाटक कोलॅबोरेटिव्ह आर्ट आहे. ' माइम 'संबंधी देखील बारीक सारीक तपशील सांभाळले पाहिजेत. ' इंटिमेट ' मध्ये हे करीत असताना हे सर्व ठळकपणे जाणवले पाहिजे. मला स्वत:ला यातील—या प्रयोगातील अभिनय अचेतन वाटला. एकही मोबाइल फेस आढळला नाही. कित्येकदा कृत्रिमता जाणवली. अभिनयाची कमतरता प्रकर्षाने जाणवली... बायफोकल सीन्समध्ये त्यामधील आंतरिक फरक दाखवणे आवश्यक ठरते...' नाहीतर विस्कळीतपणा निर्माण होण्याचा संभव असतो एकंदरीत एकांकिका पाहून माझे समाधान काही झाले नाही...' इतक्या परखडपणे आपला अभिप्राय व्यक्त करून ते ' आळेकरांच्या हातून खूप घडायचे आहे...हे वेगळ्या पद्धतीने सादर करून घडायला पाहिजे तरच समाधान होईल. ' असेही सांगतात. प्रा. माधव वझे हे, ' या एकांकिकेचा लेखन व प्रयोगदृष्टया विचार करता पाध्ये आणि मंगरूळकर यांच्या मतांशी मी अनेक बाबतीत सहमत नाही ' असे सांगून पाध्ये आणि मंगरूळकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्याचा प्रयत्न करतात. ' लेखनदृष्टया विचार करता... ' घाशीराम कोतवाल 'च्या निमित्ताने झालेल्या चर्चेपासून हे नाटक आहे का ? ही एकांकिका आहे का ? ही लघुकथा आहे का ? अशा स्वरूपाचे प्रश्न सतत उपस्थित केले जातात. या एकांकिकेतील लेखकाचं निवेदन लघुकथेकडे झुकणारे आहे असे म्हणणेदेखील अशाच प्रकारचे . ज्यांची निश्चित स्वरूपाची उत्तरे मिळत नाहीत असे हे प्रश्न आहेत. माझ्या दृष्टीने यातील निवेदन हे कशाप्रकारचे आहे ह्याला महत्त्व आहे. ते नाटचपूर्ण झाले आहे का ? रंगमंचावर ते कन्व्हिन्सिंगली मांडले आहे काय ? रंगमंचाच्या संदर्भात विचार करताना ते आपल्याला नाटचपूर्ण वाटते का या विषयी विचार व्हायला पाहिजे. ह्या सगळयाचा विचार करता त्यातील age group चं मन—त्याचा विचार व्हायला हवा, या एकांकिकेच्या लेखनाचा विचार करता हे निवेदन अपरिहार्य आहे असे मला स्वत:ला वाटते. ह्यातील निवेदन आळेकरांचे आहे असे वाटत नाही. प्रयोगामध्ये अभिनेत्याने ते कन्व्हिन्सिंगली मांडले आहे का याचा विचार फार तर करायला पाहिजे. अनुभव नाटचपूर्ण असेल तर तो परिणामकारकपणे व्यक्त होतो का—याचा विचार करायला पाहिजे. यामध्ये असा नाटयानुभव संक्रांत केला जातो आहे असे मला वाटते. नाटक आहे किंवा नाही, किंवा एकांकिका आहे की कथा आहे हे सगळे माझ्यादृष्टीने गौण मुद्दे

आहेत. तो एक ज्वलंत नाट्यानुभव आहे की नाही याला मी महत्त्व देतो. या एकांकिकेत स्टायलायझेशनचा वापर केला आहे...यातील पात्रे संगीताची लय सांभाळीत तालावर पावलं टाकीत येतात...याचा एवढा बाऊ करण्याचा किंवा त्यात खोलवर जाऊन अर्थ शोधण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. आता या एकांकिकेतील त्या तरुणीच्या वडिलांचे चालणे...त्या लयीत तालात... स्टायलाइज्ड–हे त्यांच्या प्रतिष्ठेचे निदर्शक आहे...ते ज्या समाजाच्या स्तरात वावरतात त्याचे व्यवच्छेदक लक्षण दाखवण्यासाठीच आहे...सुरुवातीला ते तसे चालतात...पुढे ते तसे चालत नाहीत...यामध्ये सुरुवातीला त्या व्यक्तिरेखेसंबंधी प्रेक्षकांना सूचना मिळावी एवढाच हेतू त्यात असतो. 'माइम 'संबंधीदेखील आपण विचार करतो तो चुकीच्या दिशेने. 'माइम ' ही एक स्वतंत्र कला आहे. तिचा अभ्यास जीवनभर पुरावा इतका अवघड आहे. नाटकातील 'माइम 'च्या उपयोगासंबंधी विचार करताना ती एक स्वतंत्र कला अशा दृष्टीने करू नये. तसे झाले तर तपशीलामध्ये दाखवलेले कौशल्य दिसेल मात्र नाटकाची गती रोधली जाईल...नाट्यानुभव तिथेच संपेल. 'माइम 'चा वापर अत्यंत मर्यादित अर्थाने नाट्यानुभवाच्या गतीस बाधा आणणार नाही अशा प्रकारेच करायला पाहिजे. केवळ 'माइम 'च्या कौशल्याकडे–तपशीलाकडे लक्ष दिले तर एकांकिकांचा प्राणच गमवावा लागेल. बायफोकल स्टेजसंबंधी विचार करता दृश्यांची सांधेजोड असायला पाहिजे असं जरी खरं असलं तरी आजच्या प्रेक्षकाला त्याची आवश्यकता आहे असं वाटत नाही. सांधेजोड नसल्यामुळे विलग वाटेल अशी कुणाची तक्रार नाही. '

आपण निवेदनाची पद्धत का स्वीकारली व यातील पात्रे ही एकसुरी वाटतात किंवा एकाच साच्यातील वाटतात यासंबंधी आपली भूमिका सतीश आळेकर स्पष्ट करतात... 'त्या तरुणाचा अँगर...त्याचा राग संवादातून पोचवण्यापेक्षा डायरेक्ट प्रोजेक्ट करता आला तर अधिक जिवंतपणे तो अँगर प्रेक्षकांपर्यंत पोचवता येईल असे वाटले म्हणून मी ही निवेदनपद्धत स्वीकारली. यात घडणाऱ्या गोष्टी तरुणाच्या दृष्टिकोनातून घडत असल्याकारणाने पात्रे एकसुरी आहेत असे वाटणे अपरिहार्य आहे असे मला वाटते. '

आजचा प्रयोग न पाहिलेले असे वक्ते म्हणजे प्रा. विद्याधर पुंडलीक. सभास्थानी ते उशिरा आले. पण ही एकांकिका या आधी त्यांनी वाचली होती आणि दोन वर्षांपूर्वी जेव्हा ती प्रथम रंगभूमीवर आली तेव्हा पाहिलीदेखील होती. ते बोलू लागतात संथ लयीत... 'ही एकांकिका वाचल्यानंतर आणि पाहिल्यानंतर पहिला विचार माझ्या मनात आला तो म्हणजे या एकांकिकेतून एक विशिष्ट भूमिका कळते परंतु अनुभव प्रत्ययाला येत नाही. नव्या नाटकांबद्दल माझी हीच

तक्रार आहे. आळेकरांना या एकांकिकेत एक विशिष्ट ॲटिट्यूड सांगायची आहे. परंतु प्रत्यक्ष अनुभवात संक्रांत व्हायला पाहिजे तेवढी ती वाटत नाही. त्यांच्या इतर एकांकिकांबद्दलही माझी हीच तक्रार आहे. बहुतेक प्रयोगांमध्ये मला जाणवलेले सत्य हे आहे की, विशिष्ट बौद्धिक जीवनासंबंधी किंवा अनुभवासंबंधी एक विशिष्ट भूमिका घेतलेली दिसते. भूमिका घेणं आवश्यक वाटलं किंवा तो प्रतिभेचा साहजिक आविष्कार मानला तरी अनुभव लक्षात राहायला हवा—भूमिका विसरून जायला हवी. या एकांकिकेमध्ये असा अनुभव पुरेसा प्रत्ययास येत नाही. ती मुलगी—तो तरुण मुलगा यातले नाते दोन-तीन भेटीनंतर स्पष्ट होते...ते पुढे विकसित होत नाही. कुठेतरी अनपेक्षित गति-मानता आहे. सरतेशेवटी मी एवढेच सांगेन की, यात भूमिका आहे, मात्र अनुभवात गवसलेले नाही.'

डॉ. जब्बार पटेल हेही चर्चेत भाग घेतात...मंगरूळकरांनी उपस्थित केलेल्या ही एकांकिका अशाच प्रकारे करायला हवी का? या प्रश्नाचे उत्तर देतात... 'ही एकांकिका अशाच प्रकारे करायला हवी असे काही नाही. परंतु आमच्या पद्धतीत बसले म्हणून तसे केले. आर्थिक मुद्दा बाजूला ठेवला तरी—आमच्या संस्थेतील हे प्रयोग करणारे हे सगळे विद्यार्थीच असल्यामुळे दिलेल्या सिच्युएशनमध्ये त्यांनी काम करावे आणि त्यातून कौशल्य दाखवावे. यामुळे काही मर्यादा पडतातच, नाही असे नाही. परंतु अभिनय, दिग्दर्शनाच्या काही जागा यातूनच काही अर्थ कळावा हा आमचा हेतू आहे.'

अशी रंगलेली चर्चा...नाट्यविषयक जुन्या नव्या जाणिवांना उजळा देणारी...नव्या कलावंतांना विचारांची एक नवी दिशा देणारी...नाट्यलेखन आणि नाट्यप्रयोग—प्रायोगिक रंगभूमीवर नित्य नवे काहीतरी करण्यासाठी धडपडणारी ही तरुण मंडळी... 'थिएटर ॲकॅडमी' चे कलावंत...या चर्चेने त्यांना बरेच काही दिले... डॉ. जब्बार पटेलांनी याप्रसंगी असं सांगितले की, असे प्रयोग नित्य होत राहिले पाहिजेत...अशा चर्चा घडल्या पाहिजेत...यातूनच तरुणांना काही शिकायला मिळेल...त्यांच्या विचारांना प्रयत्नांना योग्य दिशा मिळेल. ◻

'झुलता पूल' या एकांकिकेच्या प्रयोगात मोहन गोखले, विमा देशमुख, रमेश मेढेकर आणि मंदार भोपटकर यांनी भाग घेतला. लेखक आणि दिग्दर्शक—सतीश आळेकर. ● ● ●

---

सोव्हिएत लेखक संघाने 'सेव्हन डेज ऑफ क्रिएशन' ही कादंबरी लिहिणाऱ्या व्लादिमिर मॅक्सिमॉव्ह या लेखकाला संघातून काढून टाकले आहे. त्याचे लेखन सोव्हिएतविरोधी आणि साम्यवादविरोधी आहे हे त्याच्याविरुद्धच्या कारवाईचे कारण आहे.

---

# सावरकर सुभाष ग्रंथ भेट

## १ : स्वातंत्र्यवीर सावरकर

लेखक : धनंजय कीर । पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
पृष्ठे : ६०० । निवडक छायाचित्रे । किंमत रुपये चाळीस

## २ : मी नेताजींना बघितलंय

लेखक : नारायण सान्याल । अनुवादक : अशोक शहाणे
पृष्ठे सुमारे ३५० । किंमत सुमारे वीस रुपये
'माणूस' मधून गाजलेली लेखमाला मार्च १९७४ मध्ये
पुस्तक रूपाने प्रसिद्ध होत आहे.

---

★ १०० रुपयाची ठेव पाच वर्षासाठी 'राजहंस प्रकाशन'कडे ठेवल्यास वरील दोन्ही पुस्तके व्याजाच्या मोबदल्यात विनामूल्य भेट.

---

★ सावरकर चरित्र नोंदणीच्या वेळीच दिले जाईल. या पुस्तकाच्या प्रती मर्यादित असल्याने ठराविक नोंदणी होताच ही ठेवयोजना स्थगित होईल.

★ ठेवीऐवजी शंभर रुपये पाच वर्षांची 'माणू'चीस वर्गणी म्हणून भरली तरी वरील दोन पुस्तके विनामूल्य दिली जातील.

★ पुस्तके पाठविण्याचा टपाल, पॅकिंग इत्यादी खर्च ठेवीदारांकडे आहे.

★ पाच वर्षे 'माणूस' वर्गणीचा पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'साप्ताहिक माणूस' या नावे पाठवावेत.

★ ठेव पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'राजहंस प्रकाशन' या नावे पाठवावे.

★ रक्कम चेकने पाठविणे सोयीचे असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवावी.

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649

# ?

# महाराष्ट्र मंत्रिमंडळात दर्डा, गेडाम व गोयनका यांचा समावेश होणार ?

अकोला, दि. १७ (न. वा.)–महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात चालू विधानसभा अधिवेशनानंतर वाढ केली जाणार असून त्यावेळी विदर्भातील श्री. जवाहरलाल दर्डा (यवतमाळ), श्री. शंकरराव गेडाम (नागपूर) व श्री. जमनलाल गोयनका (अकोला) ह्यांचा कॅबिनेट मंत्री म्हणून समावेश केला जाणार असल्याचे येथे आलेले विश्वसनीय वृत्त आहे.

–[ नवशक्ती, १८-८-७३ । पा. ६ कॉ. २-३ ]